CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

लातूर | गुरुवार, ४ डिसेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २७४ । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



निधर्माच्या बाबतीत मनन करताना पशू आणि मानव अशी भिन्नता आपण लक्षात ठेवली पाहिजे. जोपर्यंत वैयक्तिकता व सामूहिकता यांचे भाव जुळ्या भावंडांप्रमाणे संयुक्त असतात तोपर्यंत पारस्परिकतेशिवाय मानव राहू शकत नाही. जेव्हा ही पारस्परिकता लुप्त होईल तेव्हा मानव संघर्षाच्या मार्गावर पुढे जाईल आणि 'ज्याची काठी त्याची म्हैस'सारखी स्थिती होत राहील. मानव जनावरापेक्षा खालच्या स्तरावर जाईल.

**- रंगा हरी**

रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## आज श्रीदत्त जयंती



# बिजापुरात चकमक; १२ माओवादी ठार

**● तीन पोलिस हुतात्मा ● अत्याधुनिक बंदुका, स्फोटके घटनास्थळावरून जप्त**

**◆ बिजापूर, ३ डिसेंबर**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात बुधवारी झालेल्या भीषण चकमकीत १२ माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले. या चकमकीत जिल्हा राखीव रक्षक दलाचे (डीआरजी) तीन जवान हुतात्मा झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली. अखेरचे वृत्त आले त्यावेळी ठार झालेल्या माओवाद्यांची ओळख पटवली जात होती.

दोन्ही बाजूंनी झालेल्या तुफानी गोळीबारात डीआरजीचे दोन जवान जखमी झाले. परिसरात अद्याप कारवाई सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. हेड कॉन्स्टेबल मोनू, कॉन्स्टेबल दुकारू गोंडे आणि जवान रमेश सोधी, अशी हुतात्मा झालेल्या जवानांनी नावे आहेत.

सुरक्षा दलाचे जवान आज सकाळी नक्षलविरोधी अभियान राबवत असताना बिजापूर-दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेवर ही चकमक झडली, अशी माहिती बस्तर रेंजचे



पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पट्टलिंगम् यांनी दिली. या कारवाईत राज्य पोलिस दलाच्या दंतेवाडा आणि बिजापूरचे डीआरजी पथक, सीआरपीएफचे कोब्रा कमांडो आणि विशेष कृती दलाचे जवान सहभागी झाले होते.

चकमक स्थळावर आतापर्यंत माओवाद्यांचे १२ मृतदेह आढळले. मात्र, त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही, असे सुंदरराज पट्टलिंगम यांनी सांगितले. सुरक्षा दलाच्या जवानांनी घटनास्थळावरून लाईट मशीन गन, सिंगल लोडिंग रायफली, इन्सास रायफली, .३०३ रायफली आणि इतर शस्त्रे तसेच मोठ्या प्रमाणात स्फोटके जप्त केली.

चकमकीत जखमी झालेल्या जवानांना तत्काळ प्रथमोपचार देण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असून, पुढील उपचारासाठी योग्य व्यवस्था करण्यात आली, असे सुंदरराज पट्टलिंगम यांनी सांगितले. पश्चिम बस्तर विभागात असलेल्या या चकमकीच्या स्थळावर अतिरिक्त कुमक पाठवण्यात आली. परिसरात अद्याप कारवाई सुरू असल्याची माहिती बिजापूरचे पोलिस अधीक्षक जितेंद्र यादव यांनी दिली. केंद्र सरकारने माओवाद्यांच्या उच्चाटनासाठी ३१ मार्चची मुदत ठेवली असून, त्या दिशेने आज आणखी एक मोठे यश मिळाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### वर्षभरात २७५ माओवाद्यांचा खात्मा

» आज झालेल्या चकमकीसह छत्तीसगडमध्ये या वर्षी आतापर्यंत २७५ माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला. त्यापैकी तब्बल २४६ माओवादी बिजापूर आणि दंतेवाडासह सात जिल्ह्यांचा समावेश असलेल्या बस्तर विभागातील होते. रायपूर विभागातील गारियाबंद जिल्ह्यात २७ माओवाद्यांना ठार करण्यात आले. दुर्ग विभागातील मोहला-मानपूर-अम्बागढ चौकी जिल्ह्यात दोन माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला.

# तामलवाडी टोलनाक्याजवळ अपघात; दोन ठार, दोघे गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. ३ डिसेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी पोलीस ठाणे हद्दीत बालाजी अमाईन्सपासून सुमारे ५00 मीटर अंतरावर तुळजापूर-सोलापूर महामार्गावर दि.३ डिसेंबर रोजी पहाटे भीषण अपघात झाला.पहाटे अंदाजे १.३0 वाजता चक १२ दढ १७५३ सुझूकी स्विफ्ट या वाहनाचा टोलगेटपासून एक किलोमीटर अंतरावर असलेल्या लोखंडी खांबाला जोरदार धडक बसली. धडकेचा आवाज दूरपर्यंत घुमला, पाहता पाहता भीषण स्थिती निर्माण झाली.

या अपघातात सुधाकर विलास गिरे आणि भारत शंकर विटकर (दोन्ही रा. मार्डी, जि. सोलापूर) यांचा जागीच मृत्यू झाला. तर प्रकाश तानाजी गरड व विजय नागेश मोरे हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. सर्वजण मार्डी गावचे असल्याचे पोलिसांनी सांगितले. अपघातानंतर तामलवाडी टोलनाका येथील म्बुलन्सने तत्काळ मदतीसाठी धाव घेत जखमींना सिव्हिल हॉस्पिटल, सोलापूर येथे हलविण्यात आले. उपचार सुरू असून पुढील तपास तामलवाडी पोलीस करीत आहेत. घटनास्थळी काही काळ वाहतूक मंदावली होती. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.




# निवडणूक आयोगासोबत आज महानगरपालिका आयुक्तांची बैठक

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका निवडणुकांसाठी तयारीचा वेग वाढवला आहे. आगामी काळात १५ ते २० डिसेंबरदरम्यान राज्यातील २९ महानगरपालिका निवडणूक कार्यक्रम जाहीर होवू शकतो, अशी चर्चा सुरू आहे. यामध्ये मुंबई महानगरपालिका निवडणूक ही सर्वात महत्वाची मानली जात आहे.

यासंदर्भात गुरुवार, ४ डिसेंबर रोजी निवडणूक आयोगाने महानगरपालिका आयुक्तांची मोठी बैठक बोलावली असून, त्या बैठकीत निवडणुकीसाठी परिसरातील तांत्रिक, कायदेशीर व प्रशासकीय तयारीचा आढावा घेतला जाणार आहे. या बैठकीत आयुक्तांना निवडणूक मतदार याद्यांवरील हरकती व दुरुस्त्या १0 डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्याची तयारी आयोगाने केली आहे.दुसरीकडे, नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांचे निकाल २१ डिसेंबरला एकत्र जाहीर केल्यानंतर ताबडतोब राज्यातील महानगरपालिका निवडणुका जाहीर करण्याची शक्यता अधिक आहे. जिल्हा परिषद निवडणुका मात्र आरक्षणात अडकल्यामुळे सध्या थोड्या मागे पडलेल्या दिसत आहेत. एकूणच, न्यायालयाच्या आदेशामुळे निवडणूक आयोगाला धोरणात्मक बदल करावा लागत असून, राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# सदानंद दाते महाराष्ट्राचे नवे पोलिस महासंचालक



**◆ मुंबई, ३ डिसेंबर**

वरिष्ठ आयपीएस अधिकारी सदानंद दाते यांची महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला येत्या ३१ डिसेंबर २०२५ रोजी निवृत्त होत असल्यानं, राज्याच्या गृह विभागाने सात अधिकाऱ्यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडं पाठवली होती, त्यात दाते यांचे नाव प्रमुख्याने चर्चेत होते. आता अखेर त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. दातेंचा कार्यकाळ डिसेंबर २०२७ पर्यंत असेल.

दाते यांनी २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात महत्वाची भूमिका बजावली होती. दाते तेव्हा मुंबई क्राइम ब्रांचमध्ये कार्यरत होते. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### हिवाळी अधिवेशन फक्त आठ दिवसांचे

| ८ ते १४ डिसेंबर दरम्यान होणार अधिवेशन | शनिवार-रविवारीही कामकाज |
|---|---|

**मुंबई :** महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार ८ ते रविवार १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत नागपूरमध्ये होणार आहे. १३ डिसेंबर शनिवार आणि १४ डिसेंबर रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशीही दोन्ही सभागृहाचे कामकाज घेण्याचा निर्णय विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला. विधानभवन येथे विधिमंडळ काम काज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखेपाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार, दीपक केसरकर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सुनील प्रभू, अमीन पटेल विधानपरिषद सदस्य अनिल परब, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील आदी उपस्थित होते.

# ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांचे निधन

**वयाच्या ९३ व्या वर्षी नळदुर्ग येथे घेतला अखेरचा श्वास**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

समाजवादी चळवळीचा आधारवड मानले जाणारे ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांचे मंगळवारी रात्री निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे राज्याच्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळीचा एक महत्वाचा दुवा निखळल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांचे पार्थिव शासकीय रुग्णालयात देहदान करण्यात आले.

पन्नालाल सुराणा राज्यातील राजकीय व सामाजिक स्थित्यंतरांचे मागील ७ दशकांपासून साक्षीदार होते. नळदुर्ग येथील 'अपना घर' येथे ते मुक्कामी होते. रात्री जेवण केल्यानंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यातच त्यांना उलटी झाली. त्यामुळे कुटुंबीयांनी तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल केले. पण त्यापूर्वीच त्यांचे निधन झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. पन्नालाल सुराणा यांचा जन्म ९ जुलै १९३३ रोजी सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे झाला. त्यांनी महाविद्यालयीन जीवनातच राष्ट्रसेवा दलाचे कार्यकर्ते म्हणून सामाजिक व राजकीय जीवनाची सुरुवात केली. हजारो मुला-मुलींचे आयुष्य घडवले. पन्नालाल सुराणा यांनी आणीबाणीच्या काळात तुरुंगवासही भोगला. मराठवाड्यातील भूकंपानंतर त्यांनी सर्वस्व गमावलेल्या मुलांसाठी



आपले अपना घर सुरू केले. या माध्यमातून त्यांनी मराठवाड्यातील हजारो मुला-मुलींचे आयुष्य घडवले. भूमिहीन शेतकऱ्यांना जमीन मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. ज्ञानबाचे अर्थकारण हे त्यंचे पुस्तक चांगलेच गाजले. राज्य व देशातील सामाजिक व राजकीय बदलांचे साक्षीदार राहिलेल्या सुराणा यांनी चले जाव चळवळीपासून स्वातंत्र्योत्तर भारत, आणीबाणी आणि त्यानंतरच्या राजकीय घटना घडामोडींचा जवळून अभ्यास केला. राज्याच्या समाजकारण आणि राजकारणातील निस्पृहतेचा आदर्श काळाच्या पडद्याआड गेला आहे. या शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**- मायेचा हात हरपला (पान ८ वर)**

# बेकायदेशीर ८७ लोन ॲप्सवर केंद्राची बंदी

**केंद्रीय राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांची लोकसभेत माहिती**

**◆ नवी दिल्ली, ३ डिसेंबर**

डिजिटल फसवणूक आणि बेकायदेशीर ऑनलाईन कर्ज देण्याचा दावा करून लोकांची फसवणूक करणाऱ्या ८७ बेकायदेशीर लोन ॲप्सवर बंदी घालण्यात आली. माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या कलम ६९ अ नुसार इलेक्ट्रॉनिक व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला लोकांच्या सुरक्षेसाठी, त्यांची फसवणूक रोखण्यासाठी अशा प्रकारचे ॲप्स ब्लॉक करण्याचे अधिकार आहेत, अशी माहिती केंद्रीय कॉर्पोरेट व्यवहार राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांनी लोकसभेत दिली.



विरोधी पक्षाच्या तीन खासदारांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मल्होत्रा म्हणाले, कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत अशा प्रकरणांमध्ये सातत्याने तपासणी, बँक खात्यांचे ऑडिट व आवश्यक सर्व प्रकारची तपासणी केल्यानंतर ८७ लोन ॲप्सने हजारो नागरिकांची फसवणूक केल्याचे उघड झाले. ऑनलाइन कर्ज देणे व घेण्यासह बेकायदेशीर आर्थिक व्यवहार करत असल्याचेदेखील समोर आले. कंपनी कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे लक्षात आल्यानंतर या ॲप्सवर कारवाई करण्यात आली. अशाप्रकारचे काही ॲप्स सरकारच्या रडारवर असून, दोषी आढळल्यास त्यांच्यावरदेखील कारवाई केली जाईल. (वृत्तसंस्था)

### डीपफेक, बनावट बातम्या लोकशाहीसाठी धोका

बनावट बातम्या आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयने तयार केलेले डीपफेक व्हिडीओ लोकशाहीसाठी गंभीर धोका आहे. दिशाभूल करणाऱ्या सामग्री पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असून सरकार बनावट बातम्यांवर आळा घालण्यासाठी नवीन नियम तयार करत असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत प्रश्न-उत्तराच्या तासात दिली. बनावट बातम्या पसरवणाऱ्या व्यक्ती आणि गट भारतीय कायद्यांचे पालन करत नाहीत आणि म्हणूनच त्यांच्याविरुद्ध कारवाई करणे आवश्यक आहे.



# पुतिन यांचा आजपासून दोन दिवसीय भारत दौरा

**◆ नवी दिल्ली, ३ डिसेंबर**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन चार वर्षांनंतर गुरुवारी दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहे. त्यांच्यासोबत १३० सदस्यीय प्रतिनिधी मंडळ असेल.



भारतात आगमन झाल्यानंतर पुतिन भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होतील, त्यानंतर पंतप्रधान मोदी यांच्यासोबत होणाऱ्या बैठकीत संरक्षण, ऊर्जा, अंतराळ संशोधन आणि व्यापार या प्रमुख विषयांवर चर्चा अपेक्षित आहे. पुतिन यांच्या दौऱ्याच्या पृष्ठभूमीवर राजधानी दिल्लीत चोख बंदोबस्त तैनात आहे. रशियाची ५० हून अधिक सदस्यांचे सुरक्षा पथक बुधवारी दिल्लीत दाखल झाले आणि त्यांनी पुतिन यांच्या मार्गांचा, कार्यक्रम स्थळांचा आणि सुरक्षा व्यवस्थेचा तपशीलवार आढावा घेतला.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### इस्त्राईलमध्ये युवकांना रोजगाराच्या संधी

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ यांच्या माध्यमातून इस्त्राईल येथे Renovation Construction क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. यामध्ये प्लास्टरिंगचे काम - १००० जागा, सिरॅमिक टाइलिंग - १००० जागा, ड्रायवॉल कामगार - ३०० जागा, मेसन -३०० जागा रद्द करून देण्यात आलेल्या आहे तरी उमेदवारांनी अर्ज करावेत, असे आवाहन सहाय्यक संचालक संगीता खंदारे यांनी केले आहे. यासाठी २५ ते ५० वयोगटातील इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणारे उमेदवार पात्र असून, किमान ३ वर्षांचा अनुभव Renovation Construction क्षेत्रात असणे आवश्यक आहे. उमेदवाराने यापूर्वी इस्त्राईलमध्ये काम केलेले नसावे. तसेच त्यांचा/तिचा जोडीदार, पालक किंवा मुले इस्त्राईलमध्ये सध्या काम करत नसावेत किंवा रहिवासी नसावेत, अशी अट आहे. इच्छुक उमेदवारांनी Maharashtra International Portal darb Latest या विभागात जाऊन ऑनलाईन अर्ज करावा. तरी जिल्ह्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक महाविद्यालयांनी ही माहिती अधिकाधिक उमेदवारांपर्यंत पोहोचवावी. तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (नॉर्थ कोर्ट), पार्क चौक, सोलापूर येथे संपर्क साधावा. असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर संगीता खंदारे यांनी इच्छुक उमेदवारांना या रोजगार संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

### सहायक कामगार आयुक्त प्रभारीच; पूर्णवेळ अधिकारी देण्याची

**राष्ट्रवादी काँग्रेस कामगार सेलची मागणी**

**सोलापूर, दि.३ डिसेंबर**

कामगारांचे शहर म्हणून ओळख असलेल्या सोलापुरात सुमारे अडीच लाख कामगारांची संख्या आहे. त्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित असताना, सहायक कामगार आयुक्तपदी प्रभारीची नियुक्ती झाली. पूर्णवेळ अधिकारी का नाही? असा प्रश्न राष्ट्रवादी कामगार सेलने कामगार मंत्र्यांना केला. दरम्यान, विडी, यंत्रमाग, गारमेंट, साखर कारखाने, बांधकाम आदी क्षेत्रात कामगार मोठ्या संख्येने आहेत. कामाच्या ठिकाणी असलेल्या अडचणी, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात तक्रार करण्यासाठी ते सहायक कामगार आयुक्तांकडे येत असतात. शासकीय योजनांच्या लाभ मिळवण्यासाठीही अर्ज करतात. त्यांच्या मागण्यांची वेळेत पूर्तता करण्यासाठी पूर्णवेळ अधिकारी नाही. त्यामुळे कामगारांचे हेलपाटे होतात. प्रभारी आठवड्यातील दोन ते तीन दिवसच कार्यालयात असतात. शिवाय शनिवार, रविवारी सुटी. त्यामुळे कामगारांच्या तक्रारींचा निपटारा होत नाही. या पार्श्वभूमीवर सहायक कामगार आयुक्तपद पूर्णवेळ असावे. त्याची तातडीने दखल घ्यावी, असे कामगार मंत्री आशिष फुंडकर यांना इ-मेलने पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी कामगार सेलचे अध्यक्ष डॉ. गोवर्धन सुंचू यांनी पुढाकार घेऊन कामगारांची कैफियत मांडली. यावेळी बालाजी बुधाराम, विष्णू गुंडेटी, सोमनाथ कनकी, सतीश गोरंटला, लता शिकटी आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### हरिभाऊ शिंदे



**पंढरपूर, दि. ३ डिसेंबर-**

येथील हरिभाऊ नारायण शिंदे (वय ७८) यांचे मंगळवारी सकाळी ६.३० वाजता हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील पत्रकार नितीन शिंदे व उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य सेवक श्रीनिवास शिंदे यांचे वडील होत.

### बाळासो बगाडे



**पिलीव, दि. ३ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील बाळासो सोपान बगाडे गुरुजी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५४ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते सुळेवाडी येथील जिल्ह्य परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते.

### मच्छिंद्र कदम



**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

कर्देहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथील वारकरी सांप्रदायातील मच्छिंद्र भीमराव कदम (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने बुधवारी दुपारी निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा गुरुवार दि. ४ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता त्यांच्या शेतातील राहत्या घरापासून निघणार आहे. सोलापुरातील दिवाणी व फौजदारी वकील राम कदम व पत्रकार हरिश्चंद्र कदम यांचे ते वडील होते.

### शुभांगी ग्रामोपाध्ये



**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

अक्कलकोट येथील एकमुखी दत्त मंदिराचे पुजारी शुभांगी दत्तात्रय ग्रामोपाध्ये (वय ५५) यांचे अल्प आजाराने बुधवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुली, एक मुलगा, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### डॉ. सुरेश बचुवार



**सोलापूर दि. ३ डिसेंबर-**

येथील आर्यवैश्य समाजातील ज्येष्ठ डॉक्टर, वैद्यकीय महाविद्यालयाचे शरीररचनाशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश पुरूषोत्तम बचुवार यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुन, जावई, भावंडे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. डॉ. सुरेश बचुवार हे अनेक राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक, परीक्षक आदी पदावर कार्यरत होते.

# दिरंगाईमुळे उड्डाणपूल प्रकल्प रद्द होऊ शकतो

### आमदार विजयकुमार देशमुख यांनी यांनी व्यक्त केली भीती

### महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेऊन केली चर्चा

**निधी मिळूनही प्रकल्पाला विलंब होणे चुकीचे**

उड्डाणपुलासाठी आवश्यक असलेला भूसंपादनाचा निधी राज्य शासनाकडून मिळूनही प्रशासनाकडून भूसंपादनाबाबत योग्य ती कार्यवाही केली जात नाही. या प्रकल्पाचे फाईल्स हलत नाहीत. शहराच्या महत्त्वाच्या प्रकल्पाला जाणूनबुजून विलंब लावला जातो, ही चुकीची बाब आहे. या प्रकल्पासाठी शासकीय जागांचे संपादन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत होणार आहे. मात्र ही प्रक्रिया अतिशय संथगतीने सुरू आहे, असे आ. विजयकुमार देशमुख यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

सोलापूर शहरातील दोन उड्डाणपूलांबाबतची कार्यवाही अतिशय संत गतीने होत आहे. जर प्रशासनाकडून अशीच दिरंगाई झाल्यास हा प्रकल्प रद्द होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती भाजपचे आ. विजयकुमार देशमुख यांनी महापालिकेत पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली.

दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या उड्डाणपूल प्रकल्पावर प्रशासनाची सुरू असलेली निष्क्रीयता उघडकीस आणत आमदार विजयकुमार देशमुख यांनी बुधवारी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन तीव्र नाराजी व्यक्त केली. उड्डाणपुलासंदर्भातील सद्यस्थिती पाहिल्यानंतर भूसंपादन प्रक्रियेचा वेग तात्काळ वाढवावा, अशी स्पष्ट मागणी यावेळी त्यांनी आयुक्तांकडे केली.

सोलापूर शहरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन सुमारे १० वर्षांपूर्वी केंद्र सरकारने दोन उड्डाणपूलांचा प्रकल्प मंजूर केला होता. त्याला १० वर्षे लोटून देखील हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. या प्रकल्पासाठी सध्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे पण तीही संथ गतीने. भूसंपादनासाठी शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध झालेला असताना देखील स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाचे काम अतिशय कूर्मगतीने होत असल्याने लोकप्रतिनिधींबरोबरच नागरिकांमधून देखील तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करताना राजकीय दबाव येत असल्याचे कारण प्रशासनाने पुढे केल्याची माहिती आमदार देशमुख यांनी पत्रकारांना दिली.शहराच्या विकासासाठी असलेला प्रकल्प राजकीय दबावाच्या नावाखाली रखडविणे चुकीचे आहे, या शब्दात आमदार देशमुख यांनी आपली नाराजी व्यक्त केली. उड्डाणपूल प्रकल्पाला केंद्र शासनाची मंजुरी असली तरी उड्डाणपुलासाठी प्रशासनाची अनास्था अशी कायम राहिल्यास शहरात कधीच उड्डाणपूल उभारणार नाहीत. त्यामुळे केंद्राकडून मंजूर झालेला प्रकल्प रद्द होण्याचीही शक्यता निर्माण होऊ शकते, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

## बार्शी नगरपरिषदेच्या निवडणुकीत ६३.३६ टक्के मतदान



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ डिसेंबर-**

बार्शी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवारी काही अपवाद वगळता शांततेत मतदान झाले. सकाळी ७-३० ते सायंकाळी ५-३० या काळात एकूण ११२ केंद्रांवर ६३.३६ टक्के इतके मतदान झाल्याचे सांगण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी अमोलसिंह भोसले व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तैमुर मुलाणी यांनी सर्व निवडणुकीचे कामकाज पाहिले. त्याचबरोबर तहसील कार्यालय, कृषी कार्यालय आदी विभागातील अधिकारी कर्मचारी देखील या प्रक्रियेमध्ये सहभागी होते.

नगराध्यक्षपदासाठी ६ उमेदवार तर नगरसेवकपदाच्या ४१ जागांसाठी ११८ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. नगराध्यक्षपदासाठी महायुतीच्या तेजस्विनी कथले तर महाविकास आघाडीच्या निर्मला बारबोले, काँग्रेसच्या जाकिराबी शेख, अपक्ष उमेदवार ॲड. सुप्रिया गुंड तसेच प्रहारच्या संजीवनी बारंगुळे आणि एमआयएम पक्षाच्या खाजाबी पठाण असे सहा उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. मात्र, यामध्ये महाविकास आघाडीच्या बारबोले आणि महायुतीच्या कथले यांच्यामध्येच खरी लढत झाली.

मतदानानंतर रात्री उशिरापर्यंत ईव्हीएम मशीन शासकीय गोदाम येथील निवडणूक विभागाकडे जमा करण्याची प्रक्रिया सुरु होती. मतदानाची आकडेवारी पत्रकारांना मिळण्यासाठी खूप प्रयत्न करावा लागला. रात्री १२ नंतर त्यांनी ग्रुपवर आकडेवारी प्रसिद्ध केली. या मतपेटया आता शासकीय गोदामात ठेवण्यात आल्या असून, सर्वांचे लक्ष २१ डिसेंबरकडे लागले आहेत.

## कोणत्याही ईव्हीएमच्या चिन्हावर पेनने खुणा नाहीत

### निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर : मतदान प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ डिसेंबर-**

पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान 'ईव्हीएम मशीनवरील चिन्हावर पेनाने खुना केल्याच्या आशयाचे वृत्त काही प्रसारमाध्यमांतून प्रसारित झाले आहे. यावर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अधिकृत खुलासा केला असून, मतदान करण्यापुर्वी काही लोक सही ऐवजी अंगठा करतात. त्या अंगठ्याला लागलेली शाई मतदान यंत्राला लागल्याचे दिसून येत होती. यंत्रावरील शाई तात्काळ पुसण्यात आली. मतदान करण्याच्या कोणत्याही ईव्हीएम मशीनवरील चिन्हावर पेनने खुणा नाहीत. मतदान प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि निवडणूक आयोगाच्या नियमांनुसारच करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी दिली.

दि २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सर्व उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ईव्हीएम मशीनचे 'सेटिंग व सिलिंग' करण्यात आले होते. त्याबरोबर राखीव मशीन्स देखील २८ नोव्हेंबरलाच तयार करण्यात आल्या होत्या. निवडणूक आयोगाकडील मार्गदर्शक सूचना व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रियेचे कामकाज पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने सुरू आहे. प्रभाग ७ मधील जागा ब चा निवडणूक कार्यक्रम ४ डिसेंबरला सुरु होत असून २० तारखेला मतदान होणार असून, पंढरपूर नगरपरिषदेसाठी निडणूक लढवलेल्या सर्व उमेदवारांची व नगराध्यक्ष पदाच्या. उमेदवारांची एकत्रित मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे होणार आहे.

नागरिकांनी व उमेदवारांनी कोणत्याही गैरसमजाला बळी पडू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## लाखात एक असणाऱ्या दुर्मिळ बॉम्बे रक्तगटाच्या रक्तदात्यांनी वाचवले पंढरपूरच्या गर्भवती महिलेचे प्राण

### डॉ. हेडगेवार रक्तपेढीमध्ये रक्तदात्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**

बॉम्बे रक्तगट म्हणजे सन १९५२ मध्ये मुंबईमध्ये तत्कालीन बॉम्बे मध्ये डॉ. यादव आणि डॉ. भेंदे यांच्या संशोधनातून या दुर्मिळ अशा रक्तगटाचा शोध लागला. तत्कालीन बॉम्बे मध्ये याचा शोध लागल्याने त्याचे नाव बॉम्बे ब्लड ग्रुप असे ठेवण्यात आले. या रक्तगटाच्या व्यक्तींमध्ये एच नावाचा ऍंटीजन नसतो जो सामान्यतः इतर रक्तगटांमध्ये असतो. हा रक्तगट ओ निगेटिव्ह रक्तगटापेक्षा अधिक दुर्मिळ मानला जातो. विशेष म्हणजे या रक्तगटाच्या रुग्णास रक्ताची आवशक्यता भासते तेव्हा भारताच्या कानाकोपऱ्यातून रक्तदान करण्यासाठी बॉम्बे ग्रुपचे रक्तदाते तयार असतात.

पंढरपूर येथील एका महिलेची प्रसूती सोलापूर येथील एका हॉस्पिटल मध्ये झाली. प्रसूती दरम्यान सदर महिलेला रक्ताची आवश्यकता भासली, पण महिलेचा रक्तगट दुर्मिळ बॉम्बे रक्तगट होता. तेव्हा नातेवाईक आणि रक्तपेढी मार्फत दुर्मिळ बॉम्बे रक्तगट असणाऱ्या रक्तदात्यांना संपर्क सुरु झाला. अशावेळी सोलापूरचे रविंद्र दंतकाळे आणि सदाशिव नगर माळशिरस येथील देविदास शेंडे यांना रक्तदानासाठी डॉ. हेडगेवार रक्तपेढीमध्ये बोलावण्यात आले आणि ते लगेच येण्यासाठी तयार झाले. ते डॉ. हेडगेवार रक्तपेढीत आल्यानंतर त्यांची पूर्व तपासणी करून रक्तदान करून घेतले गेले. सदर रक्तदान झाल्यानंतर रक्ताची तपासणी झाल्यानंतर प्रक्रिया पूर्ण करून त्या दुर्मिळ बॉम्बे रक्तगटाची रक्तपिशवी सदर महिलेच्या नातेवाईकांना सुपूर्त करण्यात आली. या प्रक्रियेसाठी डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे कर्मचारी आणि संचालक यांचे सहकार्य लाभले. रक्तपेढीच्या वतीने बॉम्बे ग्रुप रक्तदाते रविंद्र दंतकाळे आणि देविदास शेंडे यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी दोन्ही रक्तदात्यांनी डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या सेवकार्याची प्रशंसा केली आणि जास्तीत जास्त रक्तदात्यांनी डॉ. हेडगेवार रक्तपेढीमध्ये रक्तदान करून रक्तपेढीस सहकार्य करण्याचे आवाहन केले.

## सोलापूर महापालिका निवडणूक : फेरआरक्षण सोडतीवर शिक्कामोर्तब

### सर्व हरकती फेटाळल्या ; अंतिम आरक्षण सोडत शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी घेण्यात आलेल्या आरक्षणाच्या प्रक्रियेवर आक्षेप नोंदवत काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीवर दाखल झालेल्या सर्व ६ हरकती आणि राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात आलेली त्याच हरकतदारांची एक हरकत फेटाळण्यात आली आहे. या सर्व हरकती फेटाळल्याने आता महापालिका प्रशासनाने काढलेल्या फेरआरक्षण सोडतीवर शिक्कामोर्तब झाले आहे. अंतिम आरक्षण सोडत शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे.

हरकतींवर निर्णय घेऊन त्याचा सविस्तर अहवाल आणि फेर आरक्षण सोडत प्रक्रिया अंतिम करून महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे यांनी निवडणूक आयोगाकडे पाठविले होते. ही आरक्षण सोडत राज्य निवडणूक आयोगाने अंतिम करून ती राजपत्रात निवडणुकीच्या कार्यक्रमात ठरल्या पद्धतीने मंगळवारी रात्री प्रसिद्ध करण्यात आली.

आयोगाने ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार सोलापूर महापालिका प्रशासनाने १०२ जागा असलेल्या २६ प्रभागातील आरक्षण सोडत प्रथम दि. ११ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली. यानंतर मात्र आयोगाने आखून दिल्याप्रमाणे आरक्षण सोडत काढण्यात न आल्याने पुन्हा एकदा या पद्धतीने दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी आरक्षण सोडत काढून ती आयोगाकडे पाठविण्यात आली होती. यामध्ये २६ प्रभागातील १०२ जागांवर १५ अनुसूचित जाती त्यामध्ये ८ महिला, अनुसूचित जमाती २ त्यामध्ये १ महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) २७ त्यामध्ये महिला १४ आणि सर्वसाधारण ५८ त्यामध्ये महिला २८ आशा १०२ जागांमध्ये ५१ महिला असे आरक्षण सोडत काढण्यात आले. या आरक्षण सोडतीवर मुदतीत हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या होत्या.

यादरम्यान, प्रभाग २-ब आणि २४-क मधून रियाज अहमद मोमीन यांनी हरकत नोंदविली होती. प्रभाग २४ मधून नरेंद्र काळे, राम वाकसे यांनी फेर आरक्षण सोडत प्रक्रियेला स्थगिती द्यावी अशी हरकत घेतली. त्याचबरोबर राजू चव्हाण यांनीही हरकत नोंदविली.

सर्वसाधारण महिला अर्चना दुलंगे यांनी फेर आरक्षण सोडतीमुळे ६० टक्के महिला आरक्षणाच्या जागेवरील संख्यात्मक विसंगती झाल्याने आरक्षण सोडत रद्द करून मूळ प्रारूप आरक्षण सोडत पूर्ववत ठेवण्यात यावी, असे अपील दाखल केले होते. तर प्रभाग २४- व सर्वसाधारण महिला येथून डॉ. बसवराज बगले यांनीही अपील दाखल केले होते या सर्व हरकती अपील आणि सूचना महापालिका प्रशासनाने राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार फेटाळून लावले आहे. यामुळे आता महापालिका प्रशासनाने दि. १७ नोव्हेंबर रोजी काढलेल्या फेर आरक्षण सोडती या निश्चित झाल्या आहेत.

## विषमुक्त शेती चळवळीत राजे रावरंभा शेतकरी कंपनीचे पुढचे पाऊल

### वावर कंपनीचे जिल्हा वितरक म्हणून मान्यता



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.३ डिसेंबर**

सध्या ऑरगॅनिक शेती, रेसिड्यू फ्री शेती, सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती असे शब्द वारंवार आपल्या कानावरती पडत असतात, परंतु ही शेती प्रत्यक्ष ज्यावेळेस आपण करायला जातो त्यावेळेस त्याला असंख्य अडचणी येतात.विषमुक्त शेती करण्यासाठी आवश्यक असलेल्या निविष्ठा आपल्याला मिळत नाहीत. त्यामुळे नाईलाजाने अनेक शेतकऱ्यांना रासायनिक खते आणि कीटकनाशके वापरावी लागतात.

शेतकऱ्यांच्या हितासाठी स्थापन झालेल्या राजे रावरंभा शेतकरी प्रोडूसर कंपनीने ही अडचण लक्षात घेऊन २ वर्षापासून करमाळा शहरांमध्ये ऑरगॅनिक शेतीसाठी लागणाऱ्या सर्व निविष्ठा शेतकऱ्यांना माफक दरात उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यामध्ये चिकट सापळे, प्रकाश सापळे, कामगंध सापळे याबरोबरच १० ड्रम ची औषधे, बीज प्रक्रियेसाठी लागणारी औषधे, हुमणी वरती प्रभावी असलेले परभणी विद्यापीठाने विकसित केलेले बायोमिक्स, गांडूळ बेड, गांडूळ कल्चर हे सर्व उपलब्ध करून दिले आहे याचा परिणाम म्हणून करमाळा तालुक्यामध्ये विषमुक्त शेतीची चळवळ जोमाने कार्य करत आहे. शेतकरी प्रोड्युसर कंपनीच्या या कामाची दखल वावर या कंपनीने घेतली असून त्यांनी राजे रावरंभा शेतकरी प्रोडूसर कंपनीला सोलापूर जिल्ह्याचे वितरक म्हणून मान्यता दिली आहे. सोलापूर कार्यक्षेत्र मध्ये काम करण्याची संधी आता कंपनीला मिळाली आहेत त्यामुळे करमाळा तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना अतिशय माफक दरामध्ये एकात्मिक कीड व्यवस्थापन साठी लागणारे निविष्ठा आता सहजासहजी उपलब्ध होणार आहेत.

त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. जिल्हा वितरक म्हणून मान्यता मिळाल्यामुळे करमाळा येथील ऍग्रो मॉलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते.सदर कार्यक्रमासाठी कृषी विभाग आत्माचे अजयकुमार बागल, वावर कंपनीचे संचालक संजय शिरोडकर, सीनियर सेल्स लीडर प्रीती आव्हाड, फिल्ड सेल्स एक्झिक्यूटिव्ह प्रदीप बिराजदार, कंपनीचे अध्यक्ष डॉ. विकास वीर, संचालक अजित काटुळे, संतोष पवार, अलका नलवडे यांच्यासह विषमुक्त शेतीच्या गट चळवळीतील विजय अवताडे, जीवन होगले,हर्षद शिंदे, विक्रम खरात आदी उपस्थित होते.

## 'सद्गुरु'ची पहिली उचल ३००० जाहीर

या कारखान्यावर ऊस दरासाठी माळशिरस तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेने तालुकाध्यक्ष अजित बोरकर व इतर पदाधिकारी यांनी ऊस दरासाठी मोठे आंदोलन केले होते. याविषयी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अजित बोरकर यांना विचारले असता या कारखान्याने ३००० हजार रुपये पहीला हप्ता जाहीर केला असला तरी आमची मागणी ३४०० रुपये पहीली उचल द्यावी अशी असल्याचे यावेळी बोलताना सांगितले.

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.३ डिसेंबर-**

सांगली जिल्ह्यातील राजेवाडी येथील श्री श्री सद्गुरू साखर





कारखान्याने २०२५२६ मध्ये गाळपास येणाऱ्या ऊसास पहीली उचल ३००० रुपये जाहीर केली असुन सदरची पहीली उचल शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली असल्याचे कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरीराव तसेच व्हा चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील यांनी सांगीतले.यामुळे खरेतर चालु हंगामात पहीली उचल ३००० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर सद्गुरू साखर कारखान्याने जाहीर करुन व प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करुन ऊस दराची कोंडी फोडली आहे. पण हा साखर कारखाना सांगली जिल्ह्यात आहे. या जिल्ह्यातील साखर कारखान्याप्रमाणे दर मिळावा अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.या साखर कारखान्यास सोलापूर जिल्ह्यासह माळशिरस तालुक्यातील ऊस मोठ्या प्रमाणावर गाळपास जातो या भागातील मोठ्या प्रमाणावर शेतकरी याच कारखान्याचे सभासद आहेत. सोलापूर जिल्ह्यातील एकाही साखर कारखान्याने तिन हजार रुपये पहीली उचल यंदाच्या गळीत हंगामात अद्यापही जाहीर केलेली नाही.

## जिल्हा परिषदेकडून लिपिकांना पदोन्नती

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी लिपिकवर्गीय संवर्गातील पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली आहे. वरिष्ठ सहायक पदावर कार्यरत असणाऱ्या तीन कर्मचाऱ्यांना कनिष्ठ प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती दिली आहे. पदोन्नतीमुळे कर्मचाऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. कनिष्ठ प्रशासन अधिकारी जहीर अब्बास शेख यांची जिल्हा परिषद येथील बांधकाम विभाग क्रमांक एक या ठिकाणी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या जागी मोहोळ पंचायत समिती येथील अप्पासाहेब भोसले यांची ग्रामपंचायत विभागाच्या कनिष्ठ प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

**पदोन्नती दिलेले कर्मचारी :** वरिष्ठ सहायक नागेश धोत्रे ( पंचायत समिती पंढरपूर, सहायक प्रशासन अधिकारी). वरिष्ठ सहायक मनिषा वास्ते (कनिष्ठ प्रशासन अधिकारी, दक्षिण सोलापूर पंचायत समिती) शशिकला म्हेत्रे (कनिष्ठ प्रशासन अधिकारी, अक्कलकोट पंचायत समिती).

# हिमाचलविरुद्धच्या सामन्यात महाराष्ट्राची पकड

- हिमाचल पहिल्या डावात २७० व ६ बाद १९० धावा
- महाराष्ट्राला ३९ धावांची आघाडी


आर्यन ठाकूर


लक्ष्य ठाकूर


अक्षय शर्मा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरू असलेल्या १९ वर्षाखालील मुलांच्या कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील महाराष्ट्र विरुद्ध हिमाचल प्रदेश सामन्यात तिसऱ्या दिवशी सकाळी सव्वा तासात हिमाचलचे उर्वरित ३ खेळाडू बाद करत महाराष्ट्राने फॉलोऑन लादला. पहिल्या डावात २७० वर सर्व गडी बाद झाल्याने १५१ धावांची आघाडी महाराष्ट्राला मिळाली.

कालची नाबाद जोडी आर्यन आणि लक्ष्य ने तिसऱ्या दिवशी सकाळी आपापली संयमी अर्धशतके पूर्ण केली व ९० धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरत २५० धावा गाठून दिल्या पण हर्षिल सावंत ने आर्यनला (६० धावा १६८ चेंडू, ६ चौकार) बाद करत जोडी फोडली. लक्ष्य ठाकूरने सिद्धक धील्लोन सोबत ९ व्या गड्यासाठी २० धावांची भागीदारी रचली.

स्पर्धेत पहिलाच सामना खेळत असलेल्या महाराष्ट्राचा गोलंदाजी मधला कालचा हिरो अनिश ने पुन्हा गोलंदाजीला येत लक्ष्य ठाकूर व अंश धीमन ला लागोपाठच्या षटकात बाद करत पहिल्या डावात (६६ धावांत) ६ बळी मिळवले. त्याच्या सोबतीला हर्षिल सावंत ४९/३ बळी, शुभम कदम ४७/१ यांनी बळी घेतले. महाराष्ट्राने हिमाचल वर फॉलो ऑन लादत पुन्हा एकदा फलंदाजी साठी बोलाविले आणि जेवणाला खेळ थांबला तेंव्हा ८ षटकात १० धावा करत सलाम ीची जोडीने संयमी फलंदाजी करण्याच्या दृष्टिकोन जाहीर केला.

जेवणानंतर अर्धशतकी सलामी दिल्यावर मात्र पहिल्या डावातील अर्धशतक वीर अर्पित सिंग (३६ धावा ८१ चेंडू) याला शुभम कदम ने त्रिफळाचित करत जोडी फोडली, पाठोपाठ कर्णधार आदित्यला (७ धावा) देखील बाद केले आणि २ बाद ८८ अशी धावसंख्या केली. त्यानंतर आलेल्या अरमान विज (५ धावा) याला सुआशिक जगताप ने ईशान खोंड करवी झेल बाद केले.

५ वा आलेला खेळाडू अक्षय वशिष्ठ सोबत संयमी फलंदाजी करत सलामीवीर अक्षय शर्मा ने ९३ चेंडूत ४ चौकार लगावत अर्धशतक पूर्ण केले पण पुढच्याच चेंडूवर सुआशिक जगताप ने त्याला बाद करत म हत्वाचा बळी मिळवला. चहापानाला खेळ थांबला तेव्हा ४१ षटके झालेली होती व अक्षय वशिष्ठ - सचिन मेहता हे संघाच्या १२८ धावा करत खेळपट्टीवर उभे होते आणि हिमाचल संघ अद्यापि २३ धावांनी मागे होता.

चहापान नंतर खेळ सुरू झाला व वशिष्ठ, मेहता ने तग धरून फलंदाजी करत धावफलक हलता ठेवला त्यामुळे ही जोडी फोडायला महाराष्ट्र कर्णधाराने समकित सुराणा याला पाचारण केले आणि त्याने सचिन मेहता ला (२२ धावा) त्रिफळा बाद केले. दोघांनी ४७ धावांची भागीदारी केली त्यानंतर आलेल्या व पहिल्या डावात उपयुक्त फलंदाजी केलेल्या आर्यन ठाकूर ला केवळ १० धावा वर शुभम कदम ने त्रिफळा बाद केले.

तळातील खेळाडू लक्ष्य ठाकूरने अक्षय वशिष्ठ सोबत तिसऱ्या दिवशी खेळ थांबे पर्यंत संघाच्या १९० धावा फलकावर लावल्या असून हिमाचल कडे ३९ धावांची आघाडी झाली असून चौथ्या दिवशी सामन्याचा निकाल अपेक्षित आहे. पहिल्या डावात ६ बळी घेणारा अनिश जोशी ने ७ षटके टाकली पण दुसऱ्या डावात त्याला अद्यापि बळी मिळाला नाही त्यामुळे उर्वरित ४ खेळाडू लवकरात लवकर बाद करून विजयासाठी आवश्यक असलेल्या धावा महाराष्ट्र संघ चौथ्या दिवशी किती षटकात पूर्ण करतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.






| विराट कोहली | धावा | चेंडू | चौकार | षट्कार |
| --- | --- | --- | --- | --- |
| | १०२ | ९३ | ७ | २ |

| ऋतुराज गायकवाड | धावा | चेंडू | चौकार | षट्कार |
| --- | --- | --- | --- | --- |
| | १०५ | ८३ | १५ | २ |

# दुसऱ्या वनडेत विराट कोहली-ऋतुराज गायकवाडचे शतक; तरीही भारताचा पराभव

**रायपूर :** दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात टीम इंडियाला ३५९ धावांच्या लक्ष्याचा बचाव करण्यात अपयश आले. बुधवारी रायपूरमध्ये दक्षिण अफ्रिकेने ६ विकेट गमावून ५०व्या षटकात लक्ष्य गाठले. संघाकडून एडेन मार्करामने शतक झळकावले, तर डेवाल्ड ब्रेव्हिस आणि मॅथ्यू ब्रेट्झकी यांनीही अर्धशतके झळकावून मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. दक्षिण आफ्रिकेने शहीद वीर नारायण सिंग स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाड यांच्या शतकांमुळे भारताने ३५८ धावा केल्या. कर्णधार केएल राहुलने अर्धशतक झळकावले. दक्षिण आफ्रिकेकडून मार्को जॅन्सेनने दोन विकेट घेतल्या. पाचव्या षटकात दक्षिण आफ्रिकेने पहिली विकेट गमावली. तिथून कर्णधार टेम्बा बावुमाने एडेन मार्करामसोबत शतकी भागीदारी केली. बावुमा ४४ धावांवर बाद झाला. त्यानंतर मार्करामने शतक झळकावून संघाला २०० धावांच्या जवळ नेले. मार्को जॅन्सेनच्या विकेट गमावल्या. तथापि, कॉर्बिन बॉशने अखेर आवश्यक ३७ धावा करून संघाला विजय मिळवून दिला.



# भारतीय मजदूर संघाच्या जिल्हाध्यक्षपदी नंदकुमार भोसले

**कार्याध्यक्ष वसंत पोतदार, कोषाध्यक्ष शेखर कुंभारे तर चिटणीसपदी शैलेश मारा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

भारतीय मजदूर संघ सोलापूर जिल्हाध्यक्षपदी नंदकुमार भोसले यांची निवड झाली. संघाच्या जिल्ह्याच्या सर्वसाधारण सभेत प्रदेश महामंत्री सरचिटणीस किरणजी मिलगिर यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली. सभेची सुरुवात श्रमिक गीताने झाली.

यावेळी व्यासपीठावर जिल्हा अध्यक्ष नंदकुमार भोसले, उपाध्यक्ष नरहरी मुळे, चिटणीस सुधांशू रानडे, ज्येष्ठ मार्गदर्शक अनंतराव मोडक उपस्थित होते. जिल्हा चिटणीस सुधांशू रानडे यांनी प्रास्ताविक केले. कामगार कायद्याने काम चालावे, अनेक उपक्रम, कार्यकर्त्यांचे प्रवास असे सर्व जमा खर्च अचूक ठेवणे, ही अशी सर्व कामे करणे साठी कार्यकारिणी करणे असे मुद्दे मांडले. त्यानंतर अहवालाचे वाचन केले व ताळेबंदचे वाचन नंदकुमार भोसले यांनी केले. त्यानंतर संलग्न संघटनेचे वृत्त निवेदन झाले, यामध्ये सुरक्षा रक्षक संघ, ग्रामीण डाकसेवा संघ, सहकारी बँक कर्मचारी संघ यांची निवेदने झाली. त्यानंतर प्रदेश कार्यसमितीचे २२ व २३ नोव्हेंबर २०२५चे वृत्त सांगण्यात आले. सर्वसाधारण सभेचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

**नूतन जिल्हा कार्यकारिणी अशी :** अध्यक्ष - नंदकुमार भोसले, कार्याध्यक्ष-वसंत पोतदार, चिटणीस- शैलेश मारा, सहचिटणीस- सुधांषू रानडे, कोषाध्यक्ष-शेखर कुंभारे, संघटन मंत्री-पांडुरंग कोळी,

# ‘सोनिया गांधी’ चक्क भाजपाच्या तिकिटावर!

## काँग्रेस उमेदवाराविरुद्ध निवडणूक लढवणार

◆ **तिरुवनन्तपुरम्, ३ डिसेंबर**

केरळ पंचायत निवडणुकीत भारतीय जनता पक्षाची एक महिला उमेदवार तिच्या नावामुळे चर्चेत आहे. तिचे नाव सोनिया गांधी आहे आणि पक्षाने तिला काँग्रेस उमेदवाराविरुद्ध उभे केले आहे. शिवाय, तिचे काँग्रेस कनेक्शन देखील समोर आले आहे. महत्त्वाचे म्हणजे, राज्यसभा खासदार सोनिया गांधी काँग्रेसच्या माजी राष्ट्रीय अध्यक्षा आहेत.



भाजपाने मुन्नार पंचायत निवडणुकीत नल्लाथन्नी वॉर्डमधून ३४ वर्षीय सोनिया गांधी यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचा जन्म स्थानिक काँग्रेस नेते दुरे राज यांच्या पोटी झाला. राज आता हयात नाहीत. तथापि, लग्नानंतर परिस्थिती बदलली. कारण भाजपा उमेदवार सोनिया गांधी यांनी भाजपा नेत्याशी लग्न केले.

त्यांचे पती सुभाष हे भाजपाचे पंचायत महासचिव आहेत आणि त्यांनी जुने मुन्नार मुलक्कड येथून पोटनिवडणूक लढवली आहे. लग्नानंतर काही काळातच सोनिया गांधी देखील भाजपमध्ये सक्रिय झाल्या. ही त्यांची पहिली निवडणूक आहे. (वृत्तसंस्था)

**उमेदवाराचे वय वर्षे ९०!**

कोचीच्या अस्मानूर गावातील पंचायत निवडणुकीत ९० वर्षीय व्यक्ती उमेदवार आहे, ज्यांच्यासाठी वय हे फक्त एक आकडा आहे आणि ते त्यांच्या उमेदवारीसाठी उत्साहाने प्रचार करत आहेत आणि मते मागत आहेत. नारायणन नायर नावाचे हे वृद्ध उमेदवार अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ९ आणि ११ डिसेंबर रोजी दोन टप्प्यात होणार आहेत, ज्यांचे निकाल १३ डिसेंबर रोजी जाहीर होतील. यामध्ये ९४१ ग्रामपंचायती, १५२ ब्लॉक पंचायती, १४ जिल्हा पंचायती, ८७ नगरपालिका आणि ६ महानगरपालिका यांचा समावेश आहे.

# विकासाप्रमाणेच पर्यावरण संतुलन महत्त्वाचे

**अजित पवार यांचे मत**

◆ **मुंबई, ३ डिसेंबर**

विकासाइतकेच पर्यावरण संतुलन महत्त्वाचे आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाशिकमध्ये कुंभासाठी वृक्षतोडीबाबत सकारात्मक दृष्टिकोन बाळगण्याचे आवाहन करताना बुधवारी सांगितले.

ऑक्टोबर २०२६ मध्ये सुरू होणाऱ्या कुंभमेळ्यापूर्वी येणाऱ्या धार्मिक नेत्यांसाठी ‘साधू ग्राम’ बांधण्यासाठी तपोवन परिसरातील १७०० पेक्षा जास्त झाडे तोडण्याच्या नाशिक महापालिकेच्या कथित योजनेविरुद्ध नागरी समाजातील सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

वृक्षतोडीवर ठाम राहिल्यास सरकारला कडाडून विरोध करेल, असे अभिनेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य सयाजी शिंदे यांनी सांगितले आहे. या मुद्यावर सयाजी शिंदे यांनी घेतलेल्या भूमिकेचे अजित पवार यांनी समर्थन केले. वृक्ष जगले तरच पुढची पिढी जगेल. विकासासोबत पर्यावरण संतुलन अतिशय महत्त्वाचे आहे, असे अजित पवार यांनी सांगितले. तपोवनातील वृक्षतोडीचा मुद्दा सामंजस्याने सोडविला पाहिजे. हे करताना पर्यावरणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या मुद्यावर सयाजी शिंदे यांनी घेतलेली भूमिका पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे, असे अजित पवार म्हणाले. (वृत्तसंस्था)

# ‘तत्काळ’च्या नियमात मोठा बदल

## ओटीपीशिवाय मिळणार नाही तिकीट

◆ **नवी दिल्ली, ३ डिसेंबर**

अगदी वेळेवर आकस्मिक कुठेतरी प्रवास करण्याची वेळ आल्यावर प्रवाशांसाठी तत्काळ तिकीट मोठा आधार असतो. मात्र, आता तत्काळच्या नियमात मोठा बदल झाला आहे. तत्काळ तिकीट बुकिंगनंतर आता ओटीपी व्हेरिफिकेशन अनिवार्य केले आहे. म्हणजे बुकिंग करताना दिलेल्या मोबाईल नंबरवर आलेला ओटीपी टाईप करून खात्री झाल्याशिवाय तिकीट मिळणार नाही.

तत्काळ सुविधेचा दलाल आणि खोटे बुकिंग करणारे लोक गैरफायदा घेतात. त्यामुळे बरेचदा खरोखर गरजू प्रवाशांना तिकीट मिळत नाही. यावर उपाय म्हणून आयआरसीटीसीने ही उपाययोजन केली आहे. सुरुवातीच्या टप्प्यात हा बदल



प्रायोगिक तत्त्वावर फक्त मुंबई सेंट्रल-अहमदाबाद शताब्दी एक्सप्रेससाठी लागू केला आहे. हा नवा बदल लवकरच संपूर्ण नेटवर्क पद्धतीत लागू केला जाईल, असे रेल्वे बोर्डाने सांगितले आहे.

यापूर्वी १ जुलै २०२५ पासून लागू नियमांनुसार, तत्काळ तिकीट फक्त त्या वापरकर्त्यांना मिळेल ज्यांनी आपले आधार आयआरसीटीसी खात्याशी जोडले असेल. आता बुकिंग केल्यानंतर निर्माण केलेला ओटीपी त्याच मोबाईल नंबरवर पाठवला जाईल, जो बुकिंग करताना दिला होता. जोवर त्या नंबरवर आलेला ओटीपी मिळाल्याची खातरजमा होणार नाही तोवर त्या नंबरला तिकीट जारी केले जाणार नाही. (वृत्तसंस्था)

**बुकिंग कसे करावे?**

आयआरसीटीसी संकेतस्थळ किंवा ॲपवर लॉगिन करा आणि खात्री करा की आपले आधार व्हेरिफाय केलेले आहे. सुरुवातीला, गंतव्य स्थान, यात्रेची तारीख निवडा आणि तत्काळचा पर्याय निवडा. प्रवाशांची माहिती भरा (नाव, वय इ.) आणि बँकिंग किंवा वॉलेटद्वारे त्वरित पेमेंट करा. ओटीपी येईल. तो टाईप करा, तेव्हाच तिकीट मिळेल.

# बोअरची मोटर बंद करण्याच्या कारणावरुन महिलेस मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ३ डिसेंबर-**

बोअरची मोटर बंद करण्याच्या कारणावरुन एका ५५ वर्षीय महिलेच्या केसाला धरुन लाथाबुक्क्याने मारहाण करीत तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी बबलू धर्मा ठेंगील, कानबा धर्मा ठेंगील या दोघा विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील ५५ वर्षीय फिर्यादी महिला दि.३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता मुंढेवाडी येथील शेतामध्ये गव्हास पाणी देत असताना बोअरची मोटर बंद करण्याच्या कारणावरुन वरील आरोपींनी शिवीगाळी दमदाटी करत सदर महिलेच्या केसाला



धरुन ओढून डावा हात पिरगाळून हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच बबलू ठेंगील या आरोपीने तिच्या अंगास झोंबाझोंबी करुन मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान यावेळी फिर्यादीचा मुलगा भांडण सोडविण्यासाठी आला असता त्याला बबलू ठेंगील याने त्याच्या डाव्या हाताच्या अंगठ्यास व दंडास चावा घेवून जखमी केले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार मनोज खंडागळे हे करीत आहेत.

# सरकार शेल कंपन्यांवर ठेवणार करडी नजर

**नवी दिल्ली :** सरकार शेल कंपन्यांवर करडी नजर ठेवणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा यांनी लोकसभेत बोलताना दिली आहे. शेल कंपन्यांचा गैरवापर मनी लॉन्ड्रिंगसाठी केला जात आहे का, या प्रश्नावर मल्होत्रा म्हणाले की, ‘शेल कंपनी’ हा शब्द कंपनी कायद्यात परिभाषित नाही, तरी अशा संशयित व्यवहारांची माहिती मिळाल्यास ती ईडी व आयकर विभागासह इतर तपास यंत्रणांना तत्काळ शेअर केली जाते. सरकार शेल कंपन्यांवर कारवाईसाठी आंतरसंस्थात्मक समन्वय आणखी मजबूत करणार आहे. मागास किंवा ग्रामीण भागात उद्योगांना करसवलत देण्याबाबत विचारले असता, मंत्री म्हणाले की, सरकारची धोरण भूमिका कर सवलतींची टप्प्याटप्प्याने समाप्ती आणि दर रचना सुलभ करण्याकडे आहे. देशात गुंतवणूक आणि ‘ईज ऑफ डुईंग बिझनेस’ वाढवण्यासाठी केंद्राने कॉर्पोरेट कर दरात मोठी कपात केली असून, विद्यमान आणि नव्या कंपन्यांना आकर्षक कर पर्याय उपलब्ध केले आहेत, असे मंत्री म्हणाले.

# परसबाग तपासणी पथकाने केली बंकलगी शाळेची पाहणी

**बंकलगी, दि.३ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्याच्या परसबाग तपासणी पथकाकडून बुधवार दि.३डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजता जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील परसबागेची तपासणी करण्यात आली.

परसबागेतून शालेय पोषण आहार योजनेकरता वापरला जाणारा भाजीपाला, फळभाज्या व विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या सेंद्रिय फळभाज्या व पालेभाज्यांचा योग्य वापर होतो का याची तपासणी करण्यात आली. तसेच औषधी वनस्पती याचीही पाहणी करण्यात आली. तपासणी पथकाने अचानक भेट देऊन पाहणी केल्या असता ते पाहून समाधान व्यक्त केले. तपासणी पथकात शालेय पोषण आहार अधीक्षक पंडित गुरव, अक्कलकोट तालुका केंद्रप्रमुख लिंगन्ना कोळी, लक्ष्मण सदरखेड, कटारेसर, वसंत भिसे, धोंडाप्पा रुपनुरे, ब्रह्मदेव राठोड, दत्तात्रेय माने, दानिस्ता सय्यद उपस्थित होते.

# महापालिका निवडणुकीचे बिगुल; प्रभागात झळकताहेत पोस्टर

## गुडघ्याला बाशिंग लावून इच्छुकांसह माजी नगरसेवकांची बॅनरबाजी; बॅनरवर मांडला विकास कामांचा लेखाजोखा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**

राज्य निवडणूक आयोगाने जानेवारी अखेरपर्यंत राज्यातील ५० टक्के च्या आतील आरक्षण असलेल्या महापालिकांच्या निवडणुका घ्याव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीचे वारे आता चांगलेच वाहू लागलेले दिसत आहे. इच्छुकांसह माजी नगरसेवकांनी आपापल्या पारंपारिक प्रभागात जय्यत तयारी सुरू केली आहे. प्रभाग निहाय चौकाचौकात बॅनरबाजी सुरू केलेली दिसत आहे.

त्या बॅनरवर पक्ष आणि स्वतः माजी उमेदवारांनी केलेल्या कामांचा लोकाजोखा मांडलेला दिसत आहे. दरम्यान, शहराचे वातावरण निवडणुकीच्या अनुषंगाने ढवळून निघत आहे. सत्ताधारी भाजप पक्षासह सत्तेतील इतर शिंदे सेना आणि अजित पवारांचे राष्ट्रवादी देखील जोमाने तयारी करताना दिसत आहेत. तर दुसरीकडे विरोधी बाकावरील उद्धवसेना काँग्रेस आणि साहेबांची राष्ट्रवादी काँग्रेसने देखील आपली चाल खेळण्यास सुरुवात केली आहे. भाजप आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून इच्छुकांकडून अर्ज मागवण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामध्ये आजी-माजी नगरसेवक तसेच नवखे उमेदवार सहभागी आहेत. भाजप पक्षाच्या वतीने निवडणूक लढवण्यासाठी माजी नगरसेवक तसेच नव्या उमेदवारांची रीघ वाढत चाललेली आहे. अशातच प्रत्येक प्रभागांमध्ये आता उमेदवारांचे बॅनर झळकताना दिसत आहेत.



शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील विविध प्रभागात हे बॅनर लावण्यात आले आहेत. त्या बॅनरवर माजी नगरसेवकांनी केलेली विकास कामांची यादीच मांडली आहे. तर काही ठिकाणी नवीन उमेदवार आपल्या भविष्यातील कामांची यादी घेऊन जनतेसमोर आलेले दिसत आहेत. महापालिका निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्यास अद्याप अवधी आहे. यासंबंधी लवकरच निवडणुका आयोगाकडून निर्देश जारी करण्यात येतील. परंतु त्यापूर्वीच निवडणुकीचा गरमागरमीचे वातावरण तयार केले जात आहे. त्यामुळे विरोधी पक्षातील उमेदवारांची चलबिचलता वाढत चाललेली आहे. प्रभागात वातावरण निर्मिती करण्यासाठी प्रत्येक माजी नगरसेवक तसेच इच्छुक उमेदवार सकाळपासून संध्याकाळ पर्यंत तीन ते चारवेळा चकरा मारत आहेत. नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी प्राधान्यक्रम देत आहेत.

**सर्वत्र राजकीय वातावरण ढवळून निघत आहे**

माजी नगरसेवकांनी पुन्हा एकदा आपल्या प्रभागातील जनतेशी संपर्क वाढवलेला दिसत आहे. काही काळ पक्षासह जनतेपासून अलिप्त राहिलेले, काही माजी नगरसेवक पुन्हा एकदा अवतरले आहेत. ‘‘ऐन निवडणुकीच्या तोंडावर अवघड जायला नको म्हणून ते नगरसेवक देखील आत्तापासूनच प्रभात फेऱ्या करताना दिसत आहेत.‘‘ मात्र त्यांना जनतेतून फारसा प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे उमेदवारांवर नामुष्कीची वेळ वाढवणार आहे.

# ट्रॅक्टरला ट्रॅव्हल बसची धडक, एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ३ डिसेंबर-**

मंगळवेढा-सोलापूरयाराष्ट्रीय महामार्गावर मंगळवेढ्याच्या अलिकडे ऊसाने भरलेल्या ट्रॉलीला पाठीमागून ट्रॅव्हल्सने जोराची धडक दिल्याने सदर ट्रॅव्हल चालक विकास हरिश्चंद्र चव्हाण (रा.पळसखेडा जि.बीड) याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, दि.३ रोजी रात्री २ वाजता मंगळवेढा सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मंगळवेढ्याच्या अलिकडे दोन कि.मी.अंतराव एच.पी. पेट्रोल पंपाच्या समोर ऊसाने भरलेल्या ट्रॉलीला पाठीमागून ट्रॅव्हल क्रमांक एम.एच.२६ बी. ई. ७१३० च्या चालकाने भरधाव वेगात व निष्काळजीपणे वाहन चालवून धडक देवून ट्रॅव्हल्सच्या उजव्या बाजूची काच, समोरील बंपर, डॅशबोर्ड तुटून फुटून एक लाखाचे नुकसान होवून त्यात स्वतः ट्रॅव्हल चालक विकास चव्हाण हे चेहऱ्याला मार लागून जखमी झाले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# महापालिका प्रारूप मतदार यादीवर शेवटच्या दिवशी ११४ हरकती

**निवडणूक कार्यालयाकडे मुदती अखेर एकूण ५५५ तक्रारी प्राप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**

सोलापूर महापालिका प्रारूप मतदार यादीवर आज शेवटच्या दिवशी बुधवार दि. ३ डिसेंबर रोजी दिवसभरात एकूण ११४ हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. २० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २०२५ दरम्यान मुदती अखेर एकूण ५५५ हरकती व सूचना महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत.

बुधवारी दिवसभरात मतदार यादीमध्ये काही लेखनिकाच्या चुका असल्यास त्याबाबतचे प्राप्त अर्ज - ४, दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नावे त्या प्रभागतून वगळण्यात यावी व संबंधित प्रभागत समाविष्ट करण्याबाबतचे प्राप्त अर्ज - ९८ , मनपा संबंधित प्रभागाच्या क्षेत्रातील विधानसभा भाग यादीत मतदारांची नावे असूनही मनपाच्या मतदार यादी मध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याबाबत प्राप्त अर्ज - ३, इतर अर्ज - ९ असे अशा एकूण ११४ हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत.

दि. २० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २०२५ दरम्यान एकूण ५५५ हरकती व सूचना महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# राज्य निवडणूक आयोगाचा सावळा गोंधळ

नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीचे वेळापत्रक आणि प्रक्रिया यात अनेक घोळ व गोंधळ करून आपली 'अफाट' अकार्यक्षमता दाखवून देताना राज्य निवडणूक आयोगाने भारतातील निवडणूक कार्यप्रणालीच्या उत्तम इतिहासाला बट्टाही लावला आहे. खरे तर फार मोठा मुद्दा नव्हता. आरक्षणाचे जे कोणते विषय आहेत, त्यांच्या विषयी पुढील वर्षी जानेवारीत निर्णय होतील, हे स्पष्ट झालेले होते. त्यामुळे असा घोळ होण्याचे आणि त्यातून एवढी गुंतागुंत निर्माण होण्याचे काहीही कारण नव्हते. बऱ्याच सव्यापसव्यानंतर व प्रदीर्घ कालावधीनंतर महाराष्ट्रातील नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुका २ डिसेंबरला घेण्याचे ठरले आणि निकाल ३ डिसेंबरला लागणार हेही ठरले. उमेदवारी अर्जांची छाननी, पात्रता-अपात्रता इत्यादी प्रक्रियात्मक विषयांवरून काही ठिकाणी आक्षेप घेतले गेले. काही लोक कोर्टात गेले. त्यामुळे २ तारखेला व्हावयाचे काही ठिकाणचे मतदान राज्य निवडणूक आयोगाने २० डिसेंबरला घेण्याचे ठरविले. २० तारखेला होणाऱ्या मतदानाचे निकाल २१ डिसेंबरला लागतील, असेही ठरले. २० डिसेंबरपर्यंत आक्षेपांचे निराकरण होईल आणि खटलेही संपतील, असे राज्य निवडणूक आयोगाने कशावरून गृहीत धरले हे कळायला मार्ग नाही. हा विषय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे आला असता सारेच निकाल २१ डिसेंबरला लावा, असा आदेश दिला गेला. त्यावरून निवडणूक आयोगावर साऱ्यांकडून टीकेची झोड उठली असेल तर ती अनाठायी म्हणता येणार नाही. नागपूर खंडपीठाने निवडणुकांचा निकाल दोन वेगळ्या तारखांना जाहीर करण्याच्या आयोगाच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केला. मतदार प्रभावित होऊ नयेत आणि निवडणुकीची प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शी असावी, यासाठी एकाच दिवशी निकाल लागणे आवश्यक असल्याचे खंडपीठाचे म्हणणे पडले. ते अतिशय योग्य आहे. या निवडणुकांच्या निकालांना २१ डिसेंबरपर्यंत स्थगिती देण्याचा जो आदेश दिला गेला, तो वरकरणी न्यायालयीन प्रक्रियेचा एक भाग वाटू शकतो. वास्तवात तो राज्य निवडणूक आयोगाच्या अकार्यक्षमतेवर कठोर ताशेरे ओढणारा आहे. खंडपीठाने नेमक्या वेळी दिलेला हा निर्णय म्हणजे लोकशाहीच्या अस्तित्वाला मिळालेला प्राणवायूच. या निर्णयामुळे विरोधकांचे डोळे तर चढले आहेतच. शिवाय सत्ताधारीसुद्धा खट्टू झाले आहेत. विरोधक आणि सत्तापक्ष दोघेही एकाच निर्णयावर नाराज झाल्याचे क्वचितच घडते. ही नाराजी बाजूला ठेवली तरी न्यायालयाने उपस्थित केलेले प्रश्न अधिक मूलभूत आणि महत्त्वाचे ठरतात. काही जागांवर २० डिसेंबर रोजी मतदान होत असताना, ३ डिसेंबरला त्यापूर्वी झालेल्या (२ डिसेंबरच्या) निवडणुकांचे निकाल जाहीर केल्यास मतदारांच्या मानसिकतेवर आणि मतदानावरही परिणाम होईल, हा तार्किक मुद्दा निवडणूक आयोगाच्या लक्षात येऊ नये ही कमालच म्हणावी लागेल.

भारतीय निवडणूक आयोगाचा इतिहास हा केवळ देशातील नव्हे, तर अवघ्या जगातील लोकशाहीसाठी प्रेरक असा आहे. जगातील सर्वांत मोठी आणि यशस्वी निवडणूक प्रक्रिया राबविणाऱ्या या प्रणालीची अवघ्या जगात ख्याती आहे. हिमालयाच्या दुर्गम शिखरांपासून ते कच्छच्या वाळवंटी भागापर्यंत, बांगलादेश-चीनच्या सीमावर्ती भागातील गावापासून अरबी समुद्राला लागून असलेल्या इवल्याशा वस्तीपर्यंत प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क मिळवून देण्याची आयोगाची क्षमता जगासाठी अभ्यासाचा विषय ठरली आहे. १९९० च्या दशकात टी. एन. शेषन यांच्यासारख्या आयुक्तांनी आयोगाच्या कार्याला कठोर शिस्तीचे आणि पारदर्शकतेचे नवे आयाम दिले होते. अशी गौरवशाली परंपरा असणाऱ्या आणि 'निवडणुका कशा घ्यावात' याचा वस्तुपाठ जगापुढे ठेवणाऱ्या भारतीय निवडणूक आयोगाच्या राज्यस्तरीय यंत्रणेने निवडणुका 'कशा घेऊ नयेत' याचे उदाहरणच आपल्या भोंगळ कार्यपद्धतीद्वारे जगापुढे ठेवले. या निवडणुकांची प्रक्रिया हाताळताना आयोगाने ज्या चुका केल्या, त्यामुळे राज्य आयोगाची अब्रूच मातीत गेली आहे. केंद्रीय पातळीवर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये कसलीही गंभीर त्रुटी न ठेवणाऱ्या आयोगाला, राज्याच्या पातळीवरील यंत्रणेच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकविषयक कायद्याचे आणि नियमांचे पालन करता आले नाही का, असा कठोर प्रश्न विचारण्याची वेळ यावी हे चांगले संकेत नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसंदर्भात न्यायालयानेच आयोगाचे कान टोचले हे योग्य झाले. निवडणूक आयोगाचे स्थानिक पातळीवरील नियंत्रण पूर्णपणे ढिसाळ असल्याचे नगर परिषदा व नगर पंचायतींच्या निवडणूक संचालनात दिसून आले. मतदारयाद्यांपासून अनेक गोष्टींच्या तक्रारी आहेत. स्थगित झालेल्या निवडणुका, निकालांना होणारा उशीर आणि न्यायालयीन खटले या साऱ्यांत प्रशासनाचा अमूल्य वेळ आणि सार्वजनिक पैसा वाया जात आहे. आधीच अनेक वर्षे खोळंबलेली विकासाची कामे आणखी लांबणार आहेत. निवडणूक आयोगासारख्या तटस्थ संस्थेच्या कार्यक्षमतेवर असे प्रश्नचिन्ह उभे राहिल्यास नागरिकांच्या मनात लोकशाही प्रक्रियेबद्दल अविश्वासाची बीजे रुजू शकतात. तसा प्रयत्न विरोधी पक्ष आधीपासून करीत आहेतच. त्यामुळे जनमानसात संभ्रम निर्माण झालेला आहेच. निवडणूक आयोग ही अशी यंत्रणा आहे, जी राजकीय पक्षांच्या हेतूंचा विचार न करता फक्त कायद्याच्या कक्षेखाली काम करते. या यंत्रणेचा प्रत्येक निर्णय आणि कृती निःपक्षपातीपणा आणि कठोर कायदेशीर पालनाचा वस्तुपाठ असायला हवा. मात्र, या निवडणुकांच्या संचालनात ढिलाई दाखविली आणि स्वत:चेच हसे करून घेतले. त्यावर मुख्यमंत्र्यांसह सारेच नाराज होणे स्वाभाविकच होते. प्रत्येक गोष्ट न्यायालयाला सांगावी लागत असेल तर इतक्या जबाबदार यंत्रणा काय करतात, हा प्रश्न उपस्थित होतो. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला निकालाची तारीख सांगावी लागते आणि नियमावली तयार करण्याचा निर्देश छ. संभाजी नगरच्या खंडपीठाला द्यावा लागतो, हे आयोगाची प्रकृती ठीक नसल्याचे द्योतक आहे. न्यायालयांचा हस्तक्षेप किंवा त्यांच्या निर्देशांचे पालन हा तात्पुरता इलाज आहे. या गोंधळाचे इंगित निवडणूक आयोगाच्या रचनात्मक त्रुटींमध्ये आणि पुरेशा अभ्यासाविना निर्णय घेण्याच्या सवयीत दडलेले आहे. ज्या भारतीय निवडणूक आयोगाकडे जग मोठ्या आदराने बघते, ज्या आयोगाने देशामध्ये अनेक आव्हानात्मक निवडणुका शांततेत पार पाडल्या, त्याच आयोगाच्या राज्यस्तरीय यंत्रणेवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या संचालनाबाबत प्रश्न उपस्थित राहतात, हा साऱ्यांसाठी चिंतेचा विषय आहे. विरोधी पक्षांच्या हाती आणखी एक कोलीत देण्याचाच हा प्रकार आहे. राज्य निवडणूक आयोगाला यापुढेही निवडणुका घ्यायच्या आहेत. त्यावेळी देखील नियमांच्या पालनाची, आरक्षणाच्या नेमकेपणाची आव्हाने असतील. भविष्यातील कोणत्याही निवडणुकांमध्ये कुठलाही पेचप्रसंग निर्माण होऊ नये याकरिता राज्य निवडणूक आयोगाने आताच सुस्पष्ट नियमावली तयार करावी. केंद्रीय निवडणूक आयोगाने सक्तीने तयार करून घ्यावी. त्यासाठी राज्य आयोगाने वेळ मागितलेला आहे. आता राज्य निवडणूक आयोगाने गमावलेली प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करण्यासाठी या वेळेचा सदुपयोग करावा, हीच लोकशाहीप्रेमी नागरिकांची अपेक्षा आहे. साऱ्याच गोष्टी न्यायालयांत जात राहिल्या तर इतर यंत्रणांच्या अस्तित्वाला काहीही अर्थ राहणार नाही. शासनातील प्रत्येक यंत्रणेची कार्यकक्षा आणि जबाबदारी ठरलेली आहे. जबाबदारीनुसार सर्व यंत्रणांनी योग्य काम केले तर न्यायालयांना हस्तक्षेप करावा लागणार नाही. निवडणूक आयोग काही नव्याने स्थापन झालेला नाही. कित्येक दशके तो अस्तित्वात आहे. निवडणूक आयोग ही लोकशाहीच्या मूल्य व्यवस्थेचे तसेच प्रक्रियेचे प्राणपणाने रक्षण करणारी, निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शी पद्धतीने पार पाडणारी, सचोटीने निकाल लावणारी आणि त्यामुळेच कोट्यवधी भारतीयांसाठी आदराचा विषय असलेली यंत्रणा आहे. जगाच्या इतर देशांमध्येही भारतीय निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविषयी आदर आहे. आपल्या निवडणूक आयोगाचे लोक इतर देशांमध्ये निवडणूक कशी घ्यावी, याचे प्रशिक्षण देत असतात. राज्य निवडणूक आयोगात मात्र अकार्यक्षमता तेवढी दिसते. ती नागरिकांसाठी वेदनादायी आहे आणि लोकशाहीच्या दृष्टीनेही नुकसानदायी आहे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# एआय डेटा सेंटर्सचे विस्तारते विश्व

एकविसाव्या शतकात 'कृत्रिम बुद्धिमत्ता' ही मानवजातीच्या विकासाची एक नवी दिशा ठरली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. या तंत्रज्ञानाचा पाया म्हणजे डिजिटल डेटा आणि तो साठवण्यासाठी, प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेली प्रचंड संगणकीय यंत्रणा डेटा सेंटर्स म्हणून ओळखली जाते. विशेषतः एआय डेटा सेंटर्स ही आधुनिक जगाची मेंदू-प्रणाली मानली जाते. ही केंद्रे केवळ माहिती साठवत नाहीत, तर ती विश्लेषित करून भविष्याचे निर्णय घेण्यास मदत करतात. एआय डेटा सेंटर्स म्हणजे अशी अत्याधुनिक केंद्रे, जिथे हजारो शक्तिशाली सर्व्हर्स, सुपरकॉम्प्युटर्स, नेटवर्क डिव्हाइसेस आणि स्टोरेज सिस्टिम्स एकत्र काम करतात. प्रचंड प्रमाणातील डेटा साठवण, मशीन लर्निंग मॉडेल्सचे प्रशिक्षण, डीप लर्निंग प्रक्रिया, क्लाऊड कम्प्युटिंग सेवा, रिअल-टाईम डेटा प्रोसेसिंग ही अशा डाटा सेंटर्सची ठळक वैशिष्ट्ये मानता येतात. हाय-परफॉर्मन्स संगणकप्रणाली, २४७ अखंड कार्यप्रणालीने सज्ज अशी ही डेटा सेंटर्स कधीही बंद होत नाहीत. दिवस-रात्र सतत सुरू राहतात. उच्च दर्जाची सुरक्षा प्रणाली, सायबर सिक्युरिटी, बायोमेट्रिक लॉक, फायरवॉल्सचा वापर. प्रगत कूलिंग सिस्टिम्स, सर्व्हर्स गरम होऊ नयेत म्हणून विशेष एअर कंडिशनिंग आणि लिक्विड कूलिंग, ऑटोमेशन आणि रोबोटिक देखभाल, अनेक ठिकाणी रोबोटिक सिस्टिम्स वापरून देखभाल ही या यंत्रणेची आणखी काही वैशिष्ट्ये.

एआय डेटा सेंटर्स जितके फायदेशीर आहेत, तितकेच पर्यावरणावर त्यांचे गंभीर परिणामही आहेत. प्रचंड वीज वापर ही त्यांची एक महत्त्वाची मर्यादा ठरते. डेटा सेंटर्स खूप मोठ्या प्रमाणात वीज वापरतात. ही वीज प्रामुख्याने कोळशावर आधारित असते, त्यामुळे कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन वाढते. ग्लोबल वॉर्मिंगला चालना मिळते. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे कूलिंग सिस्टिमसाठी प्रचंड प्रमाणात पाणी लागते. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होते. या सेंटर्सचा दुष्काळग्रस्त भागांवर गंभीर परिणाम होतो. डेटा सेंटर्स मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण करतात, आजूबाजूच्या वातावरणाचे तापमान वाढवते. जुने सर्व्हर्स, केबल्स, इलेक्ट्रॉनिक उपकरणे यामुळे विषारी घटक जमिनीत मिसळतात. भारतामध्ये डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया या योजनांमुळे डेटा सेंटर्सची संख्या वाढत आहे. मुंबई, पुणे, हैदराबाद, बंगळुरू, चेन्नई येथे मोठी डेटा सेंटर्स उभी राहत आहेत. भविष्यात ग्रीन डेटा सेंटर्सचा वापर वाढेल. सौर, पवन ऊर्जेचा वापर होईल. पर्यावरणपूरक धोरणे लागू होतील. एआय डेटा सेंटर्समुळे होणारे धोके कमी करण्यासाठी काही उपाय आवश्यक आहेत.



सौर, पवन, जलविद्युत नवीकरणीय ऊर्जेचा वापर ग्रीन कूलिंग टेक्नॉलॉजी पाणी बचत करणारी प्रणाली याबाबत यापुढे आग्रही राहावे लागणार आहे. ई-वेस्ट रिसायकलिंग, कार्बन फूटप्रिंट कमी करणे, स्थानिक लोकांना कौशल्य प्रशिक्षण हे ही काही दखलपात्र मुद्दे आहेत. भविष्यात एआय डेटा सेंटर्स ही केवळ सर्व्हर ठेवण्याची ठिकाणे न राहता 'डिजिटल फॅक्टरीज' आणि 'इंटेलिजंट ब्रेन्स' म्हणून काम करतील. येत्या दहा ते वीस वर्षांमध्ये खालील महत्त्वाचे बदल दिसतील. ग्रीन डेटा सेंटर्सचा उदय होणार आहे. भविष्यात बहुतेक डेटा सेंटर्स सौर, पवन व जलविद्युत ऊर्जेवर चालतील. 'कार्बन-न्यूट्रल' आणि 'नेट-झीरो' डेटा सेंटर्स ही संकल्पना प्रत्यक्षात येईल. भारतासारखा सूर्यप्रकाश विपुल असलेला देश या क्षेत्रात आघाडी घेऊ शकतो. मोठ्या, केंद्रीकृत डेटा सेंटर्ससोबतच लहान, स्थानिक 'मायक्रो डेटा सेंटर्स' वाढतील. त्यामुळे डेटा प्रोसेसिंग वापरकर्त्याजवळ होईल, वेग वाढेल आणि इंटरनेटवरील भार कमी होईल. येथे क्वांटम आणि न्यूरोमॉर्फिक कॉम्प्युटिंगची महत्त्वाची भूमिक असू शकते. भविष्यात क्वांटम कॉम्प्युटर्स आणि मानव मेंदूसारखे काम करणाऱ्या 'न्यूरोमॉर्फिक चिप्स' वापरात येतील. यामुळे कॉम्प्युटिंगची गती आणि क्षमतांमध्ये अभूतपूर्व वाढ होईल. याच सुमारास ऑटोमेटेड, सेल्फ-हिलिंग डेटा सेंटर्सही आकाराला येतील. उपलब्ध यंत्रणा स्वत:च आपल्या डेटा सेंटर्सचे मॉनिटरिंग, देखभाल आणि दुरुस्ती करतील. त्यामुळे 'सेल्फ रिपेअरिंग' सिस्टिम्स सामान्य होतील. यथावकाश केवळ शहरांमध्येच नव्हे तर ग्रामीण आणि अर्ध-ग्रामीण भागातही डेटा सेंटर्स उभारली जातील. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था डिजिटल युगात सामील होईल. डेटा सेंटर्समुळे अनेक नवीन व्यवसाय संधी निर्माण होत आहेत. या संधी फक्त मोठ्या कंपन्यांसाठी नसून लघु आणि मध्यम उद्योजकांसाठीही खुल्या आहेत.

डेटा सेंटर्सच्या वाढीने अनेक प्रकारचा रोजगारही निर्माण करून दिला आहे. यामुळे काही प्रकारचे स्टार्ट अप्स उभे राहू शकतात. यातून एआयची सेवा प्रदान करणारे प्लॅटफॉर्म सुरू करता येऊ शकतात. डेटा ॲनॅलिटिक्स कंपन्या सुरू करून क्लाऊड-आधारित सॉफ्टवेअर सेवा देता येऊ शकतात. उद्योगानुरूप सोल्यूशन्स (उदा. आरोग्य, शेती, फायनान्स) देता येतील. डेटा सेंटर्ससाठी सहायक व्यवसायही उभे राहू शकतात. डेटा सेंटर्सच्या भोवती 'इको-सिस्टिम' तयार होते. उदा. कूलिंग सिस्टिम मॅन्युफॅक्चरिंग, पॉवर बॅकअप सोल्यूशन्स (यूपीएस, जनरेटर), फायर सेफ्टी आणि सिक्युरिटी सिस्टिम्स, केबलिंग आणि नेटवर्किंग सेवा. हे व्यवसाय (लघु-मध्यम उद्योगांसाठी) खूप महत्त्वाचे ठरत आहेत. याखेरीज ग्रीन टेक आणि सस्टेनेबिलिटी स्टार्ट अप्स तसेच पर्यावरणीय समस्यांवर उपाय देणाऱ्या कंपन्यांसाठी मोठी संधी आहे. भारतासाठी डेटा सेंटर्स हे केवळ तंत्रज्ञानाचे क्षेत्र नसून राष्ट्रीय विकासाचे सामरिक साधन बनत आहेत. सरकारने डिजिटल इंडिया अभियान, मेक इन इंडिया, डेटा लोकलायझेशन पॉलिसी, नॅशनल स्ट्रॅटेजी अशा अनेक महत्त्वाच्या योजना सुरू केल्या आहेत. यामुळे भारतात डेटा सेंटर्समधील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. 'एआय २०३० इंडिया' उपक्रम ही सरकार-समर्थित योजना आहे. भारताला २०३० पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये जागतिक नेता म्हणून स्थान देण्याचा तिचा उद्देश आहे. नैतिक अंमलबजावणी आणि सामाजिक प्रभावावर जोरदार भर देऊन भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक आणि जबाबदार एआय अवलंब करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे एकविसाव्या शतकातील सर्वांत प्रभावी तंत्रज्ञान आहे आणि भारताने त्याचा उपयोग करून सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देण्याचा निर्धार केला आहे. 'एआय फॉर इंडिया २०३०' हे धोरण भारताच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताकडे काही नैसर्गिक फायदे आहेत. विपुल सूर्यप्रकाश सौर ऊर्जेसाठी भरपूर प्रशिक्षित मनुष्यबळ, तुलनेने कमी कामगार खर्च, मोठा डिजिटल युजर बेस यांचा या दृष्टिकोनातून फायदा घेता येईल. असे असले तरी भारतासमोरील डाटा सेंटर संस्कृतीच्या विस्तारापुढे काही मोठी आव्हाने आहेत. वीज पुरवठ्यातील अस्थिरता (ग्रामीण भागात), पाणीटंचाई, सायबर सिक्युरिटी धोके, कुशल मनुष्यबळ आणि सामान्य लोकांमध्ये आढळणारी डिजिटल दरी या आव्हानांचा या दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# सेवातीर्थ

देशाच्या लोकशाही प्रवासात काही क्षण असे येतात, जे केवळ प्रशासकीय निर्णय म्हणून नोंदविले जात नाहीत, तर येणाऱ्या काळाच्या दिशादर्शक म्हणून इतिहासात कोरले जातात. पंतप्रधान कार्यालयाचे नाव 'सेवातीर्थ' असे ठेवण्याचा निर्णय हा तसाच अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी क्षण आहे. 'सरकार' म्हटलं की अनेकांच्या मनात आजही दुरावा, कठोरपणा आणि आदेशांची प्रतिमा उभी राहते. पण लोकशाहीत शासन हे लोकांपासून वेगळे नसते. शासन म्हणजेच लोकसेवा, लोकांची इच्छा, लोकांचा विश्वास. 'सेवातीर्थ' हे नाव या नात्याला नव्या पवित्रतेची, नव्या ऊर्जेची दिशा देत आहे. तीर्थ म्हणजे काय? तीर्थ हा फक्त धार्मिक शब्द नाही. तीर्थ म्हणजे मनाला शांत करणारी जागा, तीर्थ म्हणजे पारदर्शकता, तीर्थ म्हणजे विश्वासाची शुद्धता. जेव्हा देशातील सर्वांत महत्त्वाची कार्यालये, जिथे राष्ट्राचे मोठमोठे निर्णय घेतले जातात, त्या ठिकाणाला 'सेवातीर्थ' म्हणतात. तेव्हा हा बदल फक्त शब्दांच्या पातळीवर राहत नाही. या शब्दात शासनाची संपूर्ण विचारसरणी गुंफलेली आहे. आम्ही सत्तेसाठी नाही, सेवेच्या पवित्र भावनेसाठी आहोत.

राजभवन ते लोकभवन हा शब्दाचा प्रवास दुराव्याऐवजी आपुलकी निर्माण करते. 'राजभवन' या नावात एक राजेशाहीपणा, एक अंतर, एक बंद दरवाजा जाणवतो. पण 'लोकभवन' म्हटले की प्रथमच मनात जवळीक निर्माण करते. हे भवन राजाचे नाही, लोकांचे आहे, लोकांसाठी आहे. हे त्या भवनाच्या नावावरूनच स्पष्ट होते. नावे बदलणे ही केवळ बाह्य गोष्ट नाही. नाव म्हणजे ओळख आणि ओळख म्हणजे विचार. जेव्हा सरकारी इमारतींची नावे 'लोकनिवास', 'कर्तव्य भवन', 'लोक कल्याण मार्ग' अशी ठेवली जातात, तेव्हा त्या शब्दांनीच प्रशासनाचे उद्दिष्ट स्पष्ट होते. या बदलातून सरकार हे सांगू पाहते की, शक्ती हे लक्ष्य नाही; सेवा हीच खरी शक्ती आहे. नागरिक अनुभवतात ती भावना बदलण्याची गरज आज निर्माण झाली आहे. आजही अनेक साधे नागरिक सरकारी कार्यालयात जाताना मनात एक दडपण, भीती, चिंता घेऊन जातात. तिथे पोहोचताच जडपणा जाणवतो. काऊंटर, पायऱ्या, नियम, रांगा जणू सेवा नव्हे, तर परीक्षा सुरू आहे. पण जर कार्यालयाचे नावच 'सेवातीर्थ' असेल, 'कर्तव्य भवन' असेल, 'लोकभवन' असेल, तर मनात जाणवणारा भाव बदलतो. नागरिकाला जाणवते की, मी इथे मागणी करायला नाही, हक्काने सेवा मिळवायला आलो आहे. एखाद्या तीर्थस्थळी गेल्यावर जशी निर्मळता, शांतता, विश्वास आणि मन:शांती मिळते, तशीच अनुभूती सरकारी कार्यालयातही मिळावी, हा या संकल्पनेचा गाभा आहे. सेवाभाव हा शासनाचा आत्मा आहे, हे विसरून चालणार नाही. शासनाचे खरे सामर्थ्य आदेशात नसते, तर सामान्य माणसाच्या चेहऱ्यावर समाधान आणण्यात असते. सेवा, कर्तव्य, पारदर्शकता, उत्तरदायित्व ही मूल्ये आजच्या लोकशाहीची खरी गरज आहे. 'सेवातीर्थ' या नावातून जणू शासन स्वत:लाच स्मरण करून देत आहे की, निर्णय कितीही मोठे असले, तरी ते जनतेच्या कल्याणासाठीच आहेत. बदल फक्त इमारतींचा नसून मानसिकतेचा आहे.

सरकारने घेतलेला हा निर्णय प्रशासकीय नसून सांस्कृतिक आहे. समाजाच्या विचारांमध्ये, शासनाकडून अपेक्षांमध्ये आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीत 'सेवा' ही भावना केंद्रस्थानी यावी, हा मुख्य उद्देश आहे. एखाद्या राष्ट्राला सर्वांत मोठा आधार असतो तो विश्वासाचा. विश्वास हरवला की लोकशाही कोसळते आणि विश्वास निर्माण झाला की देश प्रगतीच्या शिखरावर जातो. 'सेवातीर्थ' हे नाव हा विश्वास पुन्हा दृढ करण्याचा प्रयत्न आहे. शासन आणि जनता यांच्यातील नातं 'दूरचे' नाही, 'आपले' आहे, हे या नावातून स्पष्ट होते. नावात बदल करून शासनाने लोकांमध्ये विश्वासाचे टाकलेले हे एक पाऊल आहे. शासनाच्या इमारती कितीही भव्य असोत, त्यांची भव्यता लोकांच्या मनात निर्माण होणाऱ्या विश्वासावरच टिकून असते. 'सेवातीर्थ' हा शब्द त्या विश्वासाचा दीपस्तंभ आहे. सेवातीर्थ हे नाव सांगते की, इथे सत्ता नाही, सेवा आहे. इथे बंद दरवाजे नाहीत, खुली मनं आहेत. इथे अधिकार नाही, कर्तव्य आहे. सरकारचे हे पाऊल म्हणजे केवळ नावात बदल करणे नसून सेवा हीच लोकशाहीची ओळख आहे, हे स्पष्टपणे सांगण्याचा प्रयत्न आहे, ही जाणीव नव्याने दृढ करणारा एक ऐतिहासिक क्षण आहे. आणि म्हणूनच जिथे सेवा तीर्थासारखी पवित्र वाटते, तिथेच खरा 'सेवातीर्थ' जन्म घेतो.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# आता भाजपाचे मिशन पश्चिम बंगाल

बिहार विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळाल्यानंतर भाजपाचे लक्ष आता पश्चिम बंगालकडे लागले आहे. पश्चिम बंगालमध्ये पुढील वर्षी, २०२६ मध्ये विधानसभा निवडणूक होत आहे. २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भरधाव निघालेल्या विजयरथाला यावेळी कोणत्याही स्थितीत पश्चिम बंगाल काबीज करायचे आहे.

देशात जी काही मोजकी राज्ये आहेत, ज्यात भाजपाला आतापर्यंत कधीच विजय मिळाला नाही, त्यात पश्चिम बंगाल हे एक आहे. त्यामुळे यावेळी त्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत भाजपा करो वा मरोच्या जिद्दीने उतरणार आहे. त्याचे संकेत मोदी यांनी बिहार विधानसभा निवडणुकीतील निकालानंतर दिले. गंगा नदी ज्याप्रमाणे बिहारमधून निघून पश्चिम बंगालमध्ये प्रवेश करते, त्याचप्रमाणे भाजपाची विजय यात्रा आता पश्चिम बंगालमध्ये प्रवेश करत त्यात दीदीला (ममता बॅनर्जी) वाहून घेऊन जाईल, असे म्हटले आहे. मोदी यांच्या या प्रतिक्रियेतून पश्चिम बंगाल भाजपासाठी किती महत्त्वाचे आहे, याची कल्पना येते. बिहारमधील गंगा नदी यशस्वीपणे पार केल्यानंतर भाजपा आता पश्चिम बंगालमधील हुबळी नदी आपल्या ताब्यात घेण्याच्या प्रयत्नात आहे, असे म्हणावे लागेल. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात बुधवारी मोदी यांनी संसदभवनात पश्चिम बंगालमधील भाजपाच्या खासदारांची भेट घेत त्यांना विजयाचा कानमंत्र दिला. देशात पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू ही दोनच राज्ये अशी आहेत, ज्यात भाजपाला आतापर्यंत एकदाही विजय मिळवता आला नाही. तामिळनाडूच्या तुलनेत गेल्या काही वर्षांत पश्चिम बंगालमधील भाजपाच्या स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदा भाजपाला उल्लेखनीय यश मिळाले. त्यामुळे २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या आशा उंचावल्या. मात्र त्यावेळी भाजपाला सत्तेपर्यंत पोहोचता आले नाही. मात्र २०१६ च्या तुलनेत भाजपाच्या मतांत आणि जागांत लक्षणीय वाढ झाली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील ४२ पैकी तृणमूल काँग्रेसने २२ तर भाजपाने १८ जागा जिंकल्या. काँग्रेसला फक्त २ जागांवर समाधान मानावे लागले. तृणमूल काँग्रेस आणि भाजपा यांच्या मतांत फक्त ३ टक्क्यांचा फरक होता. तृणमूल काँग्रेसला ४३.२७ टक्के मते मिळाली तर भाजपाला ४०.२५ टक्के. तृणमूल काँग्रेसला २ कोटी ४७ लाख ५६ हजार ९८५ मते मिळाली, तर भाजपाला २ कोटी ३० लाख २८ हजार ३४३ मते मिळाली. याचाच अर्थ भाजपाने राज्यातील आपल्या जनाधारात चांगलीच वाढ केली.



२०१४ च्या लोकसभा निवडणुकीशी तुलना केली तर तृणमूल काँग्रेसच्या या निवडणुकीत १२ जागा कमी झाल्या, तर भाजपाच्या १६ जागा वाढल्या. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने ३४ तर भाजपाने २ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसला या निवडणुकीत ४ जागा मिळाल्या होत्या.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला २९ तर भाजपाला १२ जागा मिळाल्या होत्या. २०१९ च्या तुलनेत तृणमूल काँग्रेसच्या ७ जागा वाढल्या, तर भाजपाच्या ६ जागा कमी झाल्या. तृणमूल काँग्रेसने भाजपाच्या तुलनेत १७ जागा जास्त जिंकल्या तरी तृणमूल आणि भाजपाच्या मतांत फार जास्त फरक नाही. तृणमूल काँग्रेसला २ कोटी ७६ लाख ७४ हजार १३३ मते मिळाली, तर भाजपाला २ कोटी ३४ लाख ३१ हजार ८१ मते पडली.

बिहारच्या विधानसभा निवडणुकीत मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाचा (एसआयआर) मुद्दा चांगलाच गाजला होता. या मुद्यावरून विरोधी पक्षांनी निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला होता. पण बिहारच्या सुजाण मतदारांनी एसआयआरच्या बाजूने आपला कौल देत हा प्रयत्न हाणून पाडला. आता पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या मुद्यावरून आकाशपाताळ एक करत आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकांचा आढावा घेतला तर पश्चिम बंगालमध्ये भाजपाची ताकद किती वेगाने वाढली, याचा आपल्याला अंदाज येऊ शकेल. २०११ च्या विधानसभा निवडणुकीत २८९ जागा लढवणाऱ्या भाजपाला एकही जागा जिंकता आली नाही, भाजपाला यावेळी ४.०६ टक्के मते मिळाली होती. या निवडणुकीतून ममता बॅनर्जी यांनी राज्यातील डाव्या पक्षाची राजवट उलथून लावत पहिल्यांदा तृणमूल काँग्रेसची सत्ता आणली होती.

२०१६ च्या विधानसभा निवडणुकीत ३ जागा जिंकत राज्यात प्रथमच भाजपाने आपले खाते उघडले. यावेळी भाजपाच्या मतांची टक्केवारी १०.१६ होती. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीतून तर भाजपाने राज्यात इतिहास घडवला. या निवडणुकीत सलग तिसऱ्यांदा आपल्याकडे सत्ता कायम ठेवण्यात तृणमूल काँग्रेसने यश मिळवले असले तरी भाजपाला मिळालेला विजय नेत्रदीपक म्हटला पाहिजे. राज्यातील विधानसभेच्या सर्व म्हणजे २९३ जागा लढवत भाजपाने ७७ जागा जिंकल्या. भाजपाने ७४ जागा जास्त जिंकल्या, हा एक विक्रम म्हटला पाहिजे. भाजपाच्या मतांची टक्केवारी ३७.९७ होती. भाजपाला २ कोटी २८ लाख ५० हजार ७१० मते मिळाली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या विजयाचा हा परिणाम होता. या लोकसभा निवडणुकीत भाजपाने १८ जागा जिंकत २ कोटी ३० लाख २८ हजार ३४३ मते मिळवली होती. लोकसभा निवडणुकीत मिळालेली मते विधानसभा निवडणुकीत कायम ठेवण्यात भाजपाला यश आले. भाजपाने कधीपासूनच पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांना भाजपाने निवडणूक प्रभारी तर त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिप्लबकुमार देव यांना सहप्रभारी बनवले आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपासमोर खरे आव्हान सलग तीन विधानसभा निवडणूक जिंकणाऱ्या राज्याच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांचे आहे. ममता बॅनर्जी अतिशय आक्रमक नेत्या आहेत. त्यांचे संपूर्ण राजकारण हे मुस्लिम तुष्टीकरणाचे आहे. त्यामुळे एसआयआरच्या मुद्यावरून त्या आकाशपाताळ एक करत आहेत. देशातील राजकारणात सर्वांत धूर्त आणि आक्रमक नेत्या अशी ममता बॅनर्जी यांची ओळख आहे. शरद पवार देशातील सर्वांत धूर्त, चाणाक्ष आणि मुत्सद्दी नेते म्हणून ओळखले जातात. पण सात शरद पवार बरोबर एक ममता बॅनर्जी अशी प्रतिक्रिया एका ज्येष्ठ भाजपा नेत्याने व्यक्त केली आहे. त्यामुळे यावेळची निवडणूक भाजपासाठी अतिशय आव्हानात्मक आहे. मात्र अशा अनेक आव्हानांचा सामना करणे हा नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या डाव्या हाताचा खेळ आहे, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

## आजचे संघगीत-६२

गुरुवार, ४ डिसेंबर २०२५

### एक अंतरी आस आमुच्या मुखांत एकच गान

एक अंतरी आस आमुच्या मुखांत एकच गान

एक अंतरी आस आमुच्या मुखांत एकच गान
देशासाठी उधळू हासत फुलापरी हे प्राण ॥धृ.॥

एक आमुची आई भारत अम्ही लेकरे सारी
भरत देश हा देव आमुचा आम्ही सर्व पुजारी
आम्ही सगळे एक इथे नच कुणिहि थोर वा सान ॥१॥

भरतखंड हा सागर आम्ही बिंदु जलाचे त्यांत
किरणे आम्ही भारत अमुचा सूर्य नभात
आम्ही सगळे एक आमुचा एक असे अभिमान ॥२॥

असंख्य पाने अगणित शाखा वृक्ष तरीही एक
हजार जाती पंथ लक्ष तरि पिंड आमुचा एक
आम्ही सगळे एक कुणी नच रंक राव धनवान ॥३॥

मनामनांतुनि देशभक्तिची ज्योत तेवते एक
देह भिन्न तरि नसांनसांतुनि रक्त खेळते एक
आम्ही सगळे एक आमुचे भगवे एक निशाण ॥४॥

## लोकसभा चर्चेसाठी, भांडण्यासाठी नव्हे

आजकाल पहिल्याच दिवसापासून कामकाज करण्यापेक्षा, सभागृहात फलक घेऊन निरर्थक घोषणाबाजी करण्यातच देशातील विरोधी पक्ष धन्यता मानतात. हे त्यांच्याकडे कुठलेच रचनात्मक किंवा योग्य मुद्दे नसल्याचे द्योतक आहे. केवळ जनमानसात आपली स्मृती राहावी म्हणून ते असे लक्षवेधक मुद्दे घेत असावेत. सध्याचे सर्वच विरोधी पक्ष हताश झाले असावेत, असे वाटायला बराच वाव आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे चुकीचे व अतार्किक विषय घेऊन सरकारशी भांडण्यात प्रसिद्ध आहेत, पण त्याचबरोबर तेजस्वी यादव, अखिलेश यादवसारखे युवा नेता, जे नैराशाने ग्रासलेले वाटतात व ते सुद्धा त्यांना साथ देतात व जनतेत आपले हसू करून घेतात. देशाचे काहीही होवो, पण मोदींना सर्वच मुद्यांवर विरोध करावा, हे त्यांचे धोरण म्हणजे, 'नवरा मेला तरी चालेल, पण सवत विधवा झालीच पाहिजे', असे मूर्खपणाचे वाटते. देशाचे महत्त्वाचे मुद्दे, प्रश्न व प्रगतीविषयी सांगोपांग चर्चा करण्यासाठी लोकसभा आहे. तेथील कामकाजावर जनतेचा खूप पैसा खर्च होतो. लोकसभेच्या आत होणाऱ्या गोंधळावर देशाचे अतोनात नुकसान होते, हे विरोधी पक्षांना कळत नसावे काय? भारतात घराणेशाहीपेक्षा रचनात्मक विचार असणारे विरोधी पक्ष वाढावे व देशाच्या विकासात त्यांचा सहभाग असावा, ही इच्छा.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### लग्नात खर्च नव्हे, संस्कार दिसायला हवेत!

सध्या लग्न म्हटले की दागदागिने, महागडे कपडे, उंची भेटवस्तू, विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, महागडे डेकोरेशन, सेलिब्रिटी मेकअप, डीजे आणि त्यासमवेत मद्याच्या मेजवान्या या सर्व गोष्टी ओघाने येतात. अनेक ठिकाणी तर 'वेडिंग प्लॅनर' आणि 'डेस्टिनेशन वेडिंग' हीसुद्धा नवी फॅशन झाली आहे. आज महागाई वाढत असूनही राज्यासह देशाच्या अनेक भागांत विवाह हा केवळ धार्मिक विधी राहिला नसून श्रीमंती, प्रतिष्ठा आणि प्रदर्शनाचा कार्यक्रम बनला आहे. एका दिवसातील विवाह सोहळ्यात काही लाखांपासून ते काही कोटी रुपयांपर्यंत खर्च होताना दिसतो. शोध सांगतात की देशातील सुमारे ३० टक्के तरुण लग्नासाठी कर्ज घेतात आणि ते फेडण्यासाठी अनेक वर्षे झगडतात. काही जण केवळ रूढी किंवा समाज काय म्हणेल या भीतीने खर्च करतात, तर काही जण 'स्टेटस' टिकवण्यासाठी मागे कर्जाचे डोंगर उभे करतात. ही उधळपट्टी केवळ आर्थिक भार वाढवत नाही, तर सामाजिक असमानता, दिखावा आणि मानसिक ताणही वाढवते. या पृष्ठभूमीवर उत्तराखंडमधील जौनसर-बावर या प्रदेशातील लोकांनी एक अतिशय अनुकरणीय निर्णय घेतला आहे आणि आज तो संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनला आहे. या भागातील परंपरा, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्य आजही टिकून आहे. तेथे अनेक ठिकाणी पांडवकालीन न्यायव्यवस्थेचे पालन होते असे मानले जाते. येथील २५ गावांनी मिळून एकत्रितपणे असा नियम केला आहे की लग्नात महागडी सजावट, दारू, फास्ट फूड आणि अतिखर्ची वस्तूंवर संपूर्ण बंदी, नियम मोडणाऱ्यांना १ लाख रुपयांचा दंड, महिलांनी लग्नात केवळ तीन पारंपरिक दागिनेच वापरायचे. जरी या गावांची आर्थिक क्षमता चांगली आहे, तरीही त्यांनी ठरवले की 'लग्नात खर्च नव्हे, संस्कार दिसायला हवेत.' विवाह सोहळा संस्कार म्हणून केला तर पुढे दोघांचेही आयुष्य सुरळीत सुख-समृद्धीचे होऊ शकते. लग्नात डेकोरेशन, मेकअप, नाच-गाणे यामुळे मुहूर्तावर लग्न लागत नाही. विवाह हा जीवनातील अत्यंत पवित्र संस्कार आहे. तो क्षणिक दिखावा, प्रतिष्ठेची स्पर्धा किंवा आर्थिक ओझे बनू नये. समाजात सुरू झालेली साधेपणाची ही चळवळ केवळ आर्थिकच नव्हे, तर नैतिक आणि सांस्कृतिक जागृतीचे प्रतीक आहे. जर देशभरात अशा विचारांची रुजवण झाली, तर विवाहसोहळे पुन्हा संस्कार, कुटुंब प्रेम आणि अध्यात्माने भरलेले होतील. दिखावा, कर्ज आणि ताणाने नव्हे.

**रमा देशमुख**/नागपूर

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# टेंभुर्णीत भरधाव सिमेंट मिक्सरची दुचाकीस धडक; ज्येष्ठ महिलेचा मृत्यू

## अतिक्रमण, बेशिस्त वाहतूकीमुळे वारंवार घडतात अपघात



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.३ डिसेंबर-**

येथील करमाळा चौकात भरधाव वेगाने आलेल्या पिवळ्या रंगाच्या सिमेंट मिक्सरने पाठीमागून दुचाकीस जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाला. त्यांचे पती किरकोळ जखमी झाले. हि घटना सायंकाळी पाच वाजता घडली.

लंकाबाई ज्ञानदेव गदादे (वय ५७, रा. बिजवडी रोड, इंदापूर) असे ठार झालेल्या महिलेचा नाव असून त्यांचे पती ज्ञानदेव गदादे (वय ६०) हे जखमी झाले आहेत. पोलीस सूत्रानुसार ज्ञानदेव व लंकाबाई गदादे हे त्यांच्या यामाहा दुचाकीवरून (एमएच-४२-आर-८००७) पत्नीच्या भाचीस भेटण्यासाठी माढा तालुक्यातील वेणेगाव येथे गेले होते. त्यानंतर टेंभुर्णी येथील कुटे वस्तीवर लंकाबाई यांच्या बहिणीला भेटून ते इंदापूरकडे परतत असताना सायंकाळी सुमारे पाच वाजता करमाळा चौकात हा अपघात झाला. पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या सिमेंट मिक्सरने दुचाकीस जोरात धडक दिली. धडकेनंतर लंकाबाई गदादे यांच्या पायावरून मिक्सरचे चाक गेल्याने त्यांचा पाय अक्षरशः चेंदामेंदा झाला. त्या रस्त्यावर जोरात आदळून गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने अकलूज येथे उपचारासाठी नेत असताना रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पतीस बाजूला पडल्याने किरकोळ जखमा झाल्या आहेत. दरम्यान, टेंभुर्णी शहर हे अनेक महामार्गांनी जोडलेले असल्याने येथे दुचाकी, चारचाकी, मालट्रक, कंटेनर, सिमेंट बल्कर, अवजड वाहने, शाळेची वाहने तसेच सध्या उसाचे कारखाने चालू झाल्यामुळे ऊस वाहतुकीच्या वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.


मात्र, टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे ट्राफिक पोलीस याकडे दुर्लक्ष करत असल्याने वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन, भरधाव वेग, उलट दिशेने वाहने चालविणे, रस्त्यावरील अतिक्रमण व चढ्या-उतार ठिकाणी उभ्या असलेल्या वाहनांमुळे नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. लहान मुले व वृद्धांना रस्ता ओलांडताना मोठी कसरत करावी लागते. करमाळा चौकात स्पीड ब्रेकरचा अभाव, नियमित वाहतूक पोलिसांची नेमणूक नसणे आणि अतिक्रमणांवर कारवाई न होणे यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. या घटनेनंतर टेंभुर्णी शहरातील बेशिस्त वाहतुकीवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# उमेदवारांना निकालाचे तर प्रशासनाला मतदान यंत्राचे टेन्शन

## तब्बल १८ दिवस प्रतिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ डिसेंबर -**

पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीसाठी मंगळवारी मतदान झाले. मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या धक्कादायक निर्णयामुळे मतमोजणी लांबणीवर पडली आहे. त्यामुळे मतमोजणीपर्यंत मतदानयंत्रे सांभाळण्याची प्रशासनाची डोकदुखी होवून बसली आहे. दुसरीकडे स्ट्राँगरुम बाहेर २४ तास पहारा देण्याची जरी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना मुभा मिळाली असली तरी निवडणूक निकालाच्या प्रतिक्षेत तब्बल १८ दिवस टेन्शन सहन करीत त्यांना घालवावे लागणार आहेत.



पंढरपूर नगरपरिषद निवडणूकी मध्ये नगराध्यक्ष व ३५ नगरसेवक पदांसाठी मंगळवारी २ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात आले. या मध्ये तब्बल ६४.३४ टक्के इतके मतदान झाले आहे. दरम्यान सुरुवातीच्या निवडणूक आयोगाच्या प्रोग्रॅम नुसार मतमोजणी बुधवारी ३ डिसेंबर रोजी करण्यात येणार होती. मात्र राज्यातील काही नगरपरिषदांच्या निवडणुका २० डिसेंबर रोजी होणार आहेत. त्यामुळे या निकालाचा परिणाम इतर नगरपरिषदांच्या निवडणुकीवर होणार असल्यामुळे नागपूर खंडपीठामध्ये या बाबतची हरकत घेऊन याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी नागपूर खंडपीठाच्या न्यायमुर्तींनी राज्यात २ डिसेंबर रोजी मतदान झालेल्या सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायतीची मतमोजणी येत्या २१ डिसेंबर रोजी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीची मतमोजणी आता २१ डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे. त्यामुळे मतदान प्रक्रिये नंतर सर्व मतदान यंत्रे पंढरपूर येथील शासकीय गोदामातील स्ट्राँग रूम मध्ये ठेवण्यात आली आहेत. या रूमला पोलिसांचा २४ तास पहारा ठेवण्यात आला आहे.

दुसरीकडे मतदानयंत्र छेडछाडीच्या कोणत्याही तक्रारी उपस्थित होवू नयेत यासाठी निवडणूक आयोगाने या स्ट्राँग रूमला राजकीय पक्षाचे प्रतिनिधी व कार्यकर्ते यांना देखील पहारा देण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. दरम्यान मतमोजणी लांबणीच्या न्यायालयाच्या निर्णया मुळे केवळ प्रशासनाची नाही तर राजकीय पक्षांची देखील मोठी डोकेदुखी होऊन बसली आहे. कारण निकालाच्या प्रतिक्षेचे टेन्शन घेऊन एक नाही, दोन नाही तर तब्बल १८ दिवस राजकीय पक्षाच्या मंडळींना व्यथित करावे लागणार आहेत. तर ऐवढे दिवस ही यंत्रे सांभाळण्याचे शिवधनुष्य स्थानिक प्रशासनाला पेलावे लागणार आहे.



# पडसाळी येथील कै. विठ्ठलरावजी शिंदे विद्यालयात १६ सायकलींचे वाटप

**मोडनिंब,दि.३ डिसेंबर-**

पडसाळी (ता.माढा) येथील कै. विठ्ठलरावजी शिंदे माध्यमिक विद्यालय येथे पंचायत समितीच्या मागासवर्गीय सेस फंडातून गरजू विद्यार्थ्यांना १६ सायकली प्रदान करण्यात आल्या. या सायकलींमुळे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन प्रवासातील अडचणी कमी होऊन शाळेतील उपस्थितीत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास डॉ. संतोष दळवी यांनी व्यक्त केला.

गावाला शाळेचा अभिमान असावा आणि शाळेला गावाचा अभिमान असावा. सर्वांनी शाळेवर प्रेम करावे आणि विद्यार्थ्यांनी शिक्षणामध्ये प्रगती साधावी. तसेच, इतर गरजू विद्यार्थ्यांसाठी रोटरी क्लब मोडनिंब आणि तेजस हेल्थ फाउंडेशनमार्फत शैक्षणिक साहित्य किंवा सायकली उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. या कार्यक्रमासाठी भेंडचे माजी सरपंच डॉ. संतोष दळवी, उपसरपंच प्रवीण गायकवाड, दत्ता फरड, अण्णासाहेब मुटकुळे पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन फरड, तसेच परशुराम थोरात आणि राहुल थोरात उपस्थित होते.

सुत्रसंचालन अमर परबत यांनी केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन फरड यांनी आभार मानले.

# मरवडेतून ७ शेळ्या चोरट्याने चोरल्या

**मंगळवेढा दि.३ डिसेंबर-**

मरवडे येथे घराच्या शेजारी पत्राशेड मध्ये बांधलेल्या ५० हजार रुपये किंमतीच्या ७ शेळ्या व ३ लहान पाटी व २ बोकडे चोरट्याने चोरुन नेल्याची घटना घडली असून या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी चंद्रकांत मधुकर गुरव (रा.मरवडे) यांच्या घराशेजारी पत्राशेड मध्ये ५० हजार रुपये किंमतीच्या ७ शेळ्या व ३ पाटी, २ बोकडे अशी बांधले होती. दि.३ डिसेंबरच्या पहाटे २.३० वाजता चोरट्याने चोरुन नेले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार मनोज खंडागळे हे करीत आहेत.

# गटविकास अधिकाऱ्यांचे आजपासून सामूहिक रजा आंदोलन

## जिल्हा परिषदेचे कामकाज होणार ठप्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर**

वर्धा जिल्ह्यातील आर्वी पंचायत समितीत मनरेगा योजनेत झालेल्या कथित अपहार प्रकरणात केवळ एका कंटाटी कर्मचाऱ्यांच्या साक्षीने गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांच्यावर गुन्ह्यात सहभागी असल्याचा ठपका ठेवत २ डिसेंबर रोजी रात्री उशिरा कोणतीही प्राथमिक, प्रशासकीय चौकशी न करता वरिष्ठ अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी न घेता अटक करण्यात आली. महिला अधिकारी असल्याने आवश्यक असलेल्या कायदेशीर व प्रक्रियात्मक सावधगिरीची उपेक्षा झाल्याचा आरोप आंदोलनात सहभागी असणाऱ्या महाराष्ट्र विकास सेवेतील आंदोलक अधिकाऱ्यांनी केला आहे.

पंचायत समितीसह जिल्हा परिषद मुख्यालयातील सर्वच अधिकारी या रजा आंदोलनात सहभागी झाल्याने जिल्हा परिषदेचे कामकाज आजपासून ठप्प होणार आहे. वर्धा जिल्ह्यातील आरवी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांच्या अटकेच्या निषेधार्थ महाराष्ट्र विकास सेवा संघटनेच्या बॅनर खाली पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकाऱ्यांनी आज गुरुवार ४ ते शनिवार ६ डिसेंबर दरम्यान सामूहिक रजा आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनात जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचाही सहभाग असणार आहे.

याप्रकरणी सोमवार ९ डिसेंबर पर्यंत शासनाने सकारात्मक निर्णय नाही घेतल्यास महाराष्ट्र विकास सेवेतील सर्व अधिकारी तीव्र आंदोलन करतील असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आला आहे.

या संदर्भात बुधवारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रकांत जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, विवेक जमदाडे, अमोल जाधव, शंकर कवितके, अमित कदम, उमेश कुलकर्णी, राजाराम भोग, मनोज राऊत, महेश सुळे, जस्मिन शेख आदी उपस्थित होते.






**जाहीर प्रसिध्दीकरण**

**संजय भोसले, तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण माढा यांचे कोर्टात**

क्रमांक-२०२५/कु.का./७०ब/एसआर नं.-/कावि-५५१ दि. २८/११/२०२५

१. श्री अर्जुन विठोबा शिंदे
२.श्री बालीजी विठोबा शिंदे
रा. शिंदेवाडी ता. माढा जि. सोलापूर -- वादी

**विरुद्ध**

१. श्री रंगनाथ धोंडीबा शिंदे रा. शिंदेवाडी
ता. माढा जि. सोलापूर -- प्रतिवादी

**(मुंबई कुळवहीवाट शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७० ब अन्वये दावा मिळकतीचा तपशील)**

| गावाचे नाव | जमीन गट नंबर | क्षेत्र (हे.आर) | पोट खराब (हे.आर) | आकार (रु. पे.) |
|---|---|---|---|---|
| शिंदेवाडी | ६४/१ | १ हे ४६ आर | ०.०१ | २.०० |
| शिदेवाडी | ६४/२ | १ हे ४६ आर | ०.०२ | २,०० |
| शिंदेवाडी | ८९ | ० हे ३७ आर | ०.०० | ०.४५ |

तुम्हास या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील जमीनीबाबत वादी क्रमांक १ व २ यांनी इतर हक्कातील उपरोक्त गटाच्या ७/१२ वरील रंगनाथ धोंडीबा शिंदे साधे कुळ यांची कुळ म्हणून असलेली नोंद कमी करण्याबाबत विनंती केलेली आहे. प्रकरणी सुनावणी कामी ठेवलेल्या तारखेस हजर राहणेकामी ग्राम महसूल अधिकारी शिंदेवाडी यांचेमार्फत रितसर नोटीस बजावली असता यातील प्रतिवादी हे मौ. शिंदेवाडी येथे रहिवाशी नसून त्यांचे वास्तव्य गावात नाही, असा अहवाल पंचनाम्यासह या कार्यालयास सादर केलेला आहे, त्या अनुषंगाने मुंबई कुळवहीवाट शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७० ब अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार चौकशी सुरु असून त्याबाबत सदरची जाहीरात प्रसिध्दीकरण केल्यापासून एक महीना (तीस दिवस) चे आत संबंधित सर्व हितसंबंधित यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह वादी तसेच प्रतिवादी कुळ अथवा त्यांचे वारस यांनी इकडील कोर्टात माझ्या समक्ष हजर राहून लेखी म्हणने सादर करावे अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन पुढील आवश्यक ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**तहसिलदार माढा**

**जाहीर नोटीस** दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८१०/२०२५
पुढील तारीख ०८/०१/२०२६

**सोलापुर येथील मे. जॉ. सिव्हील जज्ज, ज्युनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात.**
**(श्रीमती पी.डी.चव्हाण सो)**

**श्री. चंद्रकांत गुरुपाद लिंबीतोटे,**
वय : ६७ वर्षे, धंदा : पेन्शनर, --अर्जदार
रा. कुमठे, ता. उत्तर सोलापुर, जि. सोलापुर

**विरुध्द**

**१) श्रीमती विजया शशिकांत टिकेकर,**
वय : ८६ वर्षे, धंदा : घरकाम
रा. टिकेकरवाडी, ता. उत्तर सोलापुर, जि. सोलापुर --सामनेवाले
**२) सुबोध शशिकांत टिकेकर,** (मयत दिनांक ०३/०३/२०२०)

ज्याअर्थी अर्जदार यांनी सामनेवाले यांचे नावे किरकोळ अर्ज नं. २८८/२०१६ मधील निकाल ता. ०९/१२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आलेले हेअरशिप सर्टीफिकेट रद्द होवून मिळण्यासाठी हल्लीचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, त्या अर्जास म्हणणे देण्यासाठी, तुम्ही सामनेवाली यांनी स्वतः अगर अधिकृत एजंटमार्फत दिनांक ०८/०१/२०२६ रोजी अगर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या अर्जाच्याकामी हजर होवून आपले म्हणणे व कागदपत्रे सादर करावीत. सदर मुदतीत तुम्ही हजर होवून प्रकरणात म्हणणे सादर न केल्यास तुमचे विरुध्द एकतर्फा चौकीशीचे आदेश करुन प्रकरणाचा चौकशीअंती अंतीम निकाल दिला जाईल. तद्नंतर कोणाचीही, कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही, आज दिनांक ०३ माहे डिसेंबर इसवी सन २०२५ रोजी आमचे सहीनिशी आणि कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले.

कनिष्ठ लिपीक | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर, सोलापुर**

**जाहीर प्रसिध्दीकरण** दिवाणी किरकोळ अर्ज नं ५५/२०२५

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**महानंदा भिमाशंकर गुंजोटी** --अर्जदार

**विरुध्द**

**कोमल महादेव गुंजोटी व इतर** --सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदारांने अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात अर्जदाराची सुन कोमल महादेव गुंजोटी, पांडूरंग पिता महादेव गुंजोटी, मयूर पिता महादेव गुंजोटी यांचे गैरअर्जदार नं.१ चे पती व गैरअर्जदार नं.२ व ३ यांचे वडील दि.२१/०२/२०२४ रोजी अपघाती मयत झाले असून, कोमल महादेव गुंजोटी हीस दोन अपत्ये असून, त्यांच्या पश्चात कायदेशीर वारसदार म्हणून यातील सामनेवाले नं.१ ही सध्या परपुरुषाशी लग्न केले असून, ते कायदेशीरदृष्ट्या वारसदार म्हणून होऊ शकत नाही, म्हणून तसा मे. कोर्टाकडून आदेश होणेकरिता व त्याकरिता या मे. कोर्टाकडे सदरचा वारसा दाखला प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअधी याबाबत यातील सामनेवाला नं.१ व इतर कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत अथवा नेमलेल्या तारखेस दिनांक १७/१२/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. ही जाहीर प्रसिध्दीकरण केले दिनांक :-०३/१२/२०२५

कनिष्ठ लिपीक | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सह. अधिक्षक** **दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**

**तहसिल कार्यालय बार्शी**
(कुळ कायदा शाखा)
दूरध्वनी क्र. (०२१८४) २२२२१३ email-tahbarsh@gmail.com

**क्र. कुळकायदा/क.१४, १५/एसआर-१६/२५** **दिनांक - ०३/१२/२०२५**

**जाहीर समन्स / वृत्तपत्राव्दारे**

प्रति,
१. राजकुमार भैरु गव्हाणे **अर्जदार**
रा.खांडवी ता. बार्शी

**विरूध्द**

१. त्रिंबक दौलता भाकरे
२. गोपाळ बाळा गव्हाणे **सामनेवाले**
३. नामदेव बाबु भाकरे
४. म. इसाक, म. इब्राहिम अपाक शेख
मं. इब्राहिम लालमहंमद सर्व रा. खांडवी ता. बार्शी

**मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये चौकशी**

**-: दावा जमीनीचे वर्णन :-**

| गावाचे नांव | गटनंबर | क्षेत्र हे. आर. | पो.ख. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| खांडवी | ६९९ | १.३६ | ०.०० | ४.१९ |
| | ७०६/१ | ३.७१ | ०.०२ | ११.३९ |

दावा जमीनीबाबत अर्जदार यांनी दावा मिळकतीच्या इतर हक्कातील त्रिंबक दौलता भाकरे, गोपाळ बाळा गव्हाणे, नामदेव बाबु भाकरे, म. इसाक, म.इब्राहिम अपाक शेख मं. इब्राहिम लालमहंमद रु.४००/- हु.// दार म्हणून असलेली नोंद कमी करुन मिळणेबाबत दि.२९/०७/२०२५ रोजी या कार्यालयाकडे अर्ज सादर केला आहे.

दावा जमिनीबाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये दि.०६/११/२०२५ व २७/११/२०२५ रोजी चौकशीची तारीख ठेवण्यात आलेली होती. तथापि प्रतिवादी हे गैरहजर राहिलेले असून ग्राम महसूल अधिकारी खांडवी ता. बार्शी यांनी प्रतिवादी हे मयत असलेबाबत अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे जाहिर समन्सव्दारे कळविण्यात येते की, वरील नमूद प्रतिवादी अथवा त्यांचे वारस हे जिथे कोठे असतील तेथून सदर केसच्या संदर्भाने तुम्ही जातीने अगर तुमच्या अधिकृत अभिकर्त्यांमार्फत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदर जाहीर समन्स प्रसिद्धीपासून एक महिन्याचे आत हजर रहावे. जर तुमचे म्हणणे प्राप्त झाले नाही तर आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी घेतली जाईल व उपलब्ध कागदपत्राआधारे योग्य तो निर्णय देणेत येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(एफ. आर शेख)**
**तहसिलदार बार्शी**

**नमुना - १**
**(नियम ४ आणि ५ अन्वये)**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर**

जा.क्र./नवि ७/कावि १००९/२०२५ दिनांक : ०३/१२/२०२५

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांचेकडील आदेश क्र. रानिआ-२०२५/सुनिका/नप/प्र.क्र.१४/का.६, दि. २९/११/२०२५ अन्वये दिलेल्या सुधारित कार्यक्रमानुसार (न्यायालयीन अपील झालेल्या तसेच उपरोक्त पत्रातील परिच्छेद-३ मधील नमूद ४ बाबींमुळे बाधित झालेल्या) व महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ यातील नियम ४ आणि ५ व इतर सर्व अनुषंगिक तरतुदीप्रमाणे मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, कुमार आशीर्वाद, भा.प्र.से. जिल्हाधिकारी सोलापूर यासोबत जोडलेल्या अनुसुचीच्या स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मतदार प्रभागातून पंढरपूर नगरपरिषदेच्या घेण्यात येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या संबंधात पुढील तारखा निश्चित करीत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | निवडणुकीचा टप्पा | तपशील |
|---|---|---|
| १ | प्रभागाचे नाव किंवा क्रमांक | प्र.क्र.७ जागा क्र.७ ब |
| २ | जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | ०४/१२/२०२५ |
| ३ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक | १०/१२/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत. |
| ४ | आवश्यकतेप्रमाणे निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक | ११/१२/२०२५ |
| ५ | आवश्यक असल्यास, मतदानाचा दिनांक | २०/१२/२०२५ सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ६ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २१/१२/२०२५ सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ७ | शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करणे | दि.२३/१२/२०२५ पूर्वी कलम १९ मधील तरतुदीनुसार |

**दिनांक : ०३/१२/२०२५**
**स्थळ : सोलापूर**

**सही/-**
**(कुमार आशीर्वाद भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी सोलापूर**

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन,**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मोहोळ, तालुका मोहोळ जि. सोलापूर
गायकवाड बिल्डिंग, मेन रोड, जुन्या स्टेट बँकेजवळ मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर
दूरध्वनी क्र.०२१८९-२३२२६९ E mail-arcsmohol@gmail.com

**या कार्यालयाचे महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ व नियम १९६१ चे नियम ८६ (अ) अन्वये जाहीर नोटीस**

लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर जि. सोलापूर ----- वादी विरुध्द
(खालील तपशीलात नमुद केलेले पत्तसंस्थेचे थकबाकीदार सभासदर आहेत ------प्रतिवादी)

| अ. क्र. | दावा क्रमांक | दावा रक्कम | प्रतिवादी नं. | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ११/२०२५ | २५७२३५/- | १ | पवार अजित नागनाथ भाजी मंडई मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर |
| २ | १५/२०२५ | ९४६१९/- | ३ | पवार अजित नागनाथ भाजी मंडई मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर |
| ३ | १६/२०२५ | १८०४९१/- | २ | भिसे ज्ञानेश्वर दत्तात्रय साठे नगर मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर |
| ४ | २०/२०२५ | ११२५४००/- | १ | सौ. कोकरे उज्वला प्रताप ब्लॉक नं. ७ नेहरू नगर सोलापूर जि. सोलापूर |
| | | | २ | कोकरे प्रतापराव बंकटराव ब्लॉक नं. ७ नेहरु नगर सोलापूर जि. सोलापूर |
| ५ | २१/२०२५ | ३१४८६/- | १ | सौ. आवताडे केशर प्रभाकर विरवडे बु. ता. मोहोळ जि. सोलापूर |
| ६ | २२/२०२५ | ३४१२५/- | १ | सौ. झाडगे रुपाली दिगंबर मु. पो. हराळवाडी ता. मोहोळ जि. सोलापूर |
| | | | २ | झाडगे दिगंबर दिलीप मु. पो. हराळवाडी ता. मोहोळ जि. सोलापूर |
| | | | ३ | झाडगे दत्तात्रय दिलीप मु. पो. हराळवाडी ता. मोहोळ जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी कलम १०१ अन्वये दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या प्रतिवादी त्यांचे राहते पत्यावर सुनावणी नोटीस पाठविली असता, काही प्रतिवादी हजर राहीले नाहीत तसेच त्या व्यक्ती सदर पत्यावर राहत नसल्याचे अथवा बाहेरगावी गेल्याचे नमुद करुन नोटीसा परत आल्या आहेत. कांही नोटीसांची प्रत अप्राप्त आहे. तरी सदर जाहीर नोटीशीव्दारे आपणास कळविण्यात येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा वकीलामार्फत गुरुवार दि. १८/१२/२०२५ रोजी दु.१२.०० वाजता कागदपत्रासह सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मोहोळ, गायकवाड बिल्डींग, जुन्या स्टेट बँकेजवळ, मेनरोड मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर येथे हजर रहावे. या नोटीशीव्दारे असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/११/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह ही जाहीर नोटीस दिली आहे.

**स्वाक्षरी**
**(एस.टी. तेलंगरे)**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, मोहोळ**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### रोहित राजपाल डेव्हिस चषक कर्णधार

**नवी दिल्ली :** ऑल इंडिया टेनिस संघटनेने (एआयटीए) बुधवारी रोहित राजपालची भारतीय डेव्हिस चषक संघाच्या कर्णधारपदी पुनर्नियुक्ती केली व त्यांचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वाढवता आहे. भारताच्या यजमानपदाखाली डेव्हिस चषक पात्रता फेरीचे सामने होणार असून भारत नेदरलॅण्डविरुद्ध खेळणार आहे. यापूर्वी अनेक डेव्हिस चषक सामन्यांमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करणारा राजपाल आणखी एक वर्षा संघनेतृत्वाची धुरा सांभाळणार आहे, तर आशुतोष सिंग यांना संघाचे प्रशिक्षक म्हणून कायम ठेवण्यात आले आहे. राजपालची पुनर्नियुक्ती भारताच्या अंतिम फेरीत पोहोचण्याच्या प्रयत्नात असलेल्या महत्त्वाच्या घरच्या सामन्यापूर्वी नेतृत्वात सातत्य सुनिश्चित करते. तो केवळ आगामी पात्रता फेरीसाठीच नव्हे, तर त्याच्या नूतनीकरणाच्या कार्यकाळात सर्व डेव्हिस चषक स्पर्धांसाठी सुद्धा संघाचे पर्यवेक्षण करेल. दिल्ली व कर्नाटकने आधीच फेब्रुवारीमध्ये हा सामना आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. भारतीय संघाच्या नामांकनांसह अधिक तपशील योग्य वेळी जाहीर केले जातील, असे एआयटीएने म्हटले आहे.

### भारतीय टी-२० संघाच्या नवीन जर्सीचे अनावरण




**रायपूर :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अ‍ॅडिडासच्या सहकार्याने पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी भारतीय टी-२० संघासाठी नवीन किट्सची घोषणा केली आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करतानाच संघासाठीच्या नवीन टी-२० जर्सीचे अनावरण करण्यात आले.

### खेळाडूंच्या तक्रारींमुळे हरेंद्र यांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** भारतीय महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे एकच खळबळ उडाली. खेळाडूंनी त्यांच्या 'कालबाह्य आणि हुकूमशाही' कार्यशैलीबद्दल अनेक तक्रारी केल्या होत्या, त्यामुळे त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे समजते. एप्रिल २०२४ मध्ये संघात सामील झालेले हरेंद्र यांनी सोमवारी मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या कार्यशैलीबद्दल खेळाडूंमध्ये बराच काळ राग होता आणि त्यांनी गेल्या आठवड्यात हॉकी इंडिया, साई टॉप्स अधिकारी आणि क्रीडा मंत्रालयाकडे 'मानसिक छळ' केल्याची तक्रार केली होती. क्रीडा मंत्रालयाच्या सूत्रांनुसार, हॉकी इंडियाला खेळाडूंच्या तक्रारींची तात्काळ जाणीव होती आणि त्यांनी त्वरित कारवाई करण्याचे आश्वासन दिले. खेळाडूंनी त्यांच्या हुकूमशाही वृत्ती, कोचिंग पद्धती आणि संघाच्या सतत घसरत्या कामगिरीबद्दल तक्रार केली होती. चार महिन्यांपूर्वी बंगळुरूला तपासणीसाठी पाठवलेल्या साईच्या अव्वल अधिकाऱ्यांनीही 'नकारात्मक' अहवाल दिला होता, असे सूत्रांनी सांगितले. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून चार दिवसांत चौकशी करण्यात आली. हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की व महासचिव भोलानाथ सिंग हे चेन्नई आणि मदुराई येथे सुरू असलेल्या कनिष्ठ पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेनंतर थेट बंगळुरू येथील भारतीय क्रीडा प्राधिकरणात पोहोचले आणि शिबिरात सहभागी खेळाडूंशी वैयक्तिकरित्या संवाद साधला.

### गायत्री, रिंकीला रौप्य



गायत्री रिंकी

**जयपूर :** पाचव्या खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राची विजयी घोडदौड अ‍ॅथ्लेटिक्स ट्रॅकवरही झळकली. २० मीटर चालण्याच्या शर्यतीत गायत्री चौधरीने, तर ५००० मीटर दौड शर्यतीत रिंकी पवारने रौप्यपदक मिळविले. शिवाजी विद्यापीठाच्या ऋषी प्रताप देसाईने वेगवान धावपटू होण्याचा मान संपादन केला. १०.५३ सेकंदाची वेळ नोंदवून कोल्हापूरच्या ऋषीने बाजी मारली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा लौकिक मेलगे (१०.५९ सेकंद) रौप्यपदकाचा मानकार ठरला. मुंबईच्या जय भोईरने (१०.८६ सेकंद) कांस्यपदक मिळविले. पुणे विद्यापीठाच्या गायत्री गणेश चौधरीने १.४६.०८ वेळेत शर्यत पूर्ण केली. ५००० मीटर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रिंकी पवारने खेलो पदकाची हॅट्ट्रिक पूर्ण केली. रवींद्रनाथ टागोर विद्यापीठाच्या बुशरा खानने सुवर्णपदक पटकावले.

# दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी शुभमन गिलची निवड

**रायपूर, ३ डिसेंबर**

मानेला झालेल्या दुखापतीमुळे तो सध्या सुरू असलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून बाहेर झाला आहे, त्यामुळे शुभमन गिलची दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे, असे बीसीसीआयच्या सूत्रांनी बुधवारी सांगितले.

भारताचा कसोटी व वन-डे दवसीय कर्णधार असलेल्या गिलला कोलकाता येथे झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यादरम्यान दुखापत झाली. त्यानंतर तो गुवाहाटी येथील दुसऱ्या कसोटी आणि त्यानंतरच्या एकदिवसीय मालिकेतून बाहेर झाला.

गिल पूर्णपणे बरा झाला आहे व त्याला संघात समाविष्ट करण्यात आले आहे. तो तंदुरुस्तीच्या अधीन राहून उपकर्णधार म्हणून परत येईल, असे बीसीसीआयच्या सूत्रांनी सांगितले.

टी-२० संघ निवडण्यासाठी निवड समितीची बैठक बुधवारी येथे झाली. पाच सामन्यांची मालिका ९ डिसेंबरपासून कटकमध्ये सुरू होत आहे. सूर्यकुमार यादव हा भारताचा नियमित टी-२० कर्णधार आहे.

ड्रेसिंग रूममधील तणावाबाबतच्या वाढत्या चर्चेवर वरिष्ठ खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्याशी बीसीसीआयचे पदाधिकारी बैठक



घेण्याची योजना आखत आहेत, अशा वृत्तांचेही सूत्रांनी खंडन केले.

३७ वर्षीय कोहली आणि ३८ वर्षीय रोहित आता केवळ एकदिवसीय स्वरूपात राष्ट्रीय कर्तव्यासाठी सज्ज आहेत आणि २०२७ च्या विश्वचषकापर्यंत ते खेळू शकतील की नाही याबद्दल तीव्र अटकळ बांधली जात आहे.

गंभीर आणि राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी या शक्यतेबद्दल अद्याप कोणतीही प्रतिबद्धता दर्शवलेली नाही. मालिकेच्या मध्यात कोणतीही बैठक होणार नाही. मालिका संपल्यानंतर काय करायचे ते पाहू, असे त्यांनी सांगितले. भारताने कसोटी मालिका ०-२ अशी गमावली. (वृत्तसंस्था)

### हार्दिक पांड्याचे पुनरागमन

स्टार फलंदाज शुभमन गिलसह अष्टपैलू हार्दिक पांड्या हे आपल्या दुखापतींमधून बरे झाल्यानंतर बुधवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय टी-२० संघात परतले. गिलचा सहभाग मात्र बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्सकडून फिटनेस मंजुरीच्या अधीन आहे, असे बीसीसीआयने म्हटले आहे.

आशिया चषकाच्या अंतिम फेरीत आणि ऑस्ट्रेलियातील पाच



सामन्यांच्या मालिकेत खेळू न शकलेल्या पांड्याने मंगळवारी हैदराबादमध्ये पंजाबविरुद्धच्या सय्यद मुश्ताक अली चषक सामन्यात आपली तंदुरुस्ती सिद्ध केल्यानंतर भारताच्या संघात पुनरागमन केले. भारताचा कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार असलेल्या गिलला कोलकाता येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यादरम्यान दुखापत झाली. त्यानंतर त्याला गुवाहाटीतील दुसऱ्या कसोटी आणि त्यानंतरच्या एकदिवसीय मालिकेतून वगळण्यात आले.

टी-२० संघ निवडण्यासाठी निवड समितीची बैठक बुधवारी येथे झाली. सूर्यकुमार यादव हा भारताचा नियमित टी-२० कर्णधार आहे.

पाच सामन्यांची मालिका ९ डिसेंबरपासून कटकमध्ये सुरू होईल. इतर सामने चंदीगड (११ डिसेंबर), धर्मशाला (१४ डिसेंबर), लखनौ (१७ डिसेंबर) आणि अहमदाबाद (१९ डिसेंबर) येथे होणार आहेत.

भारतीय टी-२० संघ : सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार)*, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा (यष्टिरक्षक), संजू सॅमसन (यष्टिरक्षक), जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, हर्षित राणा, वॉशिंग्टन सुंदर.

# गुवाहाटी मास्टर्समध्ये भारतीय बॅडमिंटनपटूंचे वर्चस्व

**गुवाहाटी, ३ डिसेंबर**

गुवाहाटी मास्टर्स सुपर १०० बॅडमिंटन स्पर्धेत तन्वी शर्मा व थरुन मन्नेपल्लीसह भारतीय बॅडमिंटनपटूंनी दमदार कामगिरी केली. बुधवारी येथे झालेल्या पुरुष आणि महिला एकेरीच्या ड्रॉमध्ये अनेक भारतीय खेळाडूंनी विजय मिळवत पुढील फेरीत प्रवेश केला.

तन्वी शिवाय महिला एकेरीत तान्या हेमंत, तस्निम मीर, अश्मिता चालिहा, अनमोल खरब, अनुपमा उपाध्याय, इशाराणी बरुआ आणि श्रेया लेलेचा समावेश आहे.

पुरुष एकेरीत, मीराबा लुवांग मैस्नाम, संस्कार सारस्वत, मानव चौधरी, सनीथ दयानंद, समरवीर, आर्यमन टंडन, तुषार सुवीर, प्रणय शेट्टीगर, मिथुन मंजुनाथ आणि जिनपॉल सोन्ना - हे सर्वजण उप-उपांत्यपूर्व फेरीत पोहोचले.

आठव्या मानांकित तन्वीने इंडोनेशियाच्या दलिला अघनिया पुतेरी हिचा ६-२१, २१-११, २१-१९ असा पराभव केला. अखिल भारतीय सामन्यात तान्याने अदिती भट्ट हिचा २१-१६, २१-१२ असा पराभव केला. तस्निम मीरनेही अलिशा नाईकवर २१-१३, २३-२१ असा विजय मिळवला आणि अश्मिता चालिहाने देविका सिहागचा २१-१७, २१-२३, २१-१८ असा पराभव करून पुढील फेरीत स्थान



तन्वी शर्मा

निश्चित केले.

पाचव्या मानांकित अनमोल खरबने सूर्या करिश्मा तमिरीवर २१-१८, २१-१९ असा विजय मिळवला, तर चौथ्या मानांकित अनुपमा उपाध्यायने मेघना रेड्डी मारेड्डीवर २१-१५, २१-१० असा विजय मिळवला.

इशाराणी बरुआने तैवानच्या यी एन हसीहवर २१-१५, २१-८ असा विजय मिळवला आणि श्रेया लेलेने दुसऱ्या मानांकित थायलंडच्या पोर्नपिचा चोईकीवोंगवर २१-१९, २१-१८ असा विजय मिळवला.

**मीराबाचा त्रिपाठीवर विजय**

पुरुष एकेरीत, मीराबाने आदित्य त्रिपाठीवर २२-२०, २१-१२ असा रोमहर्षक विजय संपादन केला, मन्नेपल्लीने इंडोनेशियाच्या रिची दुता रिचर्डोचा २१-१३, २१-१६ असा पराभव केला. पुढील सामन्यात हे दोघेही भारतीयांच्या लढतीत आमनेसामने येतील.

संस्कार सारस्वतने जेसन गुणवानचा २१-१८, २१-१९ असा पराभव केला, तर समरवीरने जोरदार मुसंडी मारत दर्शन पुजारीचा १३-२१, २१-१३, १२-७ असा पराभव केला.

मानव चौधरीने गोविंद कृष्णाचा २१-१४, १८-२१, २१-१८ असा पराभव केला आणि सनीथ दयानंदने नुमैर शेखचा २१-१९, २१-११ असा पराभव केला.

मिश्र दुहेरीच्या अव्वल मानांकित खेळाडूंनीही छाप पाडली, रोहन कपूर आणि ऋत्विका शिवानी गड्डेने इंडोनेशियाच्या केन्झी यो आणि लुना रियान्टी सफाना यांच्यावर १८-२१, २१-९, २१-१८ अशी मात केली. (वृत्तसंस्था)

# ऋतुराज गायकवाडचे पहिले शतक

**रायपूर, ३ डिसेंबर**

येथील शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या वन-डे सामन्यात भारतीय संघाकडून चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या ऋतुराज गायकवाडने शानदार फलंदाजी केली आणि शतक ठोकले. हे त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील पहिले शतक ठरले. त्याने आपल्या ८ व्या एकदिवसीय सामन्यात पहिले शतक ठोकले.

त्याने ५२ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. अर्धशतक पूर्ण केल्यानंतर, त्याने जलद गतीने धावा काढण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याने मैदानावर सर्वत्र फटके मारले आणि ७७ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. त्याच्या शतकादरम्यान, त्याने १२ चौकार आणि दोन षट्कार मारले. ऋतुराजने कोहलीसोबत तिसऱ्या गड्यासाठी १९५ धावांची भागीदारी केली.

या सामन्यापूर्वी, गायकवाडने आपल्या कारकिर्दीत सात एकदिवसीय सामने खेळले होते, यात त्याने १७.५७ च्या सरासरीने केवळ १२३ धावा केल्या होत्या. त्याच्या वाईट कामगिरीमुळे संघातील त्याच्या स्थानाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते, परंतु या सामन्यात त्याने शतक ठोकून आपल्या टीकाकारांना उत्तर दिले. आता तो तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात हा फॉर्म कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल. रांचीतील पहिल्या एकदिवसीय सामन्यात तो केवळ ८ धावांवर बाद झाला. (वृत्तसंस्था)

# विराट कोहलीचे ५३ वे वन-डे शतक

### पोहोचला सचिनच्या विश्वविक्रमाच्या समीप

**रायपूर, ३ डिसेंबर**

येथे खेळल्या गेलेल्या दक्षिण आउफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाडने दमदार शतक झळकावले. या दोघांच्या शतकी खेळीच्या बळावर भारताने प्रथम फलंदाजी करताना मर्यादित ५० षटकांत ५ बाद ३५८ धावा उभारल्या.

कोहलीने बुधवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या वन-डे सामन्यात दुसरे शतक ठोकले. रांची येथे झालेल्या मालिकेच्या पहिल्या सामन्यात १३५ धावा करणाऱ्या ३७ वर्षीय फलंदाजाने हा टप्पा गाठण्यासाठी केवळ ९० चेंडू घेतले. हे त्याचे ५३ वे शतक होते, जे या स्वरूपात एक विक्रमी कामगिरी आहे. पहिल्या



विराट कोहली व ऋतुराज गायकवाड

एकदिवसीय सामन्यातही शतक ठोकून माजी भारतीय कर्णधाराने टीकाकारांची तोंडे बंद केली. हे कोहलीचे ८४ वे आंतरराष्ट्रीय शतक आहे, त्यामुळे तो सचिन तेंडुलकरच्या सर्वकालीन विक्रमाच्या आणखी एक पाऊल जवळ पोहोचला.

तेंडुलकरने २०१३ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आणि शतकांच्या शतकासह (५१ कसोटी, ४९ एकदिवसीय) त्याची कारकीर्द संपवली.

कोहलीने एकदिवसीय सामन्यांमध्ये सलग दोन शतके झळकावण्याची ही ११ वी घटना होती, जी या वन०-डे क्रिकेटच्या इतिहासातील कोणत्याही खेळाडूने सर्वाधिक आहे. या ५० षटकांच्या फॉरमॅटमध्ये त्याने अविश्वसनीय सातत्य दाखवले आहे.

**कोहलीला संगकाराला मागे टाकण्याची संधी**

विराट कोहली सध्या दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत चौथ्या स्थानावर आहे, त्याने १,७१२ धावा केल्या आहेत. कोहलीला या यादीत कुमार संगकाराला मागे टाकण्याची संधी आहे. संगकाराने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ४४ एकदिवसीय सामन्यांमध्ये ४५.८७ च्या सरासरीने १,७८९ धावा केल्या आहेत. (वृत्तसंस्था)

## न्यूझीलंडला वेस्ट इंडीजविरुद्ध आघाडी

**ख्राईस्टचर्च, ३ डिसेंबर**

येथे सुरु असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडच्या २३१ धावांना प्रत्युत्तर देताना तेगनारायण चंदरपॉल (५२) व शाय होपच्या (५६) अर्धशतकांच्या आधारावर वेस्ट इंडीजने ७५.४ षटकांत सर्वबाद १६७ धावांपर्यंत मजल मारली. शाय होपने डोळ्याच्या संसर्गामुळे चष्मा घालून फलंदाजी केली व न्यूझीलंडविरुद्ध आपले पहिले कसोटी अर्धशतक साजरे केले. दिवस अखेर न्यूझीलंडने ७ षटकांत बिनबाद ३२ धावा केल्या. खेळ थांबला तेव्हा कर्णधार टॉम लाथम नाबाद १४ धावांवर, तर डेव्हॉन कॉनवे नाबाद १५ धावांवर खेळत होते. वेस्ट इंडीज पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी ९६ धावांनी पिछाडीवर होता.

उदास परिस्थितीत होपने हेल्मेटखाली मोठे परावर्तक चष्मे घातलेले पाहणे कदाचित विसंगत वाटले असेल, परंतु सुरुवातीला दोन फलंदाज गमावल्यानंतर त्याच्या ५६ धावांच्या खेळीने वेस्ट इंडीजचा पहिला डाव स्थिरावला. दुसऱ्या टोकाला तेगनारायण चंदरपॉलने १६५ चेंडूत अर्धशतकापेक्षा जास्त मेहनत घेतली. या जोडीने ९० धावांची भागीदारी करून वेस्ट इंडीजला न्यूझीलंडच्या जवळपास आणले. न्यूझीलंडने ९ बाद २२३१ धावांवरून आपल्या पहिल्या डावाला सुरुवात केली व त्याच धावांसंख्येवर डाव आटोपला.

पावसाच्या व्यत्ययामुळे काही काळ खेळ थांबवावा लागला होता, तेव्हा वेस्ट इंडीजची धावसंख्या ६ बाद १५७ अशी होती. न्यूझीलंडच्या वेगवान गोलंदाजांचा सामना मंदावलेल्या प्रकाशात करावा लागला आणि वेस्ट इंडीजने शेवटचे चार फलंदाज १० धावांत गमावले. जेकब डफीने ३४ धावांत ५ बळी टिपरले. त्याने प्रथमच कसोटीत पाच बळी टिपण्याची किमया केली. मॅट हेनरीने ३ बळी, तर झॅक फोल्कने २ बळी टिपलेत. (वृत्तसंस्था)

### आयसीसी वन-डे मानांकन

# विराटची चौथ्या क्रमांकावर धडक

**दुबई, ३ डिसेंबर**

भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली बुधवारी रांची येथे झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात शतकी विजयी खेळी करून आयसीसी मानांकनात चौथ्या क्रमांकावर पोहोचला.

कोहलीने वन-डे क्रिकेटमध्ये आपले ५२ वे शतक केले, १२० चेंडूत १३५ धावा केल्याने भारताने रविवारी दक्षिण आफ्रिकेवर १७ धावांनी विजय मिळवला.

३७ वर्षीय या खेळाडूचे आता ७५१ रँकिंग गुण आहेत आणि तो भारताचा माजी कर्णधार रोहित शर्मा (७८३), न्यूझीलंडचा फलंदाज डॅरिल मिशेल (७६६) आणि अफगाणिस्तानचा इब्राहिम झद्रान (७६४) यांच्यापेक्षा मागे आहे.

कोहलीने भारताचा वन-डे कर्णधार शुभमन गिलला मागे टाकले, जो दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या चालू तीन सामन्यांच्या मालिकेत मानेला दुखापतीमुळे खेळू न शकल्याने पाचव्या क्रमांकावर आला.

भारताच्या अलिकडच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात झालेल्या दुखापतीतून सावरणारा श्रेयस अय्यरही नवव्या स्थानावर कायम आहे. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या सामन्यात चार बळी घेत डावखुरा फिरकी गोलंदाज कुलदीप यादवने एका स्थानाची प्रगती करत सहाव्या स्थानावर झेप घेतली.

कसोटी फलंदाजांच्या यादीत, भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल नवव्या स्थानावर कायम राहिला, तर गिल एका स्थानाने १२व्या स्थानावर घसरला. यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतही १२व्या स्थानावरून १४व्या स्थानावर घसरला.



**कसोटी गोलंदाजांमध्ये बुमराह अव्वल**

कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत, भारताचा आघाडीचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह ८७९ गुणांसह अव्वल स्थानावर आहे. तो न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेन्री (८४६) पेक्षा खूपच मागे आहे.

तथापि, दक्षिण आफ्रिका विरुद्धच्या दोन सामन्यांच्या मालिकेतील माफक कामगिरीमुळे वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज (११व्या स्थानावरून १३व्या स्थानावर) आणि कुलदीप (१३व्या स्थानावरून १५व्या स्थानावर) यांच्या क्रमवारीवर परिणाम झाला.

टी-२० यादीत, अभिषेक शर्मा आणि वरुण चक्रवर्तीने आपले अव्वल स्थान कायम राखत भारतीय खेळाडूंचे वर्चस्व कायम ठेवले. (वृत्तसंस्था)

## हर्षित राणाला फटकारले

**दुबई, ३ डिसेंबर**

रांची येथे झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज डेवाल्ड ब्रेविसला बाद केल्यानंतर आक्रमक वर्तन केल्याबद्दल भारताचा वेगवान गोलंदाज हर्षित राणा याला बुधवारी आयसीसीने फटकारले आणि एक डिमेरिट पॉइंट दिला.

राणा आयसीसीच्या आचारसंहितेच्या लेव्हल १ चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळला, असे आयसीसीने म्हटले आहे.

रविवारी दक्षिण आफ्रिकेच्या डावाच्या २२ व्या षटकात ही घटना घडली, जेव्हा भारतीय वेगवान गोलंदाजाने ब्रेविसला बाद केल्यानंतर ड्रेसिंग रूमच्या दिशेने हावभाव केला.

राणाने सामन्यात ६५ धावांत ३ बळी घेतले, जो भारताने १७ धावांनी जिंकला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलिया इंग्लंडविरुद्धची दुसरी कसोटी जिंकण्यास उत्सुक

**ब्रिस्बेन, ३ डिसेंबर**

प्रतिष्ठेच्या अ‍ॅशेस कसोटी क्रिकेट मालिकेत गुरुवारपासून गॅबा मैदानावर ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यादरम्यान दिवस-रात्र काळात (डे-नाईट) दुसरा कसोटी सामना खेळला जाणार आहे. पाच सामन्यांच्या या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी मिळविणाऱ्या स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखालील ऑस्ट्रेलिया संघ आता दुसरा सामनाही जिंकण्यास उत्सुक आहे.

पर्थमध्ये मालिकेच्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने दोन दिवसांतच इंग्लंडवर ८ गड्यांनी विजय मिळविला. बेन स्टोक्सच्या इंग्लंड संघाला आक्रमक बॅजबॉलचा सामना करताना संघर्ष करावा लागला. स्मिथला इंग्लंडकडूनही अशीच अपेक्षा आहे. आमचा संघही परिस्थितीनुसार खेळण्यावर अधिक लक्ष केंद्रित करेल, असे स्मिथ म्हणाला.



स्टीव्ह स्मिथ

**ऑस्ट्रेलिया वि. इंग्लंड कसोटी सामना**

**स्थळ :** द गॅबा स्टेडियम, ब्रिस्बेन
**वेळ :** सकाळी ९.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर



बेन स्टोक्स

गत आठवड्यात पर्थमध्ये झालेल्या पाठीच्या दुखापतीमुळे उस्मान ख्वाजाला दुसऱ्या कसोटीतून विश्रांती देण्यात आली आहे, त्यामुळे ऑस्ट्रेलियन संघाला किमान एक बदल करावा लागला आहे. त्यामुळे जोश इंग्लिशला परतण्याची व ट्रॅव्हिस हेडला सलामीवीर म्हणून संधी मिळण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलिया नाणेफेकीच्या वेळीच आपला अंतिम एकादश जाहीर करण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुखापतग्रस्त कर्णधार पॅट कमिन्सला पुन्हा संघात आणण्याच्या अटकळांना तोंड द्यावे लागत आहे. कमिन्स पाठीच्या दुखापतीमुळे पहिल्या कसोटीला मुकला व दुसऱ्या सामन्यासाठी त्याला मूळ संघातून वगळण्यात आले, परंतु बुधवारी खेळपट्टीच्या तपासणीसाठी तो हंगामी कर्णधार स्मिथ व प्रशिक्षक अ‍ॅण्ड्र्यू मॅकडोनाल्ड यांच्यासोबत खेळपट्टी तपासणीसाठी गेला.

ऑस्ट्रेलिया संघाचा दिवस-रात्र कसोटी सामन्यांमध्ये उत्कृष्ट रेकॉर्ड आहे, केवळ एकच दोष आहे. गत वर्षी जानेवारीमध्ये गॅबा येथे त्यांना वेस्ट इंडीजविरुद्ध ८ धावांनी पराभव पत्करावा लागला होता. (वृत्तसंस्था)

## आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव नांदेडमध्ये ४ डिसेंबरपासून

**नांदेड :** आगामी २७ वा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव ४ ते ८ डिसेंबर दरम्यान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने आयोजित केला जाईल, असे अधिकाऱ्यांनी बुधवारी सांगितले. राज्यपाल कार्यालयाने प्रायोजित केलेल्या या क्रीडा महोत्सवात २४ विद्यापीठांमधील एकूण ३,३०७ खेळाडू सहभागी होतील, असे त्यांनी सांगितले. पाच दिवसांच्या या क्रीडा महोत्सवातील स्पर्धा 'भारत पोर्टल' द्वारे प्रसारित केल्या जातील, असे त्यांनी सांगितले.

# भारतीय नेमबाज विश्वचषक अंतिमसाठी सज्ज

**दोहा, ३ डिसेंबर**

वर्षभरात अनेक महत्त्वाचे टप्पे आणि पदकांची कमाई केल्यानंतर भारताचे अव्वल नेमबाज गुरुवारी येथे सुरू होणाऱ्या आयएसएसएफ विश्वचषक अंतिम फेरीत हंगामाचा शेवट गोड करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

हंगामाच्या अखेरच्या स्पर्धेत पॅरिस ऑलिम्पिकमधील दुहेरी कांस्यपदक विजेती पिस्तूल नेमबाज मनू भाकर, विश्वविजेती सम्राट राणा आणि अनेक विश्वचषक पदक विजेती सुरुची सिंगसह भारताचे १४ सर्वोत्तम नेमबाज सहभागी होणार आहे. हे नेमबाज प्रत्येक स्पर्धेत वैयक्तिक विभागात जगातील अव्वल १२ नेमबाजांसाठी मर्यादित असतात. भारताने कैरो (पिस्तूल/रायफल) आणि अथेन्स (शॉटगन) येथे झालेल्या



जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत विक्रमी कामगिरी केली, तिथे त्यांनी ऑलिम्पिक व नॉन- ऑलिम्पिक प्रकारांमध्ये तीन सुवर्णपदकांसह १४ पदके जिंकली. ते आता विश्वचषक अंतिम स्पर्धेत या यशाचे रूपांतर करण्याचा प्रयत्न करतील.

भारताचे दोन अव्वल पिस्तूल नेमबाज, मनू आणि ईशा सिंग हे १० मीटर एअर आणि २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तूलमध्ये, तर सम्राट राणा आणि बागपतचा वरुण तोमर पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत विजेतेपदाचे प्रबळ दावेदार असतील.

पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत माजी विश्वविजेता रुद्रांक्ष पाटील व पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चौथे स्थान मिळवणारा अर्जुन बाबुता तसेच जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक जिंकणारा अनिश भानवाला हे कडव्या आव्हानांचा सामना करतील.

कैरोमध्ये कांस्यपदक जिंकल्यानंतर एलावेनिल वॅलारिवन आपला चांगला फॉर्म कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल. करणी सिंग आणि विश्वविजेत्या मानवजित सिंग अनुभवी झोरावर संधू यांच्याकडून पदकाची आशा आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# कुमार-मुली राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचा आजपासून थरार!

## अहिल्यानगर सज्ज : २४ जिल्ह्यांचे ८७० खेळाडू मैदानात उतरणार

### राष्ट्रीय संघ निवडीसाठी चुरस

**अहिल्यानगर, दि. ३ डिसेंबर-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या व अहिल्यानगर जिल्हा खो-खो संघटना यांच्या मान्यतेने अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले युवा प्रतिष्ठाण, विश्वंभरा प्रतिष्ठाण बुऱ्हाणनगर व बाणेश्वर क्रीडा मंडळ बुऱ्हाणनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५१ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचा थरार आज, गुरुवारपासून (ता. ४ डिसेंबर) श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर येथील मैदानावर ४ ते ७ डिसेंबरदरम्यान रंगणार आहे. संपूर्ण शहरात खो-खो क्रीडा वातावरणाचा उत्साह ओसंडून वाहू लागला आहे.

या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे महाराष्ट्र संघाची निवड कर्नाटक येथे होणाऱ्या ४४ व्या कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी होणार आहे. प्रत्येक जिल्हा पूर्ण क्षमतेने मैदानात उतरणार आहे. राज्यातील २४ जिल्ह्यांतील तब्बल ८७० खेळाडू व प्रशिक्षक सहभागी होणार असून चार मैदानांवर सामने रंगणार आहेत. सर्व यंत्रणा, व्यवस्था, निवास, भोजन, वैद्यकीय सुविधा आणि मैदानाची तयारी पूर्ण झाल्याचे संयोजकांनी सांगितले. स्पर्धेचे उद्घाटन सायंकाळी ६ वाजता होणार असून त्याप्रसंगी अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले जिल्हाध्यक्ष, भा.ज.पा. युवा मोर्चा महिल्यानगर (दक्षिण) संचालक-जिल्हा सहकारी बँक, मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा तथा पालकमंत्री, संग्रामभैय्या जगताप, पंकज आशिया, जिल्हाधिकारी, सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक अहिल्यानगर, आदी मान्यवरांच्या उपस्थित होणार आहे. त्यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष अजितदादा पवार, सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.





#### सोलापूर जिल्ह्याचे कर्णधार शंभूराजे चंदनशिव, स्नेहा लामकाने

सोलापूर जिल्हा कुमार संघाच्या कर्णधारपदी अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ वेळापूरच्या शंभूराजे चंदनशिव व मुलींच्या कर्णधारपदी कल्याणराव काळे स्पोर्टस क्लब वाडीकुरोलीची (ता. पंढरपूर) स्नेहा लामकाने हिची निवड केल्याचे सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड यांनी जाहीर केले. संघास असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी शुभेच्छा दिल्या. मुली संघाचे सराव शिबिर वाडीकुरोलीतील कल्याणराव काळे क्रीडा मंडळाच्या मैदानावर संपन्न झाले. या शिबिराचा समारोप कल्याणराव काळे क्रीडा मंडळाचे अध्यक्ष समाधान काळे, वसंतराव काळे प्रशालेचे सचिव बाळासाहेब काळे, ग्रामसेवक सुरेश इंगोले, प्राचार्य संजय कुलकर्णी यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी प्रशिक्षक अतुल जाधव, व्यवस्थापिका साक्षी देठे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. कुमार संघाचे सराव शिबिर वेळापूर येथील पालखी मैदानावर झाले. त्यांना खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी अजय होळकर, प्रशांत माने, विनायक माने, पितांबर जाधव सलीम आतार, राष्ट्रीय प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, सतिश कदम, शिवाजी जाधव, संघव्यवस्थापक श्रीनाथ खटके, बाबाराजे चंदनशिव आदी उपस्थित होते.



### माढा महाविद्यालयाच्या सायली शेळके हिची राज्य बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**माढा, दि. ३ डिसेंबर -**

रयत शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा येथील सायली शेळके हिची राज्य बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली. पुणे येथे झालेल्या विभागीय स्पर्धेतील कामगिरीच्या बळावर तिची निवड झाली. तिला शारीरिक शिक्षण संचालक डॉ. पंकज ढमाळ यांचे मार्गदर्शन लाभले. सायलीच्या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष संजीव पाटील, ॲड. मिनल साठे, प्राचार्य डॉ. सुनील हेळकर , प्रा. अशोक लोंढे, डॉ. घनश्याम हराळे आदींनी अभिनंदन केले.



### मेहता शाळेच्या आर्य पवारची राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

शालेय राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी येथील व्ही. एम. मेहता शाळेच्या आर्य अण्णासाहेब पवार याची १४ वर्षांखालील गटात निवड झाली. मध्यप्रदेश (देवास) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत तो भाग घेईल. त्याने शहर स्पर्धेत पाचवा व विभाग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. बारामती येथे झालेल्या राज्य स्पर्धेमध्ये आर्यने सांघिक प्रकारात सुवर्ण आणि वैयक्तिक प्रकारात रौपय मिळवले. या कामगिरीवर त्याची निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक अमित कोटींकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### छत्रपती शिवाजीच्या इरफान बारगीरला राज्य वेटलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक


**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**



नाशिक येथे झालेल्या शालेय राज्य वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये ९८ किलो वजनी गटात छत्रपती शिवाजी साय कनिष्ठ महाविद्यालयाच्या इरफान यासीन बारगीर याने सुवर्ण पटकाविले. त्याने आपल्या गटात सर्वोत्कृष्ट क्लीन अँड जर्क १२० आणि मॅच ९० वजन यशस्वीरित्या लिफ्ट केले. या कामगिरीवर त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यास प्रशिक्षक रविंद्र माळी, प्रदीप पाटील त्याचे वडील यासीन बारगीर, प्रा संतोष गवळी, व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रा. सचिन गायकवाड, मारुती घोडके, नितीन गोरे, प्रशांत राणे, दत्ता सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. इरफान बारगीरचे वडील यासीन बारगीर हे अतिशय कष्टातून आपल्या मुलाला उत्कृष्ट क्रीडापटू तयार करण्यासाठी आवश्यक ती सोयी साधने व त्याचा डायट यासाठी प्रयत्न करत आहेत. इरफानचे मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे, सचिव प्रा महेश माने, प्राचार्य मंजुश्री सपाटे पाटील आदींनी अभिनंदन केले.

### केतन हेबाळे जिल्हा बॅडमिंटन स्पर्धेत अजिंक्य

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**



जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आणि इलिसम क्लब ऑर्गनायझेशन बॅडमिंटन स्पर्धेत एस. शटलर्स बॅडमिंटन अकादमीचा केतन हेबाळे याने ८ वर्षांखालील गटातील एकेरी गटात अजिंक्यपद पटकाविले..त्यास एस शटलर्स बॅडमिंटन अकादमीचे मुख्य प्रशिक्षक अर्शद गफूर शेख सहाय्यक प्रशिक्षक श्रीराम कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. केतनचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे आणि त्याच्या गटाच्या वतीने त्याला शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या ११ मुलींची राज्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

येथील सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या मुलींची राज्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली. सोलापूर जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनच्या वतीने जिल्हा निवड चाचणी हरीभाई देवकरण प्रशालेत झाली. यातून ११ विद्यार्थ्यांची निवड झाली. ते ५ ते ७ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या जी.टी. पी कॉलेज नंदुरबार येथे होणाऱ्या राज्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत भाग घेतील.

या यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर, प्रचिता जोगदंडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, पालक सदस्य प्रभुराज मैंदर्गीकर, मुख्याध्यापिका संगीता गोटे पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले



**निवडलेले खेळाडू :** दिव्या माळगे,सृष्टी वाघमारे, बिना घोडके,कार्तिकी मोरे, श्रुतिका मोरे, राशी गायकवाड,वैष्णवी जेऊर्गी, सानिका व्यवहारे,अक्षरा कांबळे, समृद्धी शेटे,सुशीला गुमळे

## वीरशैव लिंगायत प्रीमियर लीग टेनिस क्रिकेट स्पर्धेत १६ संघ भाग घेणार

### लीगच्या अध्यक्षपदी महेश बिराजदार

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ३ डिसेंबर-**

वीरशैव लिंगायत प्रीमियर लीगच्या अध्यक्षपदी महेश बिराजदार यांची तर कार्याध्यक्षपदी शंकर गाडी व उपाध्यक्षपदी मल्लिकार्जुन उळागड्डे यांची निवड झाली.

वीरशैव लिंगायत युथ ऑर्गनायझेशनतर्फे आयोजित वीरशैव लिंगायत प्रीमियर लीगच्या पाचव्या पर्वाची बैठक केदारनाथजी बिराजदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत विविध कार्यक्रम, संरचना आणि स्पर्धेचे नियोजन यावर सविस्तर चर्चा झाली. या सीझनमध्ये टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी एकूण १६ संघांचा समावेश असून, खेळाडूंची निवड लिलाव प्रक्रियेद्वारे केली जाणार आहे. समाजातील अधिकाधिक तरुणांना क्रीडा क्षेत्रात संधी मिळावी व त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे. समाजातील जास्तीत जास्त तरुण खेळाडूंनी या स्पर्धेत सहभागी व्हावे आणि फॉर्म भरून आपली नोंदणी करावी, असे आवाहन कमिटी सदस्य गौरव जक्कापुरे, गुंडूराज गुळगोंडा, सिद्धेश माळी, आकाश हरकुड, मुन्ना बिराजदार आणि शंकर धल्लू यांनी केले.

#### तरुणांना व्यासपीठ निर्माण करण्याचा प्रयत्न

वीरशैव लिंगायत समाजातील जास्तीत जास्त तरुणांनी पुढे येऊन क्रीडा क्षेत्रात आपली ओळख निर्माण करावी. यासाठी पीपीएल हा मोठा उपक्रम गेल्या काही वर्षात महत्त्वाचा मंच ठरला आहे. या स्पर्धेमुळे तरुणांना शहर आणि जिल्हास्तरीय स्वतःची प्रतिमा सादर करण्याची संधी मिळत असल्याचे अध्यक्ष महेश बिराजदार यांनी सांगितले.

## संगमेश्वर कॉलेजला राज्य शालेय स्पर्धेत ३ पदके

### विभागीय सायकलिंग स्पर्धेसाठी तिघांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

बारामती येथे झालेल्या शालेय राज्य कराटे व सॉफ्ट टेनिस स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजच्या खेळाडूंनी विविध प्रकारात ३ पदके पटकाविली. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण ,शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले.

या खेळाडूंना श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ .ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले

**कामगिरी :** आर्या यादव (कराटे, रौप्य), केतकी चौगुले (सॉफ्टटेनिस सांघिक, कांस्य), भक्ती जाधव (सॉफ्टटेनिस सांघिक कांस्य), समर्थ कदम (स्क्वॅश विभागीय स्पर्धेत चौथा).



#### शहर सायकलिंग स्पर्धेत मल्लिकार्जुन जमादार प्रथम



शालेय शहरस्तरीय सायकलिंग स्पर्धेमध्ये संगमेश्वर कॉलेच्या मल्लिकार्जुन जमादारने प्रथम क्रमांक पटकाविला. अभिषेक नागणसूरे तृतीय व सौरभ लोखंडेने पाचवे स्थान मिळविले. या तिघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

## कै.वि.मो.मेहता प्राथमिक शाळेत क्रीडा स्पर्धांचे पारितोषिक वितरण



**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

जुळे सोलापूर येथील कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेतील क्रीडामहोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या क्रीडास्पर्धांच्या बक्षिस वितरणाचा सोहळा रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अक्षय अंदोरे यांच्या हस्ते मोठ्या थाटात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सीमा कोरवलीकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय रोहिणी माशाळकर यांनी करुन दिला. क्रीडामहोत्सवानिमित्त धावणे, रिंग टाकणे, संगीतखुर्ची, बुकबॅलन्स अशा वैयक्तिक व लंगडी, रस्सीखेच अशा सांघिक स्पर्धा घेण्यात आल्या. विशेष म्हणजे पुरुष पालकांसाठी स्लो सायकल व महिला पालकांसाठी वन मिनिट गेम अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पदक, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

प्रमुख पाहुण्यांच्य हस्ते ध्वजारोहन करण्यात आले व टीम लिडर विराज पाटील याच्याकडे ध्वज सुपूर्त करण्यात आला. योगेश सरवदे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन गणेश माने यांनी केले.

## स्वामी विवेकानंद, नागनाथ विद्यालयास विजेतेपद

### रेल्वेची १७ वर्षाखालील गटाची व्हॉलिबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**

शालेय सतरा वर्षाखालील व्हॉलिबॉल स्पर्धेत मुलींच्या गटात मोहोळच्या नागनाथ विद्यालयाने तर मुलांच्या गटात येथील श्री स्वामी विवेकानंद प्रशालेने विजेतेपद पटकावले.

मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर डिव्हिजनल स्पोर्ट्स असोसिएशन सोलापूर व ऑल इंडिया एसटी एससी रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त ही स्पर्धा रेल्वे मैदानावर पार पडली. मुलींच्या गटातील अंतिम सामन्यात नागनाथ विद्यालय मोहोळने येथील श्री स्वामी विवेकानंद प्रशालेचा २५-१५, २५ -२२ असा सरळ दोन सेटमध्ये पराभव केला. मुलांच्या गटात श्री स्वामी विवेकानंद प्रशालेने येथील रोशन प्रशालेस २५-२०, २५ -१८ असे सरळ



दोन सेटमध्ये हरविले. स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू म्हणून मुलींच्या गटात कार्तिकी गरगडे व मुलांच्या गटात मयूर चंचू यांनी मिळविला.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण मध्य रेल्वे सोलापूर विभागाचे क्रीडा अधिकारी आदित्य त्रिपाठी यांच्या हस्ते करण्यात आला याप्रसंगी मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूरचे सचिव किशोर पिल्ले, ऑल इंडिया एससी एसटी रेल्वे एम्पलॉइज सोलापूर असोसिएशनचे सचिव सचिन बनसोडे, सुदेश मालप, अनिल यरगल, जयलक्ष्मी मुकुंद, मारुती जान गवळी सचिन बनसोडे यांच्या मातोश्री बनसोडे मॅडम, श्री स्वामी विवेकानंद प्रशालेचे मुख्याध्यापक नारायणकर, श्री माने, श्री शिंदे, श्री इंगळगी आदी उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी सुदेश मालप व अनिल यरगल यांनी आपले वडील व रेल्वेचे माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू वीरभद्र रेगळ व मध्य रेल्वेचे माजी कोच हिमायत अली शेख यांच्या स्मरणार्थ पुरस्कृत केलेल्या प्रथम तीन क्रमांकाच्या करंडक व सचिन बनसोडे यांनी आपले वडील सी. के. बनसोडे यांच्या स्मरणार्थ पुरस्कृत वैयक्तिक बक्षिसे प्रमुख पाहुण्याच्या हस्ते खेळाडूंना प्रदान करण्यात आली. या स्पर्धेतील मुले व मुली दोन्ही गटातील प्रथम तीन क्रमांकाच्या संघांना अनुक्रमे रुपये ५, ३ व २ हजार रुपयांचे पारितोषिक दिविजनस स्पोर्ट्स असोसिएशन मध्य रेल्वे सोलापूर यांच्यातर्फे प्रदान करण्यात आली. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पंच म्हणून श्री राघवेंद्र, यासीर तांबोळी, वेदांत तकाकुल, संपत, शहाबाज कुरेशी म्हणून काम पाहिले.



## आयडियल स्कूलमध्ये शालेय क्रीडा सप्ताहास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

येथील आयडियल स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. याचे उद्घाटन माजी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव व येथील सुवर्णकन्या वेगवान धावपटू पूजा राठोड यांच्या हस्ते झाले. संस्थापक अध्यक्ष सचिन चव्हाण व सचिवा ज्योती चव्हाण आणि मुख्याध्यापिका उर्मिला कटप यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. सप्ताहात कबड्डी, थ्रोबॉल, रस्सीखेच, व्हॉलीबॉल थ्रोबॉल मैदानी, लंगडी, संगीत खुर्ची अशा विविध खेळांचा समावेश आहे. या स्पर्धेचे नियोजन व मार्गदर्शन करण्यात क्रीडा शिक्षक रवींद्र चव्हाण व रविराज माने यांचे सहकार्य लाभले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत


https://epaper.dainiktarunbharat.com/



सामान्य माणसासाठी आयुष्यभर झटणाऱ्या, पद-प्रतिष्ठेच्या मोहापासून दूर राहणाऱ्या, काम हेच पूज्य मानणाऱ्या पन्नालाल सुराणा या समाजवादी संतकार्यकर्त्यांचे सोलापूर येथे वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले. राष्ट्रसेवा, समाजिक न्याय, शेतकरी-वंचित-शोषितांसाठी आयुष्य होम करणाऱ्या या अपूर्व व्यक्तिमत्त्वाला ही भावपूर्ण आदरांजली.

# मायेचा हात हरपला





## निस्वार्थी राष्ट्रप्रेमी, थोर समाजवादी विचारवंत : भाई पन्नालाल सुराणा

**■ साधेपणातून उभा राहिलेला असामान्य कार्यकर्ता**

९ जुलै १९३३ रोजी बार्शी येथे जन्मलेल्या पन्नालाल सुराणा यांचे बालपण सेवा दलाच्या शाखेत गेले. पुण्यात उच्च शिक्षणासाठी गेल्यानंतर शंकरराव देव व अॅ.भि. शाह यांच्या 'समाजप्रबोधन' संस्थेचे सचिव म्हणून त्यांनी तरुण वयात कार्याची सुरुवात केली. जयप्रकाश नारायण यांच्या विनंतीवरून केवळ २१व्या वर्षी ते बिहारला गेले आणि तिथल्या समाजवास्तवाने त्यांच्यातील कार्यकर्ता अधिकच तावून-सुलाखून निघाला. भूदानात मिळालेल्या जमिनींचे वाटप भूमिहीनांना करण्याची मोठी जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे निभावली.

**■ पदलोभ नसलेला प्रामाणिक नेता**

विश्वनाथ प्रतापसिंह पंतप्रधान असताना त्यांना राज्यपालपदाची ऑफर आली होती. पण मला सर्वसामान्यांमध्येच काम करायचे आहे, राजभवन नको, असे सांगत त्यांनी सन्मानपूर्वक त्या पदाचा त्याग केला. जनता पक्षाचे सरचिटणीस, समाजवादी आंदोलनातील अग्रणी भूमिका, राष्ट्रसेवा दलाचे अध्यक्षपद - इतकी मोठी स्थानं असूनही त्यांना कधीही मंत्रिपद, सत्ता किंवा वैभवाची लालसा वाटली नाही.

**■ स्त्री-पुरुष समानतेची आणि प्रगत विचारांची कुटुंबव्यवस्था**

त्यांनी डॉक्टर वीणा यांच्याशी आंतरजातीय विवाह करून समाजाला प्रगत विचारांचा संदेश दिला. वीणा सुराणा यांनी मुलींच्या शिक्षणासाठी दिलेलं योगदानही मोठं होतं. त्यांच्याच पाठिंब्याने सुराणा संपूर्ण वेळ समाजकार्यास वाहू शकले.

**■ भूकंपातील अनाथ मुलांसाठी 'आपलं घर'**

१९९३ च्या लातूर-उस्मानाबाद भूकंपानंतर अनाथ मुलांचे पुनर्वसन हा मोठा प्रश्न उभा राहिला. सुराणा यांनी 'आपलं घर' हा निवासी प्रकल्प उभारून हजारो मुलांना सुरक्षित भविष्य दिले. या प्रकल्पातून उदढेवरू एक कोटींचा कायम स्वरूपी निधी निर्माण झाला आहे.

श्रद्धांजली
अरूण बळप, बार्शी

**■ लेखन, संघटन आणि सततचा प्रवास**

एसटी व रेल्वे या सामान्य वाहतुकीचे lifelong सहकारी. दररोज पहाटे ५० पोस्टकार्ड लिहून देशभरातील कार्यकर्त्यांशी संपर्क ठेवणारे. त्यांनी ६९ पुस्तके लिहिली - 'ग्यानबाचे अर्थकारण' - अर्थशास्त्र सामान्यांना समजेल असे पुस्तक 'ओळख संविधानाची' - दहा हजारांहून अधिक प्रती आजही अनेक विद्यार्थी व कार्यकर्ते ही पुस्तके मार्गदर्शक म्हणून वापरतात. सतत हसत-ऐकत राहणारा, चिडचिड न करणारा विशाल व्यक्तिमत्त्व कुणी कितीही चुकीचे असले तरी शांतपणे ऐकून घेणारा, समोरच्या माणसाला समजून घेणारा, सौजन्याने वागणारा असा त्यांचा स्वभाव. त्यांच्या जिव्हाळ्याच्या वागणुकीने त्यांनी शेकडो कुटुंबांचे विश्वासाचं नातं जपलं. अशा महान व्यक्तिमत्त्वास शतशः नमन! पन्नालाल सुराणा हे नाव म्हणजे निस्वार्थी समाजकारण लोकशाहीवरील अतूट विश्वास संघर्षशील पण अ[illegible] भूमिका कार्याची अखंड साधना त्यांच्या जाण्याने समाजसेवेचा, समाजवादी चळवळीचा व देशप्रेम[illegible] एक तेजस्वी दीप विझला आहे. परंतु त्यांच्या विचारांची ज्योत अजूनही शेकडो कार्यकर्त्यांच्या म[illegible] पेटती आहे. आपले सामाजिक ऋण फेडण्यासाठी आयुष्यभर झटणाऱ्या पन्नालाल सुराणा यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**■ अंत्यदर्शन व प्रार्थना सभा**

आपलं घर प्रकल्प, नळदुर्ग चे संस्थापक, राष्ट्रसेवा दलाचे माजी अध्यक्ष पन्नालालजी सुराणा (वय ९४) यांचे काल रात्री सिव्हिल हॉस्पिटल सोलापूर येथे दुःखद निधन झाले अचानक त्रास होऊ लागल्यामुळे त्यांना सिव्हिल हॉस्पिटल सोलापूर येथे आणण्यात आले तेथेच त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांचे मागे पुत्र प्रभास व कन्या आरती बरीदे आहेत. मरणोत्तर त्यांचे देहदान केले असून बुधवार दुपारी बारा वाजेपर्यंत त्यांचे पार्थिव सिव्हिल हॉस्पिटल सोलापूर येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. प्रार्थना सभा आज दुपारी ३.३० वाजता जैन स्थानक, सोमवार पेठ येथे आयोजित करण्यात आली आहे. श्री भगवंत त्यांचे आत्म्यास सद्गती देवो.

### आयुष्यभर संघर्ष कारावासाचीही पर्वा नाही

- १९६७ : एसटी कर्मचाऱ्यांचे संघटन उभे करताना आंदोलन व तुरुंगवास
- 'एक गाव, एक पाणवठा' चळवळीत सक्रिय सहभाग
- आणीबाणी काळात वेषांतर करून कार्यकर्त्यांना संदेश पोहोचवणे
- भूमिहीन शेतकऱ्यांसाठी लढत असताना सात वेळा कारावास
- त्यांच्या संघर्षाची हीच खरी ओळख होती - लोकांकरिता कुठलीही किंमत मोजण्याची तयारी.

### रुई-दुधीतील आदर्श ग्रामविकास

- परांडा तालुक्यातील ग्रामीण भागात त्यांनी-
- २१ एकर गायरान जमिनीवर संशोधन संस्था उभारली
- ५ हजारांहून अधिक झाडं लावली रोपवाटिका व शेतीमदत पाणलोट कामे
- शेळीपालनाचे प्रशिक्षण
- ४२ गावांत ३ हजार एकल महिलांचे संघटन
- या कामामुळे रुई-दुधी हा दुष्काळग्रस्त भाग विकासाचे केंद्र बनला.

# अनाथांचा नाथ गेला

राष्ट्रसेवादलाचे माजी अध्यक्ष,समाजवादी नेते,आपलं घर प्रकल्प आधारवड,असंख्य कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान पन्नालाल भाऊ सुराणा यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी देहावसान झाले. त्यांच्या पश्चात मुलगा प्रभास, आणि कन्या आरती असा परिवार असून त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांचे पार्थिव सोलापूर सिव्हिल मेडिकल कॉलेज ला देहदान करण्यात आले, हजारो अनाथांचे तारणहार पन्नालालजी सुराणा हे मूळचे बार्शीचे शाळेत असतानाच ते राष्ट्रसेवा दलात दाखल झाले, पुढे तरुणपणी त्यांनी जयप्रकाश नारायण यांच्या बिहारमधील सोखादेवरा येथील सर्वोदय आश्रमात राहून भूदान चळवळीत भाग घेतला, समाज प्रबोधन संस्थेचे सचिव, समाजवादी पक्षाच्या राज्य शाखेचे सचिव म्हणून ही त्यांनी काम पाहिले, महाविद्यालयीन शिक्षण झाल्यानंतर त्यांनी पत्रकारिता केली, मराठवाडा दैनिकाचे ते संपादक होते साथी सुराणा यांचा व्यासंग दांडगा होता शिक्षण, शेती, बेरोजगारी, या विषयावर त्यांनी विपुल लिखाण केले आहे, ते गेल्याची बातमी धक्कादायक होती, जगण्याला हलकी, ऊबदार फुंकर घालून प्रत्येकाला सोन्यासारखे घडवण्याची किमया ज्यांच्या स्वभावात होती, असे अवलिया व्यक्तिमत्त्व म्हणजे पन्नालालजी सुराणा.

त्यांनी राजकीय, आर्थिक, वैज्ञानिक, अशा विविध विषयावर ४० पुस्तके लिहिली आहेत, दुष्काळ निवारण,निर्मूलन, शेतकरी, शेतमजूर यांच्या हक्कासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली, आणीबाणी च्या काळात ते भूमिगत होते, त्या नंतर त्यांना अटक झाली होती, भूमी मुक्ती आंदोलनात त्यांना ४ वेळा त्यांना तुरुंगवास झाला होता, लातूर किल्लारी भागात झालेल्या भूकंपात निराधार झालेल्या मुलासाठी त्यांनी नळदुर्ग येथे आपलं घर ही निवासी शाळा सुरू केली, पर्यावरण आणि जलसंधारण क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे.

श्रद्धांजली
श्रीकांत अणदूरकर, अणदूर

काही दिवस पत्नी डॉ. वीणाताई यांच्या समवेत त्यांचे बिहारमध्ये वास्तव्य होते, त्या नंतर समाजवादी पक्षात त्यांनी काम केले, जनता पक्षाचे ते प्रदेश सचिव होते, बार्शी येथील विधानसभा व सोलापूर लोकसभा मतदारसंघात त्यांनी निवडणूक लढवली होती, सन २०१५ साली त्यांनी नळदुर्ग शहरातील बहुतांश कुटुंबीयांची घरे नगर परिषद प्रशासनाने पाडली होती त्या विरुद्ध त्यांनी वयाच्या ८३ व्या वर्षी आंदोलन करून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून दिला होता. त्यांच्या आयुष्याचे अनेक पैलू आहेत त्यातील प्रमुख म्हणजे पत्रकारिता, आंदोलन, राजकारण, देशभक्तीचे उपक्रम सगळंच अद्वितीय. त्यांची माणुसकी, समर्पण आणि संवेदनशीलता फार महान होती नळदुर्ग येथील 'आपलं घर' भूकंपग्रस्त अनाथ मुलांसाठी उभारलेले निवासगृह व शाळा आजही निराधारांचा मोठा आधार आहे. आपलं घर येथील भाजी पाल्याची शेती अफलातून आहे, आपणच पिकवलेला भाजीपाला आपल्याच हॉटेल ला वापरायचा म्हणजे स्वावलंबन हा मोठा मंत्र ते विद्यार्थ्याला देत असत, ८०-९० वर्षांच्या वयातही त्यांची कामाविषयीची तळमळ, समाजाबद्दलची ओल आणि जगण्याचा उत्साह, तरुणांना लाजवेल असाच होता, अशी माणसं जिवंत राहणं समाजातील वंचित घटकांसाठी, गरजूंसाठी, असंघटित समाजघटकांसाठी अत्यंत आवश्यक असते. पण नियतीपुढे कोणाच काही चालत नाही आज ते आपल्यातून निघून गेले आज हजारो निराधारांचा आधार गेला, आज त्यांचं जाणं म्हणजे अनाथांचा नाथ गेला. भावपूर्ण श्रद्धांजली.

### आज शोकसभा

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत लेखक साथी पन्नालाल सुराणा यांच्या निधनानिमित्त श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्यावतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. ४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात ही शोकसभा होईल. ज्या संस्था आणि व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण करायची आहे त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर व कार्यवाह दत्ता गायकवाड यांनी केले आहे.

मांडणी व सजावट : मयुरा तारे



▶ ज्येष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांचे मंगळवार, दि. २ डिसेंबर निधन झाले. वयाच्या ९३ व्या वर्षी पन्नालाला सुराणा यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांनी देहदान केले. त्यांचे पार्थीव व्ही.एम. मेडिकल कॉलेज येथे देहदान करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित केली.



▶ सोलापूर शहरात बुधवारी सकाळी व्ही.एम. मेडिकल कॉलेज येथे त्यांच्या कुटुंबीयांनी अंत्यदर्शन घेतले.








सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना पुस्तक भेट देताना पन्नालाल सुराणा



## नि:स्पृहतेचा आदर्श काळाच्या पडद्याआड : मुख्यमंत्री

महाराष्ट्रातील समाजकारण- राजकारणातील नि:स्पृहतेचा आदर्श काळाच्या पडद्याआड गेल्याची शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ विचारवंत, समाजसेवक पन्नालाल सुराणा यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात,'सुराणा यांनी शेवटच्या श्वासापर्यंत समाजसेवेचा वसा जपला. त्यांनी राजकीय क्षेत्रातही आदर्शवाद जोपासला. शेती, शेतकरी यांच्यासह पर्यावरण रक्षण, जलसंधारण यांच्यासाठी ते अखेरपर्यंत व्रतस्थपणे कार्यरत राहीले. नळदुर्ग येथील 'आपलं घर' बालगृह व शाळेच्या माध्यमातून त्यांनी शेकडो अनाथ मुलांच्या आयुष्यात नवसंजीवनी आणली. त्यांची निस्पृह आणि आदर्श अशी जीवनशैली समाजकारण - राजकारणातील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. ज्येष्ठ समाजसेवक पन्नालाल सुराणा यांचे निधन महाराष्ट्राच्या समाजकारण राजकारण क्षेत्राची हानी आहे, अशी भावना व्यक्त करून मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सुराणा यांचे कुटुंबीय तसेच कार्यकर्ते यांच्याप्रती संवेदना व्यक्त केली आहे. आपण या सर्वांच्या दुःखात सहभागी असल्याचे नमूद केले आहे.

## 'आपलं घर' पोरकं झालं : उपमुख्यमंत्री अजित पवार



ज्येष्ठ समाजवादी नेते, दैनिक मराठवाडाचे माजी संपादक पन्नालाल सुराणा यांच्या निधनाने भूमिहीन शेतकरी, मजूर, वंचितांच्या हक्कांसाठी लढणारे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, जुना समाजवादी पक्ष,जनता पक्ष, अनेक पुरोगामी संघटना आणि जन आंदोलन यांच्या उभारणीमध्ये पन्नालाल सुराणा यांचा मोठा वाटा होता. 'चले जाव' आंदोलनापासून ते स्वातंत्र्य चळवळीपर्यंत, त्यानंतर स्वातंत्र्य ते आणीबाणी आणि त्यानंतर देशाच्या सामाजिक,राजकीय स्थित्यंतराचे ते साक्षीदार होते. मराठवाड्यात भूकंपात सर्वस्व गमावलेल्यांसाठी त्यांनी सुरू केलेल्या 'आपलं घर' मधून अनेक मुला- मुलींची आयुष्य घडली आहेत. पन्नालाल सुराणा यांच्या निधनाने समाजवादी चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे. पर्यावरण आणि जलसंधारणाच्या क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे.सामाजिक न्यायासाठी त्यांचा लढा कायम स्मरणात राहील. त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पन्नालाल सुराणा यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महानगरपालिका निवडणूक मदत कक्षाचे उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रारूप मतदार यादीवरील आक्षेपांसह मतदार यादीत मतदारांचे नाव पाहण्यासाठी मनपात मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या मदत कक्षाचे उद्घाटन मनपा आयुक्त मानसी मीना त्यांच्या हस्ते करण्यात आले.

मनपा सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचनांचा कार्यक्रम




दि. ३ डिसेंबरपर्यंत सुरु आहे. सदर प्रारूप मतदार यादीतील मतदारांना आपल्या प्रभागातील मतदार यादीत नाव असल्याची खात्री करून घेण्यासाठीनुख्या कार्यालय व क्षेत्रीय कार्यालयात मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. मनपा कार्यालयातील मदत कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, सहायक आयुक्त नंदकिशोर तापडे, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, वाहन विभाग प्रमुख पवन सुरवसे, निवडणूक विभागाचे महेश शर्मा, दीपक पवार. संदीप बुलबुले उपस्थित होते.



# वाहनधारकांना शिस्त लावण्यासाठी पोलिसांकडून दंडात्मक कार्यवाहीचा बडगा



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** लातूर शहरातील अवैध प्रवासी वाहतूक करणारे वाहनधारक तसेच शहरातील औसा रोडवर खाद्यपदार्थांच्या हातगाड्यांसमोर बेशिस्तपणे वाहने पार्क करणाऱ्या वाहनधारकांवर लातूर पोलिसांनी दंडात्मक कार्यवाहीचा बडगा उगारण्याचा निर्णय घेतला असल्याचे शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांनी सांगितले.

बहुसंख्य वाहनधारक वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करताना दिसत नाहीत. ऑटोचालक आपल्या पुढच्या सीटवर बेकायदेशीरपणे प्रवाशी वाहतूक करताना आढळून येतात. ऑटोचालक त्यांना नेमून देण्यात आलेला गणवेश परिधान करताना दिसत नाहीत. शहरात बेशिस्तपणे कोठेही अचानक ऑटो थांबविणे, प्रवासी चढ-उतार करणे, चौका-चौकामध्ये वळणांवर प्रवासी घेण्यासाठी ऑटोरिक्षाची दुहेरी रांग करून ऑटो थांबविणे आदी कारणांमुळे अन्य वाहनधारकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी पोलीस प्रशासनाकडे आल्याने शहर वाहतूक शाखेने वाहनधारकांना शिस्त लावण्यासाठी दंडात्मक कार्यवाहीची मोहीम हाती घेतली आहे. मोटारसायकलवरून ट्रिपल सीट प्रवास करणे, विना कागदपत्र, इन्शुरन्स, पीयूसी, वाहनांची कागदपत्रे सोबत न बाळगणाऱ्या वाहनधारकांवरही यापुढे दंडात्मक कार्यवाही केली जाणार आहे. चालत्या वाहनावर मोबाईलवर संभाषण करणाऱ्यांनाही आता या कार्यवाहीचा सामना करावा लागणार आहे. मोटार वाहन कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर कठोर कार्यवाही केली जाणार आहे. गणवेश न परिधान करता ऑटो चालवणाऱ्या २०३ ऑटोचालकणांवर केसेस करण्यात आल्या असून १ लाख ४१ हजार ५५० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. मुख्य चौकात ५० ते ७५ मीटर अंतराचे आत थांबणाऱ्या ऑटो तथा वाहनावरही कार्यवाही केली जाणार असल्याचे समीरसिंह साळवे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी सांगितले.

## इस्कॉनच्या मूल्य शिक्षणावर आधारित ७ डिसेंबरला कार्यक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** इस्कॉनच्या लातूर परिवाराच्या वतीने रविवार दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी चार वाजता महाविद्यालयीन तरुणांसाठी मूल्य शिक्षणावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम बार्शी रोडवरील गिरवलकर मंगल कार्यालयात होणार आहे. या कार्यक्रमासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र . कुलगुरू अशोक महणज, नॅकचे संचालक सुरेंद्रनाथ रेड्डी यांची उपस्थिती राहणार आहे. देशातील ख्यातनाम प्रेरणादायी व्याख्याते अमोल लीला दास यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थी व उपस्थितांना होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी विद्यार्थ्यांना नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रातील किंवा महाविद्यालयीन अधिकाऱ्यांकडून प्रवेश पासेस उपलब्ध करून दिले जाणार आहेत. या कार्यक्रमासाठीची नोंदणी पूर्णतः निःशुल्क आहे. मात्र प्रवेशासाठी पासेस अनिवार्य करण्यात आलेले आहेत. या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त विद्यार्थी व तरुणांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## अभिनेत्री विशाखा सुभेदार यांच्या हस्ते नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद जिल्हा शाखा लातूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी दोन वाजता हास्यजत्रा फेम अभिनेत्री विशाखा सुभेदार यांच्या विशेष उपस्थितीत दगडोजीराव देशमुख नाट्यगृह, मार्केट यार्ड लातूर याठिकाणी संपन्न होणार आहे.



याप्रसंगी माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे. या वर्षीच्या स्पर्धेत एकूण २८ संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यामध्ये हैद्राबाद, पुणे, मुंबई, ठाणे, जालना, परभणी, लातूर, सोलापूर आदी ठिकाणच्या संघांनी एकांकिका सादर केल्या. विजयी संघांना अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ अभिनेत्री विशाखा सुभेदार अभिनित दि दमयंती दामले या कौटुंबिक विनोदी नाटकाचा प्रयोगही खास लातूरकराच्या आग्रहास्तव नाट्य रसिकांसाठी गुरुवारी रात्री ९ वाजता दगडोजीराव देशमुख सभागृह लातूर येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास नाट्यप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन नाट्य परिषदेचे लातूर जिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, कार्यवाह धनंजय बेंबडे, समन्वयक अविष्कार गोजमगुंडे, अजय गोजमगुंडे, कोषाध्यक्ष अमोल नानजकर, कल्याण वाघमारे, एड. राणीताई स्वामी, अरुण बारस्कर, बालाजी सूळ, संतोष साळुंके, अनिल कांबळे, उमाकांत हुरदुडे, राजू गड्डीमे, सुधन्वा पत्की आदिंनी केले आहे.

# थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी जप्ती मोहीम

### नागरिकांनी तातडीने कर भरून प्रशासनास सहकार्य करावे : आयुक्त श्रीमती मानसी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** मालमत्ता कर वसुली साठी महानगरपालिकेने अनेक वेळा कर सवलतीची योजना राबवली मात्र बर्याच मालमत्ताधारकांनी याकडे कानाडोळाच केला.त्यामुळे महानगरपालिकेने आता थेट धडक जप्ती मोहिमेला सुरवात केली आहे.त्याकरिता ८ पथक नेमण्यात आले आहेत.

लातूर शहर महानगरपालिकेमार्फत शहरातील प्रलंबित मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत मालमत्ता कराची थकबाकी ठेवणाऱ्या करदात्यांविरुद्ध कठोर पावले उचलून त्यांच्या मालमत्तांवर जप्ती व नळ खंडन कारवाई करण्यात येत आहे.

आज दि.३ डिसेंबर रोजी महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय सी अंतर्गत तीन नळखंडन करण्यात आले व तर ३ निवासी मालमत्तांचे जप्ती करण्यात आले तसेच क्षेत्रीय करायला ब तीन नळखंडन व ५ निवासी मालमत्तांचे जप्ती करण्यात आले आले. तसेच क्षेत्रीय कार्यालय अ अंतर्गत जप्ती मोहिमेअंतर्गत ८ निवासी मालमत्तांचे जप्ती करण्यात आले आले.

थकीत कराच्या वसुलीसाठी मनपाकडून मोहीम राबविण्यात



येत आहे. ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. जप्त केलेल्या मालमत्ताधारकांनी मुदतीत कर भरणा न केल्यास लिलाव प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यामुळे जप्तीसारखी कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी कर भरून मनपाला सहकार्य करावे, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

# कृषीपंपांना कॅपॅसिटर बसवा, रोहीत्रे व वीजयंत्रणेची हानी टाळा

### महावितरणचे शेतकऱ्यांना आवाहन



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** रब्बीचा हंगाम सुरू झाला की कृषीपंपाचा वापर वाढत जातो. अनेकदा रोहीत्रांसोबतच पाण्याची मोटर जळाल्याच्या तक्रारी वाढत जातात. विजेचा भार नियंत्रीत करणारे कॅपॅसीटरचा वापर फार कमी शेतकरी करतात त्याचबरोबर ॲटोस्विचचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. परिणामी अचानक विजेचा भार वाढल्याने वीज यंत्रणे सोबतच पाण्याची मोटर जळण्याचे प्रमाण वाढते त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषीपंपाचा वापर योग्य ते कॅपॅसीटर लावूनच करावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर कृषिपंप तत्काळ सुरू करण्याच्या उद्देशाने बहूतांश शेतकरी कृषिपंपाना ऑटोस्विच बसविले आहेत. त्यामुळे परिसरातील अनेक कृषिपंप एकाच वेळी सुरू होऊन रोहित्रावरील भार अचानक वाढतो. परिणामी रोहित्र जळणे, वीजवाहिन्या बंद वा नादुरुस्त होणे तसेच पाण्याची मोटर जळन्याचे प्रमाण वाढते. यातून होणारी गैरसोय व नुकसान होवू नये तसेच सुरळीत व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळावा, यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विचऐवजी कॅपॅसिटर बसवावेत.

राज्यात ४५ लाखांहून अधिक कृषिपंपधारक शेतकरी आहेत. महावितरणकडून शेतकऱ्यांना दिवसा व रात्री अशा चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येतो. रात्रीच्या वेळेत वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर शेतात जाऊन कृषिपंप चालू करण्याचा त्रास वाचवण्यासाठी राज्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विच लावले असल्याचे दिसून येते. त्यामुळे वीज येताच कृषिपंप आपोआप चालू होतो. परिणामी रोहित्रांवरील भार एकाच वेळी वाढत असल्याने रोहित्र जळण्याचे किंवा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढत आहे. ऐन हंगामात रोहित्र जळाल्यास त्याची झळ शेतकऱ्यांनाही सोसावी लागते. हे टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विच लावू नये तसेच इतर शेतकऱ्यांनी ते लावले असल्यास त्वरीत काढून टाकावेत असे आवाहन महावितरणने केले आहे.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात

### शीघ्र निदान आणि उपचारामुळे दिव्यांगत्वाचे प्रमाण कमी करणे शक्य : राहुलकुमार मीना







**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३ डिसेंबर :** दिव्यांगत्व टाळण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. शीघ्र निदान व उपचारामुळे दिव्यांगत्वाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे बालकांमधील दिव्यांगत्वाचे निदान करून त्यांना वेळीच उपचार उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. अंगणवाडीस्तरावर यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग कल्याण आयुक्तालय, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद, लातूर, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व दिव्यांगांच्या विशेष शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथील रुक्मिणी मंगल कार्यालय येथे आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेचे उद्घाटन मीना यांच्या हस्ते झाले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, महिला व बालकल्याणचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादवराव गायकवाड, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, माध्यमिक शिक्षण विभागाचे अधिक्षक मधुकर वाघमारे यांची उपस्थिती होती.

दिव्यांगत्वाला शारिरीक व्याधी न समजता सामाजिक दायित्व समजून दिव्यांगांचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. तसेच दिव्यांगत्व टाळण्यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक आहेत. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून दिव्यांगांनाही विविध संकेतस्थळांवर माहिती व लाभ ही मिळत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये १०० विशेष शिक्षकांना सामावून घेण्यात आले आहे. आता त्यांना विशेष प्रशिक्षण देण्याचा मानस आहे, असे मीना म्हणाले.

प्रास्ताविकात जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी नाईकवाडी यांनी यंदाच्या वर्षात विविध उपक्रम राबवून ३ ते ९ डिसेंबर दरम्यान दिव्यांग सप्ताह साजरा होणार असल्याचे सांगून जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या सहाय्याने ट्रायसिकल व विविध दिव्यांगांना उपयुक्त साहित्य ही वाटप केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन बंकट पवार, व्यंकट लामजने, सिंधू इंगळे यांनी केले, तर डॉ. राजु गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून रंगकर्मी अश्लेषा वाकडे व अभिनव घोडके यांनी काम पाहिले. यशस्वीतेसाठी शिवाजी शिरडे, मोहन चव्हाण, बाळासाहेब वाकडे, डॉ. योगेश निटुरकर, बस्वराज पैके, विक्रम जाधव, राहुल काळे, शिवराज गायकवाड, वर्षा जोगदंड, विजय बुरांडे, अण्णासाहेब कदम, शिवप्रसाद भंडारे, गणेश पाटील, बालाजी बनसोडे, श्रीकांत उंबरे यांनी परिश्रम घेतले.

यंदाच्या वर्षात दिव्यांग दिनानिमित्त विशेष दिव्यांग थीम तयार करण्यात आली असून 'सामाजिक प्रगतीसाठी दिव्यांग- सर्वसमावेशक समाज घडविणे' ही विशेष बाब राहणार आहे. यात दिव्यांगासाठी स्वीकार व आदर, दया नव्हे मान-सन्मान, कौशल्य व क्षमतेला मान्यता देणे, समान संधी उपलब्ध करून देणे, शिक्षण, रोजगार व आरोग्य सेवा व सार्वजनिक वाहतुक यामध्ये भेदभाव न करता संधी देणे. यासह विविध दिव्यांगांप्रती सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

या थीमची माहिती विशेष शिक्षक व्यंकट लामजने यांनी दिली.

**दिव्यांग विद्यार्थ्यांनी सादर केला लक्षवेधी कलाविष्कार**

या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत जिल्ह्यातील ५७ दिव्यांगांच्या शाळांतील ३३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या या कलाविष्काराने रसिक मंत्रमुग्ध झालेच, याशिवाय दिव्यांगांच्या उत्कृष्ट कलाकृतीने मान्यवरांनाही मोहित केले. यात समुहनृत्य गायन, मुकनाट्य, वैयक्तिक नृत्य, लावणी, देशभक्तीपर गीत यांचा समावेश होता.

# निळकंठेश्वर कारखान्यातील साखर पोत्याचे पूजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, ३ डिसेंबर :** अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर किल्लारी



येथील निळकंठेश्वर साखर कारखान्याचे नूतनीकरण करुन सुरु करण्यात आलेल्या पहिल्याच गाळप हंगामात उत्साहवर्धक कामगिरी करत तब्बल १८ हजार मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण केले आहे. या ऐतिहासिक आनंद व्यक्त करत हंगामातील पहिल्या साखर पोत्याचे पूजन आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते विधीवत पार पडले.

संतोष बेंबडे, कार्यकारी संचालक डी. एल. पतंगे, सेक्रेटरी तुकाराम पवार,व्ही एस आय चे शास्त्री, चिंफ इंजिनिअर भोसले, चिंफ केमीस्ट आण्णासाहेब मोरे, चिप अकाऊंट संतोष वाडीकर, मुख्य शेतकी अधिकारी कल्याण शिंदे, ऊस पुरवठा अधिकारी युवराज धुमाळ, सिव्हिल इंजिनिअर गणेश शिंदे आदी उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या कारखान्याला पुन्हा सुरू करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी सातत्याने पाठपुरावा करत अथक परिश्रम घेतले. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने कारखान्याचे संपूर्ण आधुनिकीकरण करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञान, नव्या सुविधा आणि गाळपक्षमता वाढवून कारखाना आता पूर्ण क्षमतेने कार्यरत झाला आहे.दोन जिल्हे आणि चार तालुक्यांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा कारखाना पुन्हा सुरू होणे म्हणजे मोठा दिलासा आहे.

वाहतूक खर्चात बचत, वेळेवर गाळप आणि योग्य दर मिळण्याची हमी यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण झाले आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेलाही या कारखान्यामुळे नवसंजीवनी

**आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते संपन्न**

मिळत असून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत.

या गाळप हंगामात सुमारे तीन लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून सुरुवातीपासूनच गाळपाचा वेग समाधानकारक आहे. कारखान्याच्या सुरूवातीमुळे ग्रामीण भागात औद्योगिक विकासाला चालना मिळणार असून किल्लारी परिसरातील शेतकरीहितासाठी हे पाऊल ऐतिहासिक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

# ‘कै. रसिका’ महाविद्यालयाच्या खेळाडूंची ॲथलेटिक्स संघात निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, ३ डिसेंबर :** कै. रसिका महाविद्यालयातील गीते पिराजी (इ.उे ऋध ), आरती टिंगरे (इ.उे डध) , अश्र्विनी स्वामी( इ.उजचए ढध) या तीन खेळाडूची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या थलेटिक्स संघात निवड झालेली आहे.

२७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा दिनांक २ ते ८ डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कॅम्पस मध्ये येथे होत आ-हेत. या स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी गीते पिराजी, आरती टिंगरे, स्वामी अश्विनी या विद्यापीठ संघात निवड झाली आहे.

या खेळाडूस प्रा.डॉ. सचिन चामले यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या खेळाडूंची विद्या-पीठ संघात निवड झाल्याबद्दल संस्थाध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, सचिव गजानन भोपणीकर, व सर्व संस्था पदाधिकाऱ्यांतर्फे तसेच प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक



व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केलेले आहे. व पुढील स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

# सहकारमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान शिबिर



**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ३ डिसेंबर :** येथील काकी प्रतिष्ठानच्या वतीने राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी ५ डिसेंबर रोजी शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवासस्थानी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या महारक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या व्यक्तीचा वैयक्तिक

५ लाख रुपयाचा अपघ-ाती विमा काकी फाउंडेशनच्या वतीने काढण्यात येणार असल्याची माहिती सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंदचे उपसरपंच सुरज पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिली आहे.

लातूर जिल्ह्यातील सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्यावर प्रेम करणाऱ्या तमाम नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवावा असे आव-ाहन सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंद चे उपसरपंच सुरज पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# येरोळ-जांभळवाडीमध्ये श्री दत्त जन्मोत्सव सोहळ्याला सुरुवात

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ३ डिसेंबर :** येरोळ, जाभंळवाडी (ता. शिरुर अनंतपाळ) येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री अवध-ूत सिद्धी संस्थानतर्फे मंगळवार, दि. २ पासून श्री दत्त जन्मोत्सव सोहळ्याची मंगल सुरुवात झाली. मंगळवारी सकाळी आठ वाजता ‘श्री दत्त महात्म्य’ पारायणाने उत्सवाची सुरुवात झाली. रात्री साडेआठ ते अकरा या वेळेत श्री हरिभक्त परायण बंडा महाराज अलगरवाडीकर यांचे भक्तिमय कीर्तन रंगले.

बुधवारी सकाळी बेलेश्र्वर महादेवाचे रुद्राभिषेक आचार्य श्री सचिन देव जोशी व ब्रह्मावृंद यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून, रात्री साडेआठ वाजता श्री हरिभक्त परायण संदिपान महाराज सुमठाणकर यांचे कीर्तन होईल.

गुरुवारी श्री अवधूत स्वामी अभिषेक, श्री दत्तमाला मंत्र हवन, तसेच दुपारी बारा वाजता श्री हरिभक्त परायण महादेव महाराज लिंबवाडीकर यांचे गुलालाचे व श्री दत्त जन्मोत्सवाचे कीर्तन होणार आहे.

या पवित्र महापर्वणीचा पंचक्रोशीतील सर्व भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री अवधूत सिद्धी संस्थानचे प्रमुख ह.भ.प. सुरेश महाराज सारसेकर यांनी केले आहे. भक्ती, श्रद्धा आणि परंपरेची सांगड घालत यंदाचा दत्त जन्मोत्सव सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा होत आहे.

# क्रीडा मशाल ज्योतीचे म.गांधी महाविद्यालयात स्वागत

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ३ डिसेंबर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, त्यानिमित्ताने लातूर जिल्ह्यात आलेल्या क्रीडा मशाल रॅलीचे स्वागत येथील महात्मा गांधी महाविद्यालयात करण्यात आले. राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवाविषयी विद्यापीठ परिक्षेत्रातील खे-ळाडू व क्रीडा प्रेमींमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी दिनांक ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २०२५ या कालावधीत क्रीडा ज्योत मशाल रॅलीचे हिंगोली, परभणी, नांदेड व लातूर जिल्ह्यात आयोजन करण्यात आले आहे.

त्यानिमित्ताने विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. डॉ. मारुती गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली सदरील रॅलीचे लातूर जिल्ह्यात सोमवार दिनांक १ डिसेंबर रोजी महात्मा महाविद्यालयात आगमन झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांच्या हस्ते रॅलीचे स्वागत करण्यात आले. तसेच नशामुक्त भारताची शपथ घेण्यात आली.

लातूर जिल्हा रासेयो डॉ यादव सूर्यवंशी, राष्ट्रीय सेवा डवरे, डॉ. एस. बी. शिंदे, डॉ.




समन्वयक प्रा. डॉ. बाल-ाजी होकरणे, महाविद्यालयातील संस्थेचे प्रतिनिधी प्रा. हेमंत पाटील, स्टाफ सेक्रेटरी प्रो. डॉ. ए. पी. कांबळे, प्रसिद्धी प्रमुख योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी माकणे-पाटील, डॉ. प्रकाश देशमुख, एन.सी.सी. प्रमुख डॉ. श्रीमती ए. एम. शिंदे, प्रा. जी. व्ही. ताटे, प्रा. प्रकाश ए. आर. कराड, डॉ. व्ही. पी. शेळके, डॉ. एस. आर. होळकर, विशाल करंजे, सिद्धेश्वर चोथवे, शंकर शेळके, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी-विद्यार्थी उपस्थित होते.

# सहकारमंत्र्याच्या वाढदिवसानिमित्त रक्तदात्याचा काढणार पाच लाखांचा विमा



**चाकूर, २ डिसेंबर :** सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून काकी फाऊंडेशनच्या वतीने रक्तदात्याचा पाच लाखांचा अपघाती विमा काढण्यात येणार असल्याची माहिती सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंदचे उपसरपंच सुरज पाटील

**काकी फाऊंडेशनचा उपक्रम; अविनाश जाधव, सुरज पाटील यांची माहिती**

यांनी दिली आहे.

राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा वाढदिवस ५ डिसेंबर रोजी असून या वाढदिवसानिमित्त प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निव-ासस्थानी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या महारक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या व्यक्तीचा वैयक्तिक ५ लाख रुपयाचा अपघ-ाती विमा काकी फाउंडेशनच्या वतीने काढण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्यावर प्रेम करणाऱ्या तमाम नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवावा असे आवाहन सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंद चे उपसरपंच सुरज पाटील यांच्या वतीने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# सम्राट चंद्रगुप्त मौर्य इंटरनॅशनल स्कूलमध्ये आनंद नागरी



**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ३ डिसेंबर :** सम्राट चंद्रगुप्त मौर्य इंटरनॅशनल स्कूल, रुद्धा ता.अहमदपूर येथे रोजी आनंद नगरी मोठ्या उत्सा-हात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री.गणेश शिक्षण प्रस-ारक मंडळाचे संचालक कुलदीप भैय्या हाके आणि संचालिका सौ. शिवालिका हाके उपस्थित होत्या. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अहमदपूर पोलीस स्टेशनच्या पीएसआय अस्मिता जाधव व पोलीस उपनिरीक्षक देवकते आणि संस्थेच्या उपाध्यक्षा मानसीताई हाके यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

पीएसआय अस्मिता जाधव यांनी विद्यार्थ्यांना मोला-चे मार्गदर्शन केले व तसेच विद्यार्थ्यांनी वेगवेगळी वेशभूषा परिधान करून विद्यार्थ्यांनी ठेवलेल्या वेगवेगळ्या पदार्थांचा आस्वाद घेण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया जाधव यांनी केले व तसेच आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक हरिदास

# ‘क्रीडा ज्योत मशाल रॅली’चे मातृभूमी महाविद्यालयात स्वागत



**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३ डिसेंबर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या वतीने २७ वा महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ या दरम्यान आयोजित करण्यात आला असून, या क्रीडा महोत्सवाच्या मशाल रॅली चे स्वागत मातृभूमी महाविद्यालयात करण्यात आले.

यावेळी मशाल रॅलीचे प्रमुख स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या राष्ट्रीय सेवा योजनेची संचालक डॉ. मारोती गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विभागाच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने काढलेल्या रॅलीच्या माध्यमातून नारीचा सन्मान, राष्ट्राचा अभिनान’ स्त्री आत्मनिर्भर -देश प्रगतीपथावर ही रॅली चार जिल्ह्यात जात आहे. या मशाल रॅलीचे स्वागत, प्राचार्या उषा कुलकर्णी ,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा बिभीषण मद्देवाड यांनी केले.

या वेळी प्राचार्या उषा कुलकर्णी म्हणाले जी स्त्री स्वतःचे निर्णय स्वतः घेते, आर्थिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिकदृष्ट्या सक्षम असते आणि स्वतःची ओळख स्वतः निर्माण करते - तिला आत्मनिर्भर नारी म्हणतात. आत्मनिर्भर नारी ही घर, समाज आणि राष्ट्र या तिन्हींच्या प्रगतीचा कणा आहे. ती शिक्षण, कौशल्य, आत्मविश्वास आणि धैर्याच्या जोरावर स्वतःचा मार्ग तयार करते. ती इतर स्त्रियांनाही प्रेरित करते, आणि समाजाला योग्य दिशा देते. आत्मनिर्भर नारी म्हणजे सामर्थ्य, स्वाभिमान आणि सकारात्मक बदलाची ताकद.

यावेळी मातृभूमी महाविद्यालयातील प्रा सय्यद उस्ताद, प्रा. रणजित मोरे, प्रा. शितल पवार, प्रा शिवांगी वट्टमवार, काळे अस्विनी, प्रा काकरे प्रती-क्षा, ग्रंथपाल उषा सताळकर, रामकिशन भोसले, मादळे प्रदीप, दीपक रणदिवे, दयानंद टाके, विवेक देवर्षे, मयुर मुळे, संगीता दुडे, सय्यद सिमा, प्रकाश गायकवाड, जगदिशा ओंकारे, मुबारक पटेल, अर्चना बिरादार यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचार्‍यांनी प्रयत्न केले.

# रेणापूर तालुक्यात थंडी वाढली

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, ३ डिसेंबर :** रेणापूर शहर परिसरासह तालुक्यात थंडीचा कडाका चांगला वाढल्याचे दिसून येत आहे. वाढत्या थंडीने नागिरकांत सर्दी तापाचे रुग्णही वाढीस लागले आहेत.

मागच्या आठवडाभरापासून थंडीचा गारठा बऱ्यापैकी वाढला आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी आपले ठेवणीतील गरम कपडे, स्वेटर-कानटोप्या, मफलर बाहेर काढले असून सायंकाळच्या सुमारास शहर व परिसरात उघड्या डोक्याने कोणीही फिरताना दिसत नाही. वाढत्या थंडीचा फायदा रब्बी पिकांना चांगलं होणार असून त्यामुळे हरभरा, गहू -ज्वारीचे पीक यंदा जोमात येण्याची शक्यता असल्याचे शेतकऱ्यातून बोलले जात आहे. ही कडाक्याची थंडी कायम राहण्याची शक्यता आहे.

# मराठवाडास्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी, प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३ डिसेंबर :** उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी दिला जाणाऱ्या मराठवाडास्तरीय पत्रकारिता पुरस्काराचे आयोजन केले आहे. शोध वार्ता व उत्कृष्ट वार्ता या दोन गटातील पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठविण्याचे आ-वाहन उदगीर तालुका पत्रकार संघाकडून करण्यात आले आहे.

उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने मागच्या सतरा वर्षापासून मराठवाडा विभागीय पत्रकारिता पुरस्काराचे आयोजन करण्यात येत असुन पुरस्काराचे हे १८वे वर्ष आहे. उत्कृष्ट वार्ता व शोधवार्ता या दोन गटात आयोजित स्पर्धेत, दैनिकाच्या प्रतिनिधींनी १ डिसेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नावासह प्रकाशित

झालेली बातमी किंवा बातमीसोबत नाव नसल्यास संपादकाचे शिफारस पत्र आणि प्रकाशित साहित्याची मूळ प्रत आणि तीन साक्षांकित प्रत व वार्ताहरचे दोन पासपोर्ट फोटो, कोणत्या गटासाठी प्रवेशिका पाठवत आहे, त्याचा स्पष्ट उल्लेख पॉकेटवर लिहून स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका २५ डिसेंबर २०२५ पर्यंत

उदगीर तालुका पत्रकार संघ, द्वारा दैनिक यशवंत विभागिय कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल, ई बिल्डिंग पहिला मजला,

उदगीर जिल्हा लातूर (पिन कोड ४१३५१७) या




पत्त्यावर पाठवाव्यात. या अगोदर पुरस्कार प्राप्त झालेल्या पत्रकारांनी परत प्रवेशिका पाठवू नये असे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना उत्कृष्ट वार्ता गटात प्रथम पुरस्कार जेष्ठ पत्रकार कै. महादप्पा मुद्दा यांच्या स्मरणार्थ अर्जुन मुद्दा यांच्यावतीने रोख पाच हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे स्वरूप आहे. द्वितीय पुरस्कार स्वामी विवेकानंद महाविद्यालय वृत्तपत्र विद्या विभाग यांच्या वती वतीने तीन हजार रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र, तर तृतीय पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार कै. अनंत आपसिंगेकर यांच्या स्मरणार्थ दोन हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तसेच शोध वार्ता गटात प्रथम पारितोषिक कै. महादप्पा मुद्दा यांच्या स्मरणार्थ अर्जुन मुद्दा यांच्या वतीने रोख पाच हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक वृत्तपत्र विद्याविभाग स्वामी विवेकानंद महाविद्यालय

यांच्यावतीने तीन हजार रुपये, प्रमाणपत्र, तृतीय पारितोषक कै. व्यंकटराव कलप्पा मोगले यांच्या स्मरणार्थ रोख दोन हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. ऊत्कृष्ठ वार्ता व शोधवार्ता गटातील स्पर्धेसाठी मराठवाड्यातील पत्रकारानी प्रवेशिका पाठवाव्यात असे आवाहन उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष राम मोतीपवळे, कार्याध्यक्ष एल.पी. उगीले, स्पर्धेचे संयोजक प्रा. प्रविण जाहूरे , बालाजी कवठेकर यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कोणताही अनुचित प्रकार नाही; उमरग्यात मतदान शांततेत



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३ डिसेंबर -**
नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी दि.२ डिसेंबर रोजी नगराध्यक्ष पदासाठी एक आणि नगरसेवक पदांसाठी २२ जागांसाठी मतदान प्रक्रिया उमरगा शहरात अत्यंत उत्साहात, शिस्तीत आणि शांततेत पार पडली. सकाळच्या वेळेत मतदान सुरुवातीला मंद गतीने सुरू झाले असले तरी दुपारनंतर शहरातील सर्व मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगाच रांगा लागल्या आणि लोकशाहीचा उत्सव जल्लोषात साजरा झाल्याचे चित्र उमटले.

मतदानकेंद्रांवर महिला, तरुण, प्रथमच मतदान करणारे युवक तसेच वरिष्ठ नागरिकांचा उल्लेखनीय सहभाग दिसून आला. अनेक ज्येष्ठांनी तब्येतीची तमा न बाळगता मतदान केंद्रांवर उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावला, तर तरुणांनी मतदानाला उत्साही प्रतिसाद देत लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवला. काही केंद्रांवर तर मतदानासाठी रांग तासाभरापेक्षा जास्त लांब झाल्याचेही दिसून आले.

प्रशासनाच्या वतीने कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती. पोलिसांचा वाढीव बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख, नियंत्रण कक्षाच्या सततच्या समन्वयामुळे संपूर्ण शहरात मतदान प्रक्रिया अत्यंत सुरळीत पार पडली. दिवसभरात कोणताही गोंधळ, वाद किंवा अनुचित प्रकार न घडल्याने निवडणूक पूर्णपणे शांततापूर्ण पार पडली. मतदान केंद्रांवर भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिंदेसेना, काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आदी प्रमुख पक्षांचे प्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठी वर्दळ होती. प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी मतदारांना केंद्रांवर येताना उत्साहाने स्वागत करताना दिसले. तरीही सर्वांनी निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करत शांततेचे वातावरण राखले.

**एकूण मतदानाचे स्वरुप ...**

| | |
|---|---|
| पुरुष मतदार | : ११,०३५ |
| महिला मतदार | : १०,२०० |
| इतर | : ४ |
| एकूण मतदार | : २१,२३९ |

**एकूण मतदानाची टक्केवारी : ६६.८१ टक्के**

उमरगा शहरातील या निवडणुकीची प्रक्रिया सुरळीत पार पडल्याने नागरिक समाधान व्यक्त करताना दिसले. आता सर्वांचे लक्ष २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीवर केंद्रीत झाले आहे. या तिरंगी लढतीत कोण बाजी मारणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## हॉटेलसमोर मारहाण; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
येडशी येथे हॉटेलसमोर झालेल्या मारहाणीप्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अशितोष बाळू शिंदे, अजय शिंदे, बंटी उर्फ शिरीष शिंदे, बाळू शिंदे (सर्व रा. येडशी, ता. धाराशिव) यांच्याविरुद्ध फिर्यादी सूरज चाँद पटेल (वय ४०, रा. येडशी) यांनी तक्रार दिली आहे.

२९ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ८.१५ वाजता जनता विद्यालयासमोर असलेल्या कोल्डिंग हॉटेलमध्ये फिर्यादीच्या मुलास आरोपींनी मारहाण केली. ही बाब विचारली असता आरोपींनी फिर्यादीवर तसेच मुलावर शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी व दगडाने हल्ला करून गंभीर जखमी केले. दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी आलेले राजू चाँद पाशा शेख यांनाही आरोपींनी शिवीगाळ करून मारहाण केली तसेच त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

फिर्यादी सूरज पटेल यांनी २ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## नगराध्यक्ष व नगरसेवकांचे भवितव्य मतपेटीत बंद; २१ डिसेंबरला मतमोजणी




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३ डिसेंबर -**
कळंब नगरपरिषद निवडणुकीत एक नगराध्यक्षपद आणि २० नगरसेवक पदांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले असून, मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार आहे.

मतदानानंतर उमेदवारांचा जीव टांगणीला लागला असून, प्रशासन मात्र मतपेट्यांवर डोळ्यात तेल घालून पहारा देत आहे.

२ डिसेंबर रोजी पार पडलेली निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे नियोजनबद्ध पद्धतीने झाली. नगरपरिषदेच्या १० प्रभागांतील २० जागांसाठी २४ मतदान केंद्रांवर मतदान घेण्यात आले. २०,९५८ मतदारांपैकी तब्बल १५,२३४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

यामध्ये ७,२३१ महिला आणि ८,००३ पुरुष मतदारांचा समावेश आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार हेमंत ढोकले, सहायक अधिकारी तथा मुख्याधिकारी मंजूषा गुरमे, अतिरिक्त सहायक निवडणूक अधिकारी गोकुळ भराडिया आणि निवडणूक विभागप्रमुख अजय काकडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडली.

नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवार, तर नगरसेवक पदासाठी ६७ उमेदवार रिंगणात होते. प्रत्येक प्रभागातून दोन नगरसेवक निवडून देण्यात येणार आहेत.

## अवैध मद्यासह एक जण ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
कळंब पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध दारू विक्री विरोधातील कारवाईत एका व्यक्तीकडून देशी-विदेशी दारूच्या सिलबंद बाटल्यांचा साठा जप्त केला आहे.

आरोपी करण कल्याण ताटे (वय २७, रा. साठेनगर) हा दि. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी अंदाजे ७.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते सराफा लाईन या मार्गालगत अवैध विक्रीच्या उद्देशाने दारू जवळ बाळगून असल्याची माहितीवरुन कारवाई करण्यात आली. पोलीसांनी आरोपीकडून अंदाजे ४,९२० रुपये किंमतीच्या २१ देशी-विदेशी दारूच्या सीलबंद बाटल्या जप्त केल्या आहेत.

## नॅचरल शुगरची पहिली ३ हजार रूपये उचल ऊस पुरवठादारांचे खात्यावर जमा; नॅचरल शुगरचा २४ वा गळीत हंगाम उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२ डिसेंबर -**
नॅचरल शुगर अ‍ॅण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि., रांजणीचा २४ वा गळीत हंगाम २ नोव्हेंबर रोजी उत्साहात सुरू झाला आहे. कारखान्यात दररोज सरासरी ७,७०० मेट्रिक टन प्रमाणे गाळप सुरू असून आजपर्यंत एकूण २,०१,६४० मेट्रिक टन ऊसाचे गाळप पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत नॅचरल शुगर गाळपाच्या बाबतीत मराठवाड्यात अग्रस्थानी असून हा लौकिक कायम राखण्यासाठी कारखाना कटिबद्ध आहे.

कारखान्याने चालू हंगामात १३.२५ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित केले असून त्यानुसार ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणा सक्षमपणे उभारण्यात आली आहे. आतापर्यंतचे गाळप समाधानकारक असून उद्दिष्टपूर्तीकडे कारखान्याची वाटचाल वेगाने सुरू आहे.



नॅचरल शुगरने ऊस उत्पादकांना चालू हंगामात ३ हजार रूपये प्रति मेट्रिक टन इतकी पहिली उचल जाहीर केली आहे.

ही रक्कम एनसाई मल्टीस्टेट व श्री साई पतसंस्था यांच्या खात्यावर संबंधित ऊस उत्पादकांच्या नावे जमा करण्यात आली आहे. १ ते १५ नोव्हेंबर या पंधरवड्यात ज्यांचा ऊस गाळपासाठी आलेला आहे, त्यांनी आपली ऊस बिले संबंधित बँक खात्यातून उचलून घ्यावीत, असे आवाहन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांनी केले.

कारखान्याकडे प्रतिदिवस ८,००० मेट्रिक टन ऊसाचा पुरवठा होत असून आवश्यक तोडणी व वाहतूक यंत्रणेची तयारी पूर्वीच पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यामुळे अधिकाधिक ऊस उत्पादकांनी ऊसाचा पुरवठा करावा, ज्यामुळे गाळप पूर्ण क्षमतेने होऊन ऊसाला अधिक दर देणे शक्य होईल, असे ठोंबरे यांनी सांगितले.

नॅचरल शुगरच्या विविध उपक्रमातून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या आधारे ऊसाला जास्तीत जास्त दर देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

चालू गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व ऊस उत्पादकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## शहापूर गटात शिवसेनेला धक्का; अनेकांचा भाजपमध्ये प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.३ डिसेंबर -**
उबाठा येवती गट प्रमुख बाळासाहेब वाघमारे यांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. वाघमारे हे इटकळचे रहिवासी असून त्यांच्या प्रवेशामुळे शहापूर गटात शिवसेनेला मोठा धक्का बसल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

वाघमारे यांनी सामाजिक कार्यातून तरुणांचे भक्कम संघटन उभे केले असून यापूर्वी त्यांनी पंचायत समिती येवती आणि जिल्हा परिषद शहापूर गटातून निवडणूक लढवली होती.

अत्यंत निसटता पराभव झाल्यानंतरही त्यांनी सामाजिक कार्य थांबवले नाही, उलट नव्या उमेदाने जनसंपर्क वाढवून शहापूर गटात आपली मजबूत पकड निर्माण केली.

आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या कार्यशैलीवर विश्वास ठेऊन वाघमारे यांनी कार्यकर्त्यांच्या मोठ्या फौजेसह भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपचे पारडे जड झाल्याचे राजकीय वर्तुळातील मत आहे.

वाघमारे यांच्यासोबत निलेगावचे माजी सरपंच नुरखा सौदागर, महेबुब शेख, अली अब्बास शेखदार, विठ्ठल घंटे, इस्माईल कुरणे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

कार्यक्रमाला कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती आशिष सोनटक्के, युवक भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रतीक रोचकरी, भाजप गटप्रमुख मल्लिनाथ गावडे, जिल्हा सरचिटणीस अरविंद पाटील, तालुका सरचिटणीस पद्माकर जेवळे, उपसरपंच फिरोज मुजावर, हुसेन मकानदार आदींची उपस्थिती होती.

## रस्त्याच्या वादातून मारहाण; एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
खामसवाडी येथे रस्त्याच्या वादातून झालेल्या मारहाणीप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दिगंबर कुंडलिक गर्जे (रा. खामसवाडी, ता. कळंब) असे आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी साधारण ११ वाजता छत्रपती संभाजीराजे चौकाजवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पतसंस्था समोर फिर्यादी मनोज रावसाहेब गर्जे (वय ५५, रा. खामसवाडी) यांच्यासोबत आरोपीचा रस्त्याच्या कारणावरून वाद झाला. या दरम्यान आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण करून जखमी केले तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

फिर्यादी मनोज गर्जे यांनी २ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या तक्रारीवरून शिराढोण पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## ‘जयप्रकाश’मध्ये समाजवादी विचारांचे ज्येष्ठ नेते पन्नालाल सुराणा यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
समाजवादी विचारांचे ज्येष्ठ नेते पन्नालाल सुराणा यांच्या निधनाने समाजवादी चळवळीचा एक भक्कम आधारस्तंभ हरपल्याची भावना डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे यांनी व्यक्त केली. जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमात ते बोलत होते.




सुभाषदादा कोळगे म्हणाले, पन्नालाल सुराणा यांच्यासोबत स्वातंत्र्यसेनानी कै. विश्वनाथ आबा कोळगे व कै. दादाराव भाऊ कोळगे यांनी समाजवादी विचारांची वाटचाल खांद्याला खांदा लावून पुढे नेली. १९७९ साली रुईभर येथे डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेच्या स्थापनेतही त्यांचे अनन्यसाधारण योगदान राहिले. शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची संधी मला सुराणा व बापूसाहेब काळदाते यांनी दिली. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे.

ते पुढे म्हणाले की, पन्नालाल सुराणा हे परंडा तालुक्यातील आसू गावचे रहिवासी होते. शालेय जीवनातच ते राष्ट्रसेवा दलात सहभागी झाले. बिहारमधील सर्वोदय आश्रमात जयप्रकाश नारायण यांच्या सहवासात राहून भूदान चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. राजकीय, आर्थिक आणि वैज्ञानिक विषयांवरील तब्बल ४० पुस्तके त्यांनी लिहिली. १९९३ च्या भूकंपग्रस्तांना दिलेली मदत व आयुष्यभर केलेले सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे. कार्यक्रमात उपस्थितांनी पन्नालाल सुराणा यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली.

याप्रसंगी रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पन्नालाल सुराणा; अनाथांचा नाथ गेला

राष्ट्रसेवादलाचे माजी अध्यक्ष, समाजवादी नेते, आपलं घर प्रकल्प आधारवड, असंख्य कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान पन्नालाल भाऊ सुराणा यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी देहावसान झाले. त्यांच्या पश्चात मुलगा प्रभास, आणि कन्या आरती असा परिवार असून त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांचे पार्थिव सोलापूर सिव्हिल मेडिकल कॉलेजला देहदान करण्यात आले. हजारो अनाथांचे तारणहार पन्नालालजी सुराणा हे मूळचे बार्शीचे शाळेत असतानाच ते राष्ट्रसेवा दलात दाखल झाले. पुढे तरुणपणी त्यांनी जयप्रकाश नारायण यांच्या बिहारमधील सोखादेवरा येथील सर्वोदय आश्रमात राहून भूदान चळवळीत भाग घेतला. समाज प्रबोधन संस्थेचे सचिव, समाजवादी पक्षाच्या राज्य शाखेचे सचिव म्हणून ही त्यांनी काम पाहिले. महाविद्यालयीन शिक्षण झाल्यानंतर त्यांनी पत्रकारिता केली, मराठवाडा दैनिकाचे ते संपादक होते साथी सुराणा यांचा व्यासंग दांडगा होता शिक्षण, शेती, बेरोजगारी या विषयावर त्यांनी विपुल लिखाण केले आहे, ते गेल्याची बातमी धक्कादायक होती. जगण्याला हलकी, ऊबदार फुंकर घालून प्रत्येकाला सोन्यासारखे घडवण्याची किमया ज्यांच्या स्वभावात होती, असे अवलिया व्यक्तिमत्त्व म्हणजे पन्नालालजी सुराणा.



त्यांनी राजकीय, आर्थिक, वैज्ञानिक, अशा विविध विषयावर ४० पुस्तके लिहिली आहेत, दुष्काळ निवारण,निर्मूलन, शेतकरी, शेतमजूर यांच्या हक्कासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली. आणीबाणीच्या काळात ते भूमिगत होते. त्यानंतर त्यांना अटक झाली होती. भूमी मुक्ती आंदोलनात त्यांना ४ वेळा त्यांना तुरुंगवास झाला होता. लातूर किल्लारी भागात झालेल्या भूकंपात निराधार झालेल्या मुलासाठी त्यांनी नळदुर्ग येथे आपलं घर ही निवासी शाळा सुरू केली. पर्यावरण आणि जलसंधारण क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. काही दिवस पत्नी डॉ. वीणाताई यांच्या समवेत त्यांचे बिहारमध्ये वास्तव्य होते. त्यानंतर समाजवादी पक्षात त्यांनी काम केले. जनता पक्षाचे ते प्रदेश सचिव होते. बार्शी येथील विधानसभा व सोलापूर लोकसभा मतदारसंघात त्यांनी निवडणूक लढवली होती. सन २०१५ साली त्यांनी नळदुर्ग शहरातील बहुतांश कुटुंबीयांची घरे नगर परिषद प्रशासनाने पाडली होती. त्या विरुद्ध त्यांनी वयाच्या ८३ व्या वर्षी आंदोलन करून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून दिला होता.

त्यांच्या आयुष्याचे अनेक पैलू आहेत त्यातील प्रमुख म्हणजे पत्रकारिता, आंदोलन, राजकारण, देशभक्तीचे उपक्रम सगळंच अद्वितीय. त्यांची माणुसकी, समर्पण आणि संवेदनशीलता फार महान होती. नळदुर्ग येथील ‘आपलं घर’ भूकंपग्रस्त अनाथ मुलांसाठी उभारलेले निवासगृह व शाळा आजही निराधारांचा मोठा आधार आहे. आपलं घर येथील भाजी पाल्याची शेती अफलातून आहे. आपणच पिकवलेला भाजीपाला आपल्याच हॉटेल ला वापरायचा म्हणजे स्वावलंबन हा मोठा मंत्र ते विद्यार्थ्याला देत असतं. ८०-९० वर्षांच्या वयातही त्यांची कामाविषयीची तळमळ, समाजाबद्दलची ओल आणि जगण्याचा उत्साह, तरुणांना लाजवेल असाच होता.

अशी माणसं जिवंत राहणं समाजातील वंचित घटकांसाठी, गरजूंसाठी, असंघटित समाजघटकांसाठी अत्यंत आवश्यक असते. पण नियतीपुढे कोणाच काही चालत नाही. आज ते आपल्यातून निघून गेले आज हजारो निराधारांचा आधार गेला.

आज त्यांचं जाणं म्हणजे अनाथांचा नाथ गेला.भावपूर्ण श्रद्धांजली.

**श्रीकांत अणदूरकर,** अणदूर

## दिव्यांग व वयोवृद्ध लाभार्थ्यांसाठी आज विशेष आधार अपडेशन शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३ डिसेंबर -**
सामाजिक न्याय विभागाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ योजना आणि इंदिरा गांधी योजनेअंतर्गत मिळणारे मासिक अनुदान महाडीबीटी प्रणालीद्वारे थेट लाभार्थ्यांच्या आधार-सिडेड बँक खात्यात जमा केले जाते.

मात्र, बऱ्याच लाभार्थ्यांचे आधार कार्ड अपडेट नसल्यामुळे किंवा बँक खात्याशी आधार लिंक नसल्याने त्यांना अनुदान मिळण्यात अडचणी येत आहेत.

विशेषतः दिव्यांग व वयोवृद्ध लाभार्थ्यांचे बोटांचे ठसे व रेटिना स्कॅन न वाचल्याने त्यांचे आधार अपडेट न होता अनुदान प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत.

त्यामुळे अनेक लाभार्थी अनुदानापासून वंचित राहिले असून, या संदर्भात कार्यालयात वारंवार विचारणा केली जात आहे.



या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या मार्गदर्शनानुसार ४ व ५ डिसेंबर रोजी सकाळी १० ते सायं. ६ या वेळेत तहसील कार्यालय लोहारा येथे विशेष आधार अपडेशन शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

लोहारा तालुक्यातील सर्व गावांमधील संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना अंतर्गत पात्र परंतु आधार अपडेट न झाल्यामुळे अनुदानापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांनी या शिबिरात उपस्थित राहण्याचे आवाहन तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांनी केले आहे.

**शिबिरासाठी आवश्यक कागदपत्रे**
दिव्यांग प्रमाणपत्र (ऑनलाईन), निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड, लाईट बिल/रहिवासी दाखला.

**जाहीर प्रगटन**
**घरजागा वाटणीपत्र**
**नामांतर ८ अ नाव नोंदणी**

जा.क्रमांकः **१९८१**
**नगर पंचायत कार्यालय, लोहारा बु.,** जि.धाराशिव
जा.क्र./ नपलो / नामांतर /
दि.०३/११/२०२५

**श्री शिवकुमार बाबुराव उर्फ गुरुलिंग स्वामी** यांनी या कार्यालयात दि.०६/११/२०२५ रोजी सर्व्हे नं./मिळकत नं. ९२८ (२३) चे खरेदी खत/कोर्ट डिग्री/वारसा आधारे नावं नोंद/नावं बदलनेसाठी नामांतर विभागात अर्ज दाखल केलेला आहे, व त्यानी ८ अ चा उतारा नक्कल मिळणे बाबत कळविले आहे. वरील घराची चतुरसीमा व लांबी खालील प्रमाणे.

**-जागेची चर्तु:सीमा-**

**पुर्वस** : २० फूट रस्ता
**दक्षिणेस** : प्लॉट नं. २२
**पश्चिमेस** : दिलीप शिंदे
**उत्तरेस** : प्लॉट नं. २४

वरील चतुरसीमा आणि जागेची नाव नोंदणी/करिता आहे. तरी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की ज्या कोणास सदरहू नामांतराबाबत नाव नोंदणी हस्तांतरण बाबत तक्रार असेल तर सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात आलेल्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत तक्रार दाखल करण्यात यावी, अन्यथा तक्रार नाही असे गृहीत धरून नामांतर करून दिले जाईल व नाव नोंदणी केली जाईल. पुन्हा कोणाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत, लोहारा**

**॥ विकासासाठी कटिबध्द ॥**
**नगर पंचायत कार्यालय, लोहारा बु.**
**ता. लोहारा, जि. धाराशिव**
दुरध्वनी क्र. ०२४७५-२६६०५१. टोल फ्री- १८००२३३८२०१ इमेल : loharanp@gmail.com

जा.क्र. ७५२/नपलो/२०२५-२६. दिनांक २१/११/२०२५

Suo Moto Writ Petition (Civil) No (s) 5 of 2025 च्या
अनुषंगाने प्राणी जन्मनियंत्रण (Animal Birth Control)

नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम २०२३ सासन निर्णय क्र. प्राजनी २०२५/प्र.क्र.१३/नवी२०-२०, दि.२०.३.२०२५ या शासन निर्णायान्वे कमिशन फार प्रोटेक्शन आफ चाईल्ड राईट्स (CPCR) कायदा २०२५ च्या कलम १३ मधील शिफारशी व प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम २०२३ ची अंमलबजावणी करण्यासाठी लोहारा नगरपंचायत क्षेत्रात प्राणी जन्म नियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. संबंधित शहरातील रेबीज प्रादुर्भाव घटना रोखण्यासाठी Dog pounds, Veterinarians, Dog Catching Personal, लसीकरण व नसबंदी व तातडीची मदत पोहचवण्यासाठी लोहारा नगरपंचायत क्षेत्रामध्ये मुख्याधिकारी यांच्या देखरेखीखाली प्राणी जन्म नियंत्रण समिती - Animal Birth Control Unit (ABC) स्थापन करण्यात आली आहे.

यानुसार लोहारा नगरपंचायत क्षेत्राकरिता मुख्याधिकारी समितीचे प्रमुख असतील व प्राणी जन्म नियंत्रण समिती इत्यादीची आपत्कालीन परिस्थितीची माहिती अथवा तक्रारीबाबत प्राणी जन्म नियंत्रण समिती दलास संपर्क करणे करिता १८००२३३८२०१ हा क्रमांक नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. करिता खालीलप्रमाणे प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) समिती स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | हुद्दा | पद |
|---|---|---|---|
| १) | श्री. रामकृष्ण जाधवर | मुख्याधिकारी | अध्यक्ष |
| २) | श्री. प्रदीप मोटे | कार्यालयीन अधीक्षक | सदस्य |
| ३) | श्री. सुमित पाटील | नगर अभियंता | सदस्य |
| ४) | श्री. शेखर कुलकर्णी | लिपीक | सदस्य |

नगर पंचायत कार्यालय लोहारा बु. स्थापना 2015 जि.धाराशिव

**स्वाक्षरित /-**
**मुख्याधिकारी,**
**नगर पंचायत, लोहारा बु.**

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तेर बसस्थानकात महिलेच्या पर्समधून दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत महिलेच्या पर्समधील सोन्याचे दागिने चोरी झाल्याची घटना तेर बसस्थानकात घडली. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



फिर्यादी सुक्षला विश्वास चव्हाण (वय ३८, रा. किणी, जि. धाराशिव) या २ डिसेंबर रोजी तेर-धाराशिव बसमध्ये चढत होत्या. त्या वेळी त्यांच्या पर्समधील साडे तीन ग्रॅम वजनाचे, किंमत सुमारे १५ हजार रूपये असलेले सोन्याचे दागिने अज्ञात व्यक्तीने चोरून नेले, असे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादी चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवला.

## संक्षिप्त वृत्त...



### चेअरमन नानासाहेब पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
चेअरमन पाटील यांच्या संकल्पनेतून वाढदिवसाच्या निमित्ताने कर्मचार्यांना थंडीपासून सुरक्षेसाठी ट्रायसूट, ऊस वाहतूक वाहनांना रिफ्लेक्टर, कपडा तसेच सुशोभिकरणासाठी कारखान्याच्या विविध विभागास वृक्षाच्या कुंड्या वाटप करण्यात आल्या. याप्रसंगी मुख्य शेतकी अधिकारी जयवंत रोहिले, चिफ इंजिनिअर ओंकार मोकाशी, चिफ केमिस्ट उमेश बिक्कड, सिव्हिल इंजिनिअर विश्वास पाटील, फोरमन विजय वाघे, प्रवीण पाटील, बॉयलर विभाग अजय गाडे, सुधाकर खोत, सुरक्षा अधिकारी मेजर चंद्रकांत पवार, परचेस अधिकारी रवि जोगदंड, सेल्स ऑफिसर सागर शिंदे, दत्तात्रय टेकाळे, गोडाऊन किपर सुरेंद्र गिरी, राजाभाऊ केवळराम, अक्षय माने, प्रज्योत माने, बालाजी गुळवे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी उपस्थित होते.



### चैतन्य मूकबधिर शाळेत जागतिक दिव्यांग दिन साजरा

**अणदूर, दि.३ डिसेंबर -**
येथून जवळच असलेल्या चैतन्य मूकबधिर निवासी विद्यालय नळदुर्ग (फुलवाडी) ता. तुळजापूर जि. धाराशिव या शाळेत ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. डॉ. हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन शिवाजी कांबळे आयडीयल पत्रकार संघ प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक जाधव यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. यावेळी शिवाजी कांबळे यांनी दिव्यांग दिनाचे महत्व, दिव्यांगाचे कायदे, सेवा, सुविधा ई बाबतीत जनजागृती करून त्यांना सन्मानाने इतर माणसाबरोबर वागणूक देणे गरजेचे आहे. प्रथम दिव्यांग नसून ते व्यक्ती आहेत म्हणून पाहणे गरजेचे आहे असे सांगून आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी दिव्यांग विध्यार्थ्यांचा सत्कार व खाऊ वाटप करण्यात आले. त्यानंतर शाळेतील मुलां मुलींच्या रांगोळी, चित्रकला, धावणे, संगीत खुर्ची व संस्कृतीक कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.



### दोन दिव्यांग शिक्षकांसह तीन दिव्यांग विध्यार्थ्यांचा यथोचित सत्कार संपन्न

**मंगरूळ, दि.३ डिसेंबर -**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंगरूळ ता.तुळजापूर येथे जागतिक दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात बुधवार ३डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील तीन दिव्यांग विद्यार्थ्यांना वही, पेन, शैक्षणिक साहित्य व पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला तसेच शाळेतील सहशिक्षिका वडूळे व जिल्हा परिषद प्रशाला मंगरूळ येथील सहशिक्षक इनामदार या दोन दिव्यांग शिक्षकांचाही शाळेच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पहार व पुष्पुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार संतोष ढोणे यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश सुर्वे यांनी केले. कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक उमेश सुर्वे, शाळेतील सहशिक्षिका सुषमा कांबळे, ज्योती नवले, युवा प्रशिक्षणार्थी माधुरी डोलारे सहशिक्षक संतोष ढोणे यांनी परिश्रम घेतले. यावेळी पालक माता व ग्रामस्थ उपस्थित होते.



### 'पोद्दार'मध्ये जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम

**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक एड्स दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी १ डिसेंबर रोजी साजरा होणारा हा दिवस १९८८ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने एचआयव्ही एड्सबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी सुरू केला. कार्यक्रमात डॉ. वाल्मिक सोमासे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत एड्सविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला उपप्राचार्य निलेश जाधव, व्यवस्थापकीय अधिकारी जीवन कुलकर्णी, वरिष्ठ समन्वयक प्रभाकर चौधरी, तसेच स्कूलमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव जिल्ह्यात नगरपालिका निवडणुकीत ६८.९७ टक्के मतदान

**जिल्ह्यातील नगरपालिका नळदुर्ग ७३.१७, उमरगा ६६.८१, मुरुम ६७.४१, कळंब ७२.६९, भूम ७९.२१, परंडा ७८.१३ सरासरी मतदान...**

**सर्वाधिक जास्त तुळजापूर ८०.२८ टक्के**
**सर्वात कमी धाराशिव ६१.१४ टक्के**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
जिल्ह्यातील सर्व आठही नगरपालिका निवडणुकांसाठी झालेल्या मतदानाला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पार पडलेल्या मतदानात जिल्ह्याची एकूण सरासरी मतदान टक्केवारी ६८.९७ इतकी नोंदवण्यात आली.

जिल्ह्यातील तुळजापूर नगरपालिकेने तब्बल ८०.२८ टक्के मतदान नोंदवत सर्वाधिक मतदानाचा मान पटकावला. त्यानंतर भूम नगरपालिकेने ७९.२१ टक्के, तर परंडा नगरपालिकेने ७८.१३ टक्के मतदान नोंदवले. कळंब (७२.६९ टक्के), नळदुर्ग (७३.१७ टक्के), मुरूम (६७.४१टक्के) व उमरगा (६६.८१टक्के) या नगरपालिकांमध्येही समाधानकारक मतदान झाले. दरम्यान धाराशिव नगरपालिकेत सर्वात कमी ६१.१४ टक्के मतदान झाल्याचे प्रशासनाने सांगितले. धाराशिव नगरपालिकेसाठी झालेल्या निवडणुकीत एकूण ५७,४७६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. नगरपालिका हद्दीतील पुरुष, महिला आणि इतर मतदारांनी मतदानात उत्साहाने भाग घेतल्याचे प्रशासनाने सांगितले. धाराशिव नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासह नगरसेवकांच्या ३८ जागेसाठी मतदान पार पडले. नगराध्यक्ष पदासाठी सहा तर नगरसेवक पदासाठी ४१ जागांसाठी तब्बल दोनशे एक उमेदवार निवडणूक रिंगणात होते. त्यापैकी तीन जागेवर निवडणूक २० डिसेंबर रोजी होणार आहे. धाराशिव शहरातील वीज प्रभागातील १०८ मतदान केंद्रावर मिळून ९४ हजार सहा मतदार होते. प्रशासनाच्या माहितीनुसार, पुरुष मतदार ३०,३६५, महिला मतदार २७,१०७ इतर प्रवर्ग ०६ असे मिळून एकूण ५७,४७६ मतदारांनी मतदान केंद्रांवर हजेरी लावली. शहरात दुपारनंतर मोठ्या प्रमाणात मतदार बाहेर पडले दुपारी दीड वाजेपर्यंत ३१.४० टक्के इतके मतदान झाले होते. त्यानंतर सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत ६१.१४ टक्के अखेर मतदान झाले. सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत झालेल्या मतदानात सुरुवातीला मंद गती दिसून आली. मात्र दुपारनंतर मतदारांनी केंद्रांकडे मोठ्या प्रमाणावर गर्दी करत मतदानाचा टक्का वाढवला. अपंग, ज्येष्ठ नागरिक तसेच प्रथमच मतदान करणाऱ्या युवकांचाही उत्साही सहभाग नोंदवला गेला. धाराशिवमध्ये एकूण मतदान अपेक्षेपेक्षा कमी राहिले असले तरी मतदारांनी शांततेत मतदानाची प्रक्रिया पूर्ण केली.

धाराशिव शहरात नगरपालिका प्रचारामध्ये रखडलेल्या रस्त्यांचा मुद्दा अत्यंत प्रभावी ठरला. यामध्ये सर्वच गटांकडून एकमेकावर चिखल फेक करत खराब रस्त्याचे खापर फोडले जात होते. विकासाच्या मुद्द्यावर प्रचार सुरू असतानाच काही नेत्यांनी वैयक्तिक आरोप केले. खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी धाराशिव नगरपालिका निवडणुकी प्रचारामध्ये एकमेकावर आरोप प्रत्यारोप करत निवडणूकीचे वातावरण गरम केले होते. धाराशिवचा नगराध्यक्ष कोण होणार मतयंत्रात सीलबंद झाले असून २१ डिसेंबर रोजी मतमोजणीमध्ये शहराचा नवा कारभारी कोण असेल याची उत्सुकता मात्र सर्वांनाचं लागून राहिली आहे.

**अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना धाराशिव जिल्ह्यात १२७८ कोटींचा दिलासा...**

## अनुदान थेट खात्यात : आ. राणाजगजितसिंह पाटील

**पीक विम्याचा मार्ग मोकळा होणार ...**
खरीप २०२५ च्या पीकविम्यासंदर्भात पिक कापणी प्रयोगावर आधारित आक्षेपांच्या सुनावण्या सुरू आहेत. सुनावणी पूर्ण होताच विम्याचे वितरण अडथळामुक्त होईल, अशी अपेक्षा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांना योग्य लाभ मिळावा यासाठी स्वतः प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टी व महापुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर महायुती सरकारने जाहीर केलेल्या अनुदानापोटी १२७८ कोटींचे थेट लाभ दिवाळीपासून आतापर्यंत जमा झाले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. कठीण काळात मोठ्या संवेदनशीलतेने मदत देणाऱ्या सरकारचे त्यांनी शेतकरी बांधवांच्या वतीने आभार मानले.



जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये सततचा पाऊस, महापूर आणि त्यामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले. पिकांच्या हानीनंतर मिळणाऱ्या पीकविम्याबाबत विमा कंपन्यांनी पिक कापणी प्रयोगातील काही तांत्रिक बाबींवर आक्षेप घेतले होते. या आक्षेपांवर जिल्हाधिकारी स्तरावर सुनावणी सुरू असून पीक विम्याचे वितरणही लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर सुरू होईल, असा विश्वास आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

सरकारने जाहीर केलेल्या अनुदान वितरण प्रक्रियेला युद्धपातळीवर गती मिळाली आहे. जिल्ह्यातील ९,७६,८२५ लाभार्थी खात्यांवर १२७८.६८९७ कोटींची रक्कम जमा झाली असून उर्वरित शेतकऱ्यांनाही वेळेत मदत देण्यासाठी प्रशासन कार्यरत आहे. या अनुदानात पिकांचे नुकसान, शेतजमिनीची हानी, रब्बी पेरणीसाठी मदत तसेच अतिवृष्टीशी संबंधित विविध नुकसानींचा समावेश आहे. शासनाच्या नव्या निकषांनुसार ३ हेक्टरपर्यंतच्या शेतीला नुकसानभरपाईसाठी प्राधान्य देण्यात येत आहे.

अनुदान थेट खात्यावर प्राप्त होण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य आहे. ती अद्याप बाकी असलेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ पूर्ण करावी, असे आवाहन आमदार पाटील यांनी केले. सामाईक क्षेत्रधारक शेतकऱ्यांनी हक्काच्या व्यक्तीच्या नावाने संमतीपत्र संबंधित तलाठी कार्यालयात सादर करणे आवश्यक असून कागदपत्रांची पूर्तता झालेल्या खात्यांवर अनुदानाला प्राधान्य दिले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी मिळाला असून या आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना पुन्हा उभारी मिळेल, असे पाटील म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या संवेदनशील निर्णयांमुळे शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा मिळाला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## येणेगुर : शेतातील शेडमधून दुचाकी चोरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ डिसेंबर -**
येणेगुर शिवारातील शेतातील शेडमधून हिरो कंपनीची एचएफ डिलक्स ही दुचाकी चोरीला गेल्याची घटना घडली असून तुळजापूर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



फर्यादी उमेश गणपती राठोड (वय २४, रा. बोरनदीवाडी, ता. तुळजापूर) यांची दुचाकी (क्र. एमएच २५ व्ही ०१४८) शेत गट नं. ३४० मधील पत्र्याच्या शेडमधून चोरली गेली. ही चोरी २९ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता ते २ डिसेंबर रोजी १४ ते १७.३० या वेळेत घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. शेडचा पत्रा उचकटून अज्ञात आरोपीने दुचाकी चोरून नेल्याचे सांगितले. फिर्यादी उमेश राठोड यांनी २ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**लवाद व्यायाधिकरण**
(लवाद- ॲड. अजित एम. देशमुख, एम. ए. मराठी, एम.ए (एम.सी. जे). एम. कॉम. एल.एल.बी)
एकल लवाद न्यायालय,
लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर
प्लॉट नं. ९४/६६, मित्रनगर, रब्बी रिसर्च सेंटरचे मागे, शेळगी, सोलापूर -४१३००६

**जाहिर प्रकटन जिल्हा - धाराशिव**

या जाहिर नोटीसीने खाली दिलेल्या सामनेवाले यांना कळविण्यात येते की, दावेदार **लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर** या संस्थेने खाली नमुद कर्जदार, जामीनदारांविरुध्द थकीत कर्जाची रक्कम वसुली अवॉर्ड मिळणेकामी लवाद न्यायालयाकडे दावे दाखल केले असून, कर्जदार जामीनदार यांनी दिलेल्या अधिकृत, नोंद पत्यावर लवाद न्यायालयाकडून पाठविलेल्या (आर.पी.ए.डी. ने) लवाद दाव्याचे नोटीसा रजिस्टर पोस्ट न बजावता परत आले आहे.

न्यायाच्या दृष्टीने संबंधित कर्जदार व जामिनदारांना योग्य संधी देऊन न्याय निवाडा करणेकामी हि जाहिर नोटिस प्रसिध्दीस दिली आहे. खालील नमूद सामनेवाले यांनी पुढील निर्देशित तारखेपूर्वी दि. २२/१२/२०२५ रोजी अथवा तारखेस वर नमूद पत्वावर लवाद न्यायालयासमोर उपस्थित राहून लेखी म्हणणे न मांडल्यास एकतफी न्यायनिवडा करण्याचे सुचित करत आहे.

| अ. क्र. | लवाद दावा क्र व दिनांक | नाव | | शाखा | पत्ता | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लवाद दावा क्र. ०२/२०२५ | पाटील महेश गुरुबसप्पा | कर्जदार | अचलेर/मुरुम | मु.पो. पाटील गल्ली, अचलेर ता. लोहारा जि. धाराशिव ४१३६०२ | ३,७८,०९४/- |
| | ०४/०९/२०२५ | मल्लिनाथ काशीनाथ कुंभार | जामिनदार | अचलेर/मुरुम | मु.पो. अचलेर ता. लोहारा जि. धाराशिव - ४१३६०२ | |
| | ०४/०९/२०२५ | शरणप्पा मल्लिकार्जुन पटणे | जामिनदार | अचलेर/मुरुम | मु.पो. अचलेर ता. लोहारा जि. धाराशिव - ४१३६०२ | |
| | ०४/०९/२०२५ | गुरुबसप्पा आप्पासाहेब पाटील | जामिनदार | अचलेर/मुरुम | मु.पो. अचलेर ता. लोहारा जि. धाराशिव - ४१३६०२ | |
| २ | लवाद दावा क्र. ०३/२०२५ | रमेश जगन्नाथ म्हेत्रे | कर्जदार | काकरंबा | रा. मु. पो. करजखेडा, (अ) ता. जि. धाराशिव ४१३६०८ | ६७,००२/- |
| | ०४/०९/२०२५ | जगन्नाथ बाबुराव म्हेत्रे | जामिनदार | काकरंबा | रा. मु. पो. करजखेडा, (अ) ता. जि. धाराशिव ४१३६०८ | |
| | ०४/०९/२०२५ | राजेंद्र किसन काळे | जामिनदार | काकरंबा | रा.मु. पो. मार्डी, ता. लोहारा, जि. धाराशिव ४१३६०८ | |
| ३ | लवाद दावा क्र. ०४/२०२५ | घोलप श्रीराम साहेबराव | कर्जदार | परांडा | रा. मु. पो. आष्टा ता. भूम जि. धाराशिव ४१३५०४ | १,४६,९७१/- |
| | ०४/०९/२०२५ | वाघमोडे शंकर बीरा | जामिनदार | परांडा | रा. मु. पो. कोरफळे ता. बार्शी जि. सोलापूर ४१३४०१ | |
| | ०४/०९/२०२५ | गरड भारत नरसू | जामिनदार | परांडा | रा.मु. पो. कात्राबाद, ता. परांडा जि. धाराशिव ४१३५०२ | |
| ४ | लवाद दावा क्र. ०६/२०२५ | गोरे देवदत्त तुकाराम (मयत) | कर्जदार | माणकेश्वर | मु. पो. आगळगाव, घर नं १९९ बी. २४ व घर नं ८८७, ता. बार्शी जि. सोलापूर - ४१३४०९ | १५,८४,४४५/- |
| | ०४/०९/२०२५ | अ. जानकी देवदत्त गोरे | वारस | माणकेश्वर | मु. पो. आगळगाव, घर नं १९९ बी. २४ व घर नं ८८७, ता. बार्शी जि. सोलापूर - ४१३४०९ | |
| | ०४/०९/२०२५ | ब. कांचन हनुमंत पवार | वारस | माणकेश्वर | मु. पो. आगळगाव, घर नं १९९ बी. २४ व घर नं ८८७, ता. बार्शी जि. सोलापूर - ४१३४०९ | |
| | ०४/०९/२०२५ | क. श्रीकांत देवदत्त गोरे | वारस | माणकेश्वर | मु. पो. आगळगाव, घर नं १९९ बी. २४ व घर नं ८८७, ता. बार्शी जि. सोलापूर - ४१३४०९ | |
| | ०४/०९/२०२५ | ड. रोहिणी रवीकिरण पाटील | वारस | माणकेश्वर | मु. पो. आगळगाव, घर नं १९९ बी. २४ व घर नं ८८७, ता. बार्शी जि. सोलापूर - ४१३४०९ | |
| | ०४/०९/२०२५ | इ. सुप्रिया सुखानंद सावंत | वारस | माणकेश्वर | मु. पो. आगळगाव, घर नं १९९ बी. २४ व घर नं ८८७, ता. बार्शी जि. सोलापूर - ४१३४०९ | |
| | ०४/०९/२०२५ | ई. रणजित देवदत्त गोरे. | वारस | माणकेश्वर | मु. पो. आगळगाव, घर नं १९९ बी. २४ व घर नं ८८७, ता. बार्शी जि. सोलापूर - ४१३४०९ | |
| | ०४/०९/२०२५ | उ. प्रगती देवदत्त गोरे | वारस | माणकेश्वर | मु. पो. आगळगाव, घर नं १९९ बी. २४ व घर नं ८८७, ता. बार्शी जि. सोलापूर - ४१३४०९ | |
| | ०४/०९/२०२५ | गोरे रविंद्र रमेश | जामिनदार | माणकेश्वर | रा. मु. पो. आगळगाव, ता. बार्शी जि. सोलापूर - ४१३४०९ | |
| | ०४/०९/२०२५ | डमरे शरद प्रकाश | जामिनदार | माणकेश्वर | रा. मु. पो. आगळगाव, ता. बार्शी जि. सोलापूर - ४१३४०९ | |

**येणेप्रमाणे जाहिरनोटिस प्रसिध्द केली ता. २५/११/२०२५**

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**ॲड. अजित एम.देशमुख, एम.ए.मराठी एम.ए (एम.सी.जे) एम कॉम.एल.एल.बी.**

## तुळजापूरात मंगल आरती व गीता जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ डिसेंबर -**
कृष्णभावनामृत संघ आणि हरे कृष्ण भक्त मंडळी यांच्या वतीने जिजामाता नगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात मंगल आरती आणि गीता जयंती साजरी करण्यात आली.

पहाटे ५ वाजता मंगल आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर तुलसी आरती, श्री चैतन्य शिक्षा अष्टकम पठण आणि सर्व भक्तांकडून सोळा माळा हरे कृष्ण महामंत्र जप करण्यात आला. गीता जयंती निमित्त सामूहिक श्रीमद् भगवद्गीता पठणही पार पडले. सायंकाळी ६.३० वाजता श्रीमान प्रजापती विष्णुदास यांनी गीतेचे महत्त्व या विषयावर भाष्य केले. प्रवचनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. संकीर्तन आणि उपवास प्रसाद यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### वाहतूक पोलीसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
धाराशिव शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी २ डिसेंबर रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर संयुक्त कारवाई केली.

या विशेष मोहिमेत एकूण ८८ प्रकरणांवर कारवाई करण्यात आली असून ६४ हजार २५० रूपये इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

## ज्येष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ डिसेंबर -**
राष्ट्रसेवादलाचे माजी अध्यक्ष, जेष्ठ समाजवादी विचारवंत, नळदुर्ग येथील आपलं घर प्रकल्पाचे आधारवड, असंख्य कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान पन्नालाल भाऊ सुराणा यांचे २ डिसेंबर मंगळवार रात्री निधन झाले आहे.



ज्येष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल भाऊ सुराणा यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांचे मंगळवारी रात्री साडे आठ वाजता धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग येथील 'आपलं घर' प्रकल्पात निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा प्रभास आणि कन्या आरती असा परिवार आहे. पन्नालाल सुराणा यांचे आपलं घर येथे निधन झाल्यानंतर मंगळवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास त्यांचा पार्थिव देह सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयास देहदानासाठी नेण्यात आला. बुधवारी सर्व प्रक्रिया पूर्ण करून त्यांचे देहदान होणार आहे.

पन्नालाल सुराणा हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील बार्शीचे. शाळेत असताना ते राष्ट्रसेवादलात दाखल झाले. पुढे तरुणपणी त्यांनी जयप्रकाश नारायण यांच्या बिहारमधील सोखादेवरा येथील सर्वोदय आश्रमात राहून भूदान चळवळीत भाग घेतला. समाज प्रबोधन संस्थेचे सचिव म्हणून व समाजवादी पक्षाच्या राज्य शाखेचे सचिव म्हणूनही त्यांनी काम बघितले.

महाविद्यालयीन शिक्षण झाल्यानंतर त्यांनी पत्रकारिता केली. मराठवाडा दैनिकाचे ते संपादक होते. लातूर भूकंपात निराधार झालेल्या मुलांसाठी त्यांनी नळदुर्ग येथे' आपलं घर' ही शाळा सुरू केली. धाराशिव जिल्ह्यात काही ठिकाणी आणि किल्लारी येथे मोठा भूकंप झाला यामध्ये दहा हजाराच्या वर नागरिक मृत्युमुखी पडले घरे उध्वस्त झाली, लहान मुले आई-बाबा विना अनाथ झाली या मुलांचं पालकत्व घेऊन भाऊंनी नळदुर्ग येथे आपलं घर सुरू केलं व शेवटचा श्वास असेपर्यंत हेच आपलं घर त्यांचं घर राहिलं.

पर्यावरण आणि जलसंधारणाच्या क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय काम केलेले आहे. त्यांच्या निधनाने समाजवादी चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे. पन्नालाल भाऊ सुराणा यांना तरुण भारत परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली.